

# अेक होता गंधर्व....

- डॉ. राम म्हैसाळकर



## डॉ. राम म्हैसाळकर

जन्म : अमरावती २९.५.१९२९

शिक्षण : बी.अेस् सी., अैम्.बी.; बी.अेस्

व्यवसाय : खाजगी वैद्यकीय

माजी उपाध्यक्ष : स्वर साधना संगीत समाज,
मैफिल नागपूर

माजी अध्यक्ष : नाट्य वलय, नागपूर

प्रसिद्ध पुस्तके :

- धीर वीर पुरुष पदा-
(खाडीलकरांच्या नाटकांवरील टीकात्मक नाट्यप्रयोग ह्याचे अनेक प्रयोग झाले.)
- रवीन्द्र गीतांजली...
(गुरुवर्य टागोर ह्यांच्या Lover's Gift; Gardner; Geetanjali ह्या काव्य संग्रहांचे आणि मूळ बंगाली गीतांजली ह्या पुस्तकांचे मराठी भावानुवाद; ह्या पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेच सर्वोत्कृष्ठ भावानुवादाचे स.ह.मोडक पारितोषिक मिळाले.)
- 'अत्तर' प्रयोगक्षम नाटक -
- वृत्तपत्रातून ; मराठी मासिकातून नाट्यविषयक आणि संगीत विषयक अभ्यासपूर्ण लेखन
- संगीत सौभद्र, संगीत मानापमान, संगीत संशयकल्लोळ, संगीत शारदा, संगीत स्वयंवर इत्यादी संगीत नाटकांचे आणि शांतता कोर्ट चालू आहे. कौन्तेय, अत्तर, बेइमान, धैक्यू मिस्टर ग्लाड इत्यादि गद्य नाटकांचे यशस्वी दिग्दर्शन.
त्यात विविध पारितोषिके.
- 'स्वगत स्वागत' 'तत: प्रविशति सूत्रधार:।' 'सुरेल शब्द' 'अखंड मुरली वाजे' 'खाडिलकरांच्या पंचनायिका' इत्यादि समीक्षापूर्ण आणि वैचित्र्यपूर्ण कार्यक्रमाचे लिखाण आणि यशस्वी मंचन
- मानव मंदिरचे 'स्मिता पाटील' पारितोषिक महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ह्यांचे स.ह.मोडक पारितोषिक प्राप्त.
इत्यादि.

॥ श्री ॥

# अेक होता गंधर्व ...


लेखक

**डॉ. राम म्हैसाळकर**

बी.अेस्सी. अेम.बी,बी.अेस्.



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथम आवृत्ती : फेब्रुवारी २००२

प्रकाशक :
**सचिव,**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.**
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत. तिसरा मजला,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४.

**© प्रकाशकाधीन**

मुखपृष्ठ सजावट :
**प्रा. अप्पासाहेब देशपांडे, पुणे.**

मुद्रक :
**व्यवस्थापक,**
**शिवराज फाईन आर्ट लिथो वर्क्स,**
(शासनमुद्रण व लेखनसामग्री, संचालनालयाअंतर्गत)
सुभाष रोड, नागपूर - ४४० ०१८.

**किंमत : ९३ रुपये**

# - निवेदन -

''अेक होता गंधर्व'' ही आहे बालगंधर्वाची जीवनकथा.
नागपूरचे डॉ. राम म्हैसाळकर यांनी लिहिलेली.
जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेली.
मधमाशांच्या मधानं लदलदलेल्या पोळाप्रमाणं.
बालगंधर्वाच्या आयुष्यातले चढउतार शब्दबद्ध करणारी.
बालगंधर्वाचा आयुष्यपट उलगडून दाखविता दाखविता तत्कालीन कालपट उलगडून दाखविणारी.
या कालपटातला संगीताच्या क्षेत्रातला वैभवकाळ चित्रीत करणारी.
मराठी नाट्याच्या व संगीताच्या रसिकांना अनमोल खजिना उपलब्ध करून देणारी.
भीज पाऊस मनोहर आहे असं नुसतं म्हणायचं नसतं.
या भीजपावसात मनसोक्त भिजायचं असतं.
चला, येताय ना भिजायला.

रा.रं. बोराडे,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई
दिनांक : २०-९-२००१

माझी ज्येष्ठ कन्या

कै. अरुणा

हिच्या स्मृतीस...........



# डॉ. राम म्हैसाळकर

| | | |
|---|---|---|
| जन्म | : | अमरावती २९.५.१९२९ |
| शिक्षण | : | बी.अेस् सी., अेम्.बी.; बी.अेस् |
| व्यवसाय | : | खाजगी वैद्यकीय |
| माजी उपाध्यक्ष | : | स्वर साधना संगीत समाज, मैफिल नागपूर |
| माजी अध्यक्ष | : | नाट्य वलय, नागपूर |
| प्रसिद्ध पुस्तके | : | |

- धीर वीर पुरुष पदा- (खाडीलकरांच्या नाटकांवरील टीकात्मक नाट्यप्रयोग ह्याचे अनेक प्रयोग झाले.)
- रवीन्द्र गीतांजली... (गुरुवर्य टागोर ह्यांच्या Lover's Gift; Gardner; *Geetanjali* ह्या काव्य संग्रहांचे आणि मूळ बंगाली गीतांजली ह्या पुस्तकांचे मराठी भावानुवाद; ह्या पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेच सर्वोत्कृष्ठ भावानुवादाचे स.ह.मोडक पारितोषिक मिळाले.)
- 'अत्तर' प्रयोगक्षम नाटक -
- वृत्तपत्रातून ; मराठी मासिकातून नाट्यविषयक आणि संगीत विषयक अभ्यासपूर्ण लेखन
- संगीत सौभद्र, संगीत मानापमान, संगीत संशयकल्लोळ, संगीत शारदा, संगीत स्वयंवर इत्यादी संगीत नाटकांचे आणि शांतता कोर्ट चालू आहे. कौन्तेय, अत्तर, बेइमान, थैल्यूमिस्टर ग्लाड इत्यादि गद्य नाटकांचे यशस्वी दिग्दर्शन. त्यात विविध पारितोषिके.
- 'स्वगत स्वागत' 'तत: प्रविशति सूत्रधार:।'
  'सुरेल शब्द' 'अखंड मुरली वाजे'
  'खाडिलकरांच्या पंचनायिका' इत्यादि समीक्षापूर्ण आणि वैचित्र्यपूर्ण कार्यक्रमाचे लिखाण आणि यशस्वी मंचन
- मानव मंदिरचे 'स्मिता पाटील' पारितोषिक महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ह्यांचे स.ह.मोडक पारितोषिक प्राप्त. इत्यादि.

एक होता गंधर्व.

आता गंधर्व म्हटला म्हणजे दोन गोष्टी वेगवेगळ्या सांगायला नकोत. एक म्हणजे तो गाणारा होता आणि दुसरं म्हणजे त्याचं वास्तव्य होतं--वास्तव्य म्हणण्यापेक्षा कर्तव्य होतं-इंद्राच्या दरबारांत...गायन करण्याचं.

तसा तो अतिशय प्रामाणिक होता. आपल्या कर्तव्यात त्यानं कधी कसूर केली नाही.

रोज प्रामाणिकपणानं दरबारांत आपलं गायन सादर करी.

गंधर्वच तो. तेव्हा त्याचा आवाज अतिशय गोड आणि गायनाचं ज्ञान देखील अद्यावत् होतं. हे वेगळं सांगायला नको.

शिवाय स्वतः अतिशय शिस्तप्रिय.

आपल्या कलेशी खूप प्रामाणिक.

विनयशील.

त्यामुळं स्वाभाविकच इंद्र-इंद्राणीचा आवडता गायक होता.

इंद्राचा सगळा दरबारच त्याच्या गायनाचा, त्याच्या विनयशीलतेचा आदर करायचा.

ह्या गंधर्वाचं गायन असलं म्हणजे ती बैठक हमखास रंगणारच ह्याची सर्वांना खात्री असायची.

शिवाय तो मनमिळावू, मितभाषी असल्यानं सर्वांनाच आवडायचा.

पण सगळेचजण सर्वगुणसंपन्न थोडीच असतात? प्रत्येकांत काही ना काही कमतरता असतेच.

तशीच अेक विचित्र खोड ह्याला होती.

ती खोड म्हणजे....... हा थोडा मिष्किल होता.

थोडा म्हणण्यापेक्षा ''थोडाबहुत'' म्हणणं जास्त योग्य ठरेल.

तर हा थोडाबहुत मिष्किल होता.

हा काय करायचा, अेखादा राग गातांना त्यात थोडी ''गडबड'' करायचा......... त्या रागांत वेगळापणा आणतांना रागहानी करायचा काही विसंवादी स्वर गुंफायचा.

आणि हळूच........ चोरून, सभेतल्या जाणकारांकडं दृष्टी टाकायचा. त्यांच्या कपाळावर पडलेल्या आठ्यांकडं मिष्किलपणं बघायचा.

ती जाणकारमंडळी अेकमेकांकडं जणु प्रश्नांकित नजरेनं बघायची. थोडीफार घोटाळ्यांत पडायची.

कारण रागसंकेता प्रमाणं गायनांत फरक पडला असला तरी त्या रागाची रोचकता वाढलेली असायची. तो राग अधिक रंजक वाटायचा.

त्यामुळं त्या गाण्याकडं........ हं, रागाकडं नाही म्हणत मी... त्या गाण्याकडं नाक मुरडावं असं त्यात काही नसायचं.

पण शास्त्रीय संगीताच्या अभिमानी माणसांना, मनोमनी जरी ते अल्हाददकारक वाटंत असलं, तरी शास्त्रीय दृष्ट्या ते बरोबरही वाटंत नव्हतं.

असा काहीतरी संभ्रम त्यांच्या चेहऱ्यावर दिसायचा.
त्याला ह्या गोष्टींची गंमत वाटायची.
असा तो थोडा मिष्किल होता.
मात्र अेक गोष्ट तो मनापासून करीत असे.
त्याच्या गाण्यांतले शब्द मोठे हळुवार, नजाकतीनं पेश करायचा.
त्या शब्दांच्या अर्थाशी अेकजीव होऊन तो गायचा.

ज्या भावना त्या पदातून व्यक्त झाल्या असतील त्याला अनुरूप स्वर तो गायनांतून गुंफायचा.

जणू ते शब्द आणि स्वर इंद्र-इंद्राणी सारखे अेकमेकांना अनुरूप आहेत....... जणू अेकमेकांसाठीच निर्माण केले आहेत असं वाटायचं.

संगीतपंडितांना देखील ही अेकरूपता भावून जायची.

वाटायचं, ही भावना व्यक्त करायला हे, आणि केवळ हेच स्वर हवेत.

दुसरे कुठलेही स्वर इथं चालायचे नाहीत.

ह्या रागाशी हे स्वर जुळत नसले....... रागाच्या कायद्यांत बसत नसले, म्हणून काय झालं?

शेवटी व्याकरण महत्त्वाचं की आकलन महत्त्वाचं?

आणि ते संभ्रमात पडायचे.

हे शास्त्री, पंडित संभ्रमात पडले म्हणजे त्याला आनंद व्हायचा.
ह्या सुप्त आनंदाचा आस्वाद घेत मिष्किलपणं त्यांच्याकडं बघायचा.

ही मंडळी गाण्यांत....... गाण्याच्या भावार्थात....... गाण्याच्या शब्दार्थात तल्लीन झाली म्हणजे ह्याला देखील खूप आनंद व्हायचा. शास्त्री-पडितांची ही अवस्था ! मग इतरेजनांची गोष्ट तर सांगायलाच नको.

ते तर तल्लीन झालेलेच असायचे

....... फार आधीपासून.

कारण त्यांच्या आस्वादाला व्याकरणाचं बंधन नसायचं.

त्याच्या गायनात आणखीन् अेक गोष्ट होती.

त्या गायनातल्या शब्दांच्या रसाशी त्याचा चेहरा, अेकंदर हावभाव. शरीरातली गात्रन्‌गात्र अेकरूप झालेली असायची.

स्वतःच अेकरूप होऊन नव्हे तर सान्या श्रोतृवृंदांना आपल्या बरोबर त्या रसात तो न्हाऊ घालायचा.

त्यामुळं त्याचं गायन म्हणजे अेक आनंदपर्वणी असायची.

त्यांचं गायन असलं म्हणजे सारा समाज दाटीदाटीनं त्याचा आस्वाद घ्यायला जमा झालेला असायचा.

ही त्याच्या गायनाची गोष्ट झाली.

त्याच्या मिष्किलपणाची आणखीनही अेक बाजू होती.

तो खूप चांगला नकल्या होता.

त्यातही अेक वैशिष्ठ्य होतं...

विरूद्ध पक्षाच्या नकला तो अप्रतिम करायचा.

विरूद्ध पक्षाच्या म्हणजे स्त्रियांच्या.

मग ती स्त्री कोणत्याही प्रवृत्तीची असो. हा हुबेहूब तिच्यासारखा बोलायचा...... चालायचा......... वागायचा.

धीर गंभीर, रूपगर्विता, चंचल स्वभावाची, थट्टेखोर वृत्तीची, अतिशय बुद्धीवान, लाजरी......बावरी, रूपाचाच नव्हे तर इतर कुठल्याही प्रकारचा गर्व असणारी, अभिसारिका....... पोक्त, संसारी.......

स्त्री कुठल्याही प्रकारची असो.

हा तिची नक्कल हुबेहूब करायचा.

त्यांचं चालणं, लाजणं, मुरकणं, हसणं.........

आणि रडणं सुद्धा........

ह्या नकलेची अेक खासियत होती.
ही नक्कल पाहून इतर गंधर्व तर हुरळुन जायचेच पण अप्सरा देखील त्याच्या प्रेमांत पडायच्या. त्याच्यावरून जीव ओवाळून टाकायच्या मनोवृत्तीत असायच्या.......
त्याला आपल्या पाशांत ओढायसाठी अेक अप्सरा तर काय काय क्लृप्त्या योजायची कि........
पण तो तिला दाद देत नसे.
बघता बघता तिला हुलकावणी देत असे.
पण ती अप्सरा देखील महाचिव्वट !
जणु त्याच्यासाठी तिनं तपश्चर्याच मांडली होती........
आपल्या तपश्चर्येचं फळ मिळेल अशी तिला खात्री होती.
त्यासाठी इंतजार करण्याची तिची तयारी होती........
तो जिथं जाईल तिथं जायची.
मग तो कुठे ही जावो.
अगदी पृथ्वीवर गेला असता तरी ती तिथं गेली असती !
असो.
आपली चर्चा आपल्या गंधर्वापुरतीच ठेवू या.
अशा ह्या मिष्किल गंधर्वाच्या मनात अेकदा अेक वेगळीच कल्पना आली.
तसा तो जिद्दी पण होता.
अेखादी गोष्ट करायची म्हणजे करायचीच.
मग त्यासाठी वाटेल त्या स्तरापर्यंत जायची त्याची तयारी होती.
त्याच्या परिणामाची चिंता करीत नसे.
चिंता करीत नसे म्हणण्यापेक्षा त्याच्या परिणामाचा त्याला अंदाज येत नसे, असं म्हणणं जास्त सयुक्तिक होईल.
सरळ इंद्र देवांचीच गंमत करावी असं त्याला वाटलं.
खरं म्हणजे आपल्या मालकाची मस्करी करणं इष्ट नाही हे त्याला समजायला हवं होतं.
पण म्हणतात ना, ''विनाशकाले विपरीत बुद्धीः''
तसं काहीसं झालं
प्रत्यक्ष इंद्राचीच थट्टा करण्यासाठी तो धजावला.

त्यानं इंद्राणीचा ''अवतार'' धारण केला.
तिच्यासारखे दागदागिने चढवले.
तिच्यासारखी वस्त्र प्रावरणंल्याला.
तशीच रंगभूषा केली.
अगदी हुबेहूब.
बहुरूपीच तो. त्याला ते सगळं छान जमलं. आणि इंद्राणी आपल्या महालात नाही. अेकटे इंद्रदेवच आहेत अशी संधी साधून त्यानं महालात प्रवेश केला.
इंद्राणीसारखाच गोड आवाज काढून गोड गोड गात, इंद्रदेवाशी मधु- मधुर संवाद करू लागला.
त्यानं ती इंद्राणीची भूमिका इतक्या जिवंतपणे केली की क्षणभर इंद्रदेव सुद्धा त्याला इंद्राणी समजले.
पण कितीही झालं तरी इंद्रदेव फसणार थोडीच होते.
त्यांना ह्याचे नाटक ओळखू आले.
त्याचा, ह्या नाटकाचा, खूप राग आला.
आपला आवडता गंधर्व असला म्हणून काय झालं ?
आपली त्यानं अशी आगळीक करावी ?
इंद्राणीचं सोंग वठवून आपलीच नव्हे तर इंद्राणीची पण थट्टा करावी ?
आपली पायरी हा इतक्या लवकर विसरावा?
असे अनेक विचार त्यांच्या मनात चमकून गेले.
इंद्रदेवांचा संताप अनावर झाला.
त्यांनी त्याला शाप दिला.
''ह्या अमरावतीतून तुझं पतन होईल. मृत्यूलोकांत सर्वसाधारण माणसाप्रमाणं तुला जीवन जगावं लागेल !!!''
ही शापवाणी अैकताच गंधर्व खाडकन् भानावर आला. त्याला वास्तवाची जाणीव झाली.
आपण ह्या नकला करण्याच्या नशेत काय करून गेलो ?
........ छे छे आपल्या हातून फार वाईट घडलं.
तो भानावर आला. पश्चात्तापानं दग्ध झाला.
गहिवरून त्यानं इंद्रदेवाचे पाय धरले.

आपल्या अश्रूंचा त्यावर अभिषेक सुरू केला.

"क्षमा. भगवंत क्षमा !

"माझ्या कडून अक्षम्य अपराध घडलाय्.

"मी आपला अनंत अपराधी आहे.

"माझ्या कृत्याचा मला पश्चात्ताप होतोय्.

"आपणं दयाशील आहात.

"माझ्यावर दया करून क्षमा करा.

"मला क्षमा केल्याशिवाय मी हे पाय सोडणार नाही."

असं परोपरीनं विनवू लागला.

त्याची अशी विनवणी चालू असतांना काही कामानिमित्त श्री विष्णू तिथे आले.

हा प्रसंग पाहताच ते उद्गारले.

"अरे, इंद्राणी हे काय चालू आहे ?

"पतीदेवांच्या चरणांपाशी हे लोटांगण....... हे अश्रू विमोचन ?"

विष्णू देव सुद्धा क्षणभर गंधर्वाला........ त्याच्या नाटकी स्वरूपाला फसले.

पण क्षणभरच.

मग लगेच त्यांच्या लक्षांत आलं....... म्हणाले--

"अरे हा तर दरबारातला गंधर्व.......!"

"हेच-- हेच ह्याचं सोंग....... ह्या सोंगा ढोंगानं मला फसवू पहात होता.......

"म्हणून मी ह्याला शाप दिला आहे. मृत्यू लोकांत जन्म घेण्याचा......."
इंद्रदेव म्हणाले.

पण मग गंधर्वाच्या करूण चेहऱ्याकडे ते बघत राहिले.

त्यांचा राग हळूहळू निवळू लागला.

त्यांना त्याच्यामधली कला जाणवली.

आपल्यालाच नाही तर विष्णुदेवाला देखील ह्यानं आपल्या कलेनं, क्षणभर का होईना, इंद्राणीच वाटावी असा आभास निर्माण केला होता तर........

त्यांचं हृदय द्रवलं. त्याच्या डोक्यावरनं हात फिरवीत इंद्रदेव त्याला म्हणाले --

''ऊठ, गंधर्वा, ऊठ. तुला क्षमा आहे.

''पण माझी शापवाणी अन्यथा होणार नाही.

''अेक उःशाप तुला देतो. मीच, न मागताच.

''तुझ्या ह्या कलेसकट तू पृथ्वीवर जन्म घेशील आणि ह्या तुझ्या कलेनं तिथं अजरामर होशील.

''पुरूष म्हणून जन्मलास तरी स्त्री स्वरूपातल्या ह्या भूमिकांमुळे प्रसिद्धीला पावशील!''

गंधर्वाला कळेना.

हा अुःशाप होता की आणखी वेगळा अभिशाप ?

''प्रभो हा कसला उःशाप ? मग माझ्या पुरूषार्थाला काय अर्थ ?''

ह्यावर विष्णुदेव म्हणाले--

''अरे वेड्या. पुरूषार्थ काय पुरूष रूपांतच करता येतो ?

''स्त्री वेशातलाच तुझा पुरूषार्थ लोकांना वेड लावील.

''आणि त्यात लाज कसली रे बाळगायची ? कमीपणा कुठला मानायचा?

''मी स्वतः दोन वेळा मोहिनीच्या रूपानं वावरलो आहे. पृथ्वीवर.

''अमृतमंथनाच्या वेळी आणि भस्मासुराचा नाश करण्याच्या वेळी.

''शिवाय आपले भोलेनाथही अर्धनारी नटेश्वर म्हणून प्रसिद्ध आहेत.

''उगाच खंत करू नकोस.''

गंधर्वाचं समाधान झालं. दोन्ही ईश्वरांना प्रणाम करून तो निघाला.

त्या गंधर्वाची ही जीवनकथा.

अेक होता गंधर्व.......

※ ※ ※ ※



## ॥ १ ॥


त्याच्या दृष्टीने तो दिवस खूप महत्त्वाचा होता. केवळ त्याच्याच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या दृष्टीने तो दिवस महत्त्वाचा होता...... महाराष्ट्राच्याच का? सगळ्या देशांतील मराठी माणसांच्या दृष्टीने त्या दिवसाला महत्त्व आले होते. अजून खोल विचार केला तर मराठी संगीत नाटकाच्या इतिहासात अेक अलौकिक क्रांती घडवणारा तो दिवस होता. मराठी नाट्यसृष्टीतील दिग्गज शंकरराव मुजुमदार, गोविंद बल्लाळ देवल, गणपतराव बोडस, स्वतः त्या मुलाची आई आणि किर्लोस्कर संगीत मंडळीचे अनेक नट, ह्यांच्या दृष्टीने देखील तो दिवस फार महत्त्वाचा होता. शंकरराव मुजुमदारांनी ज्योतिबाच्या डोंगरावरील प्रसिद्ध ज्योतिषी शंकरशास्त्री देव ह्यांच्याकडून शुभ दिवस आणि शुभ मुहूर्त काढून आणलेला तो दिवस होता. त्या दिवशी जणू काय नवेच नाटक रंगभूमीवर येणार आहे अशा उत्साहात सगळे जण होते. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मोठा पडदा सोडला होता. किर्लोस्कर नाटक मंडळीतली प्रमुख नट मंडळी आणि गावातील काही प्रतिष्ठित मंडळी नाट्यगृहात जमली होती. ह्या मंडळींना मुद्दाम आमंत्रण देण्यात आले होते. ती नाट्यगृहात इतस्ततः विखुरली होती. समोरच्या खुर्च्यांपासून पिटापर्यंत वेगवेगळ्या कोपऱ्यांत विराजमान झाली होती. सगळ्यांच्या नजरेत उत्सुकता होती. आशंका होती. त्या बरोबरच अधीरता होती. थिएटरभर तुरळकपणे बसलेली मंडळी थिएटरमधल्या कोणत्याही कोपऱ्यापर्यंत त्याचा आवाज पोहाचतो कि नाही हे पाहण्यासाठी त्या उद्देशाने अशी बसली होती. ड्रॉपच्या मागे रंगमंचावर महालाचा पडदा सोडला होता.

सूत्रधार आणि पारिपार्श्वक ही पात्रे नेहमीप्रमाणे रंगली होती. सरावलेली होती. त्याला मुद्दाम भरजरी वस्त्रे नेसवण्यात आली होती - ती वस्त्रे स्त्रीची होती. स्वतः गणपतराव बोडसांनी त्याची रंगरंगोटी करून - त्या काळच्या भाषेप्रमाणे "सोंग"- रंगवले होते. शारदा नाटकांतल्या नटींची भूमिका त्याला शिकवण्यांत आली होती. त्या

नाटकाचे लेखक गोविंद बल्लाळ देवल ह्यांच्या मार्गदर्शनाखाली गणपतरावांनी त्याला शिकवले होते. उपलब्ध असलेले आणि भूमिकेला योग्य असे अलंकार तो अंगावर लेऊन तयार झाला होता. त्यावेळी त्याचे वय होते सतरा वर्षे. ज्योतिषी शंकरशास्त्री देवांनी काढून दिलेल्या मुहूर्तावर पडदा सरकला आणि शारदा नाटकांतील नटी सूत्रधाराचा प्रवेश नांदीसह सुरू झाला. गणपतरावांनी शिकवल्याप्रमाणे त्याने प्रवेश केला योग्य त्या वजनानं वाक्ये म्हटली – नव्हे भूमिकेत शिरून सूत्रधाराची फटकळ पत्नी साकार केली आणि नटींचे पहिले गाणे – ''अजुनि खुळा हा नाद पुरेसा, कैसा होइना ?'' योग्य त्या हावभावासह म्हणायला सुरवात केली. निकोप आवाज, सुरांचा सच्चा लगाव आणि अतिशय गोड गळा, ह्यामुळे पहिलेच पद खूप रंगले. त्यानंतरचे ''काय पुरुष चळले बाई'' सुरू झाले. ह्या पदाच्या प्रत्येक कडव्यात वेगळे वेगळे भाव आहेत'' चीड : कारूण्य, आर्जव, अगतिकता, ह्या सगळ्या भावांना योग्य त्या शद्बोच्चाराने आणि स्वरोच्चाराने त्याने हे देखील पद उत्तम म्हटले. त्याचबरोबर त्या पदांच्या अनुषंगाने येणारे संवाद देखील रंगून चेहऱ्यावरील आणि शारिरिक हालचाली सकट स्त्री सुलभ पद्धतीने म्हटले. एकंदरीत शारदेच्या नटीची भूमिका खूप छान रंगवली. उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. पहिल्यावहिल्या कामातच भूमिकेची छाप शंकररावःगणपतराव, गोविंदराव ह्या रंगभूमीवरच्या अनभिषिक्त सम्राटांवर पाडून हा मुलगा जर किर्लोस्कर मंडळीत आला तर किर्लोस्कर मंडळीच्या भरभराटीला सीमा राहणार नाही ह्याची खात्री ह्या त्रिकुटाला वाटू लागली आणि त्याला कंपनीत आणण्यासाठी योग्य कारवाई करण्याच्या तयारीला ही मंडळी लागली.

उपस्थित जाणकार मंडळींना आपल्या गाण्यानं आणि अभिनयाने जिंकून घेणाऱ्या त्या मुलाचं नाव होतं नारायण श्रीपाद राजहंस.

वयाच्या दहाव्या वर्षी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्यांनी नारायणाचं गाणं एका बैठकीत ऐकलं होतं आणि ते सहज उद्गारले ''अरे, हा तर बाल-गंधर्व आहे''. आणि तेव्हापासून नारायणाचे नाव बालगंधर्व पडले. लोकमान्यांच्या दिव्य दृष्टीला वाटलेला बालगंधर्व खरोखरच शेवटपर्यंत गंधर्वतुल्य गात राहिला. त्याचं गायन आणि



**नारायणाला ''बाल गंधर्व'' नाव देणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक**

केसरी कार्यालयातच काम करणाऱ्या यशवंत कुळकर्णी ह्यांना अेक दिवस टिळक म्हणाले - ''तुमचा पुतण्या नारायण चांगला गातो असे अैकतो. त्याचं गाणं अेकदा आम्हाला अैकवां की।''

त्यांच्याच इच्छेनुसार लोकमान्यांच्या घरीच नारायणाची बैठक झाली. गाणं संपल्यावर लोकमान्य म्हणाले, ''अरे वा। कुळकर्णी तुमचा हा नारायण म्हणंजे अेक बालगंधर्वच आहे बुवा।''

तेव्हा पासून नारायणाचा बालगंधर्व झाला।

अभिनय एक दैवी गुण समजल्या गेला. संपूर्ण महाराष्ट्राला नव्हे सर्व विश्वातील मराठी माणसाला ह्या गंधर्वाने वेड लावलं. त्यांच्या ह्दयावर आपलं नाव कायमचं कोरून ठेवलं.

ह्या नारायणाचा जन्म पुणे येथे २६ जून १८८८ रोजी झाला. मात्र त्याचे मूळ गांव नागठाणे. हे नागठाणे सातारा जिल्ह्यातील तासगांव तालुक्यात आहे. तिथे त्यांची वडिलोपार्जित शेती होती. नारायण हा श्रीपादराव व अन्नपूर्णाबाई ह्यांचा दुसरा मुलगा. त्याचे शिक्षणात फारसे लक्ष नव्हते. मात्र संगीताची आवड लहानपणापासूनच होती. शिवाय घरातही संगीतमय वातावरण होते. त्याचे काका गणपतराव राजहंस बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर ह्यांचे गंडाबंध शागीर्द होते. गवई म्हणून ख्यातनाम होते. शिवाय ते चांगले मृदंगवादक देखील होते. श्रीपाद राजहंस, नारायणाचे वडील, सतार वाजवीत असत. नारायणाचे मामा वासुदेवराव पुणतांबेकर ''नाट्य कला प्रवर्तक मंडळीच्या'' संस्थापकांपैकी एक होते. नारायणाच्या आईचा गळा अतिशय गोड असून त्या भजने, ओव्या भूपाळ्या फार छान गात असत. थोडक्यात नारायणाला वडिलांकडून आणि मातुलघराण्याकडून संगीताचा आणि नाटकाचा वारसा मिळाला होता.

नारायणाला शिक्षणात विशेष गोडी नव्हतीच तरीही त्याला चांगले शिक्षण मिळावे म्हणून त्याच्या घरच्या मंडळींनी प्रयत्नांत कसूर केली नव्हती. त्यासाठी त्याला जळगांव येथे त्याची आते बहीण-अक्का हिच्याकडे ठेवले होते. अक्काचे यजमान आबासाहेब म्हाळस स्वतः नाटकाचे आणि गाण्याचे शौकिन होते. त्यामुळे जळगांव येथे येणाऱ्या संगीत नाटक मंडळींकडे आबासाहेबांचा राबता असे. अनायासे नारायणाला अनेक संगीत नाटके बघायला मिळाली. त्यातही ''नाट्यकला प्रवर्तक'' आणि ''शाहू नगरवासी'' ह्या नाटकमंडळींची नाटके मनसोक्त बघायला मिळत. पैकी नाट्यकला प्रवर्तक मंडळी संगीत नाटके करीत असे. त्यांत गोपाळराव मराठे : दत्तोपंत खाडिलकर आणि वासुदेवराव पटवर्धन हे गुणी नट होते. शाहू नगरवासी मंडळीतील गणपतराव जोशी हे गद्य भूमिका अतिशय सुरेख वठवीत असत. त्यामुळे चांगले गद्य आणि संगीत ह्या दोन्ही गोष्टींची ओळख नारायणाला नकळत लहानपणापासूनच होत गेली. त्याचा नकळत परिणाम

त्याच्यावर झाला असला पाहिजे.

नारायणाची गाण्याची आवड आणि गोड गळा पाहून आबासाहेबांनी जळगांव येथील मेहबूब खां यांच्याकडे त्याच्या शिक्षणाची व्यवस्था केली. स्पष्ट शद्धोच्चार आणि गायनाची सुरेल सरलता ह्या त्यांच्या वैशिष्ठ्यपूर्ण गोष्टी होत्या. नारायणाने त्या आत्मसात केल्या. त्याचा त्याला भूमिका वठवतांना खूप फायदा झाला. शिक्षणांत मात्र नारायणाची प्रगती यथातथाच होती. कशीबशी इंग्रजीची दुसरी यत्ता पार केली.

ह्याच सुमारास म्हणजे १९०३ साली श्रीपादरावांना अपघात होऊन ते बिछान्याला खिळले. सांपत्तिक ओढाताण सुरू झाली : मातोश्रींची तब्येत खालावली आणि भरीसभर म्हणून की काय नारायणाला कुत्रा चावला...... पण ही एक इष्टापत्तीच ठरली. नारायणाचे आजोबा अप्पाशास्त्री बेलेकर त्याला योग्य इलाज करण्यासाठी कोल्हापुरास घेउन गेले. इथेच इलाज चालू असता श्रीमंत छत्रपती शाहू महाराज ह्यांची ओळख झाली. ते स्वतः संगीत आणि नाट्य कलेचे भोक्ते होते. आणि नारायणाचे गाणे ऐकून ते खूप खूष झाले. त्याच बरोबर नारायणाला उजव्या कानाने कमी ऐकू येते हे लक्षात आल्यामुळे त्याच्या कानाची चिकित्सा करण्यासाठी मिरंजेला मिशन हॉस्पिटल मध्ये पाठवले. डॉ. काशीनाथपंत गाडगीळ ह्यांच्या मार्फत योग्य तो इलाज करण्याची व्यवस्था केली. त्याच वेळी महाराजांच्या विशेष प्रेमातली किर्लोस्कर नाटक मंडळी मिरजेला होती, त्यांच्याच बिऱ्हाडी नारायणाची राहण्या-जेवण्याची व्यवस्था केली.

नारायणाची किर्लोस्कर मंडळीत जाण्याची ही पहिलीच वेळ नव्हती. दोन-एक वर्षापूर्वी ह्या मंडळीत त्याचं गाणं झालं होते. उद्देश हा की जर मंडळींना गाणं आवडलं तर तिथे नोकरी मिळू शकेल आणि घरच्या सांपत्तिक ओढाताणीत नारायणाच्या नोकरीमुळे थोडा आसरा मिळेल. परंतु तेव्हा त्याचा आवाज फुटल्यामुळे गाणं चांगलं झालं नाही आणि किर्लोस्कर मंडळींनी ''फुटक्या काठाचं मडकं'' असा शेरा मारून त्याला नापसंत केलं होतं. पण मध्यंतरीच्या काळामध्ये आणि संगीताच्या अव्याहत रियाझीमुळे त्याचा आवाज चांगलाच सुधारला होता. डॉ. गाडगीळांनी पुन्हा त्याचं गाणं ऐकण्याचा आग्रह मंडळींना

केला आणि ''शाहू महाराजांना ह्या मुलाचं गाणं आवडतं'' असं डॉ. गाडगीळांनी सांगितल्यावरून किर्लोस्कर मंडळीतील गणपतराव बोडस : गोविंद बल्लाळ देवल : शंकरराव मुजुमदार : दादा लाडू इत्यादी मंडळींनी त्याचे गाणे ऐकले. दोन वर्षापूर्वीच्या गाण्यापेक्षा हे गाणे निःसंशय उजवे होते. गाण्याची पद्धत सुंदर ढंगदार आणि ताल-सुरांत पक्की वाटली. देवलांना गाणे खूप आवडले. किर्लोस्कर मंडळींना एका चांगल्या स्त्री पात्रांची गरज होती म्हणून त्यांनी नारायणाला स्त्री पार्ट करशील का म्हणून विचारले तेव्हा ''शिकवल्यास करीन'' असे त्याने उत्तर दिले. त्याच्या उत्तराने सगळ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आणि त्याच्या आई- वडिलांच्या संमतीची खटपट सुरू झाली. किर्लोस्कर मंडळींकडे आणि त्याच्या भल्याकडे लोकमान्य टिळकाचे लक्ष होते. ''नारायणाने यत्किंचितही नुकसान झाले तर माझ्या पदरचे वीस हजार रूपये देइन'' असे त्यांनी म्हणताच घरची परवानगी मिळण्यास अडचण पडली नाही.

शारदा नाटकातल्या नटी सूत्रधार प्रवेशांतल्या नटीची भूमिका देवल मास्तरांच्या मार्गदर्शनानुसार गणपतराव बोडसांनी नारायणाला शिकवली होती आणि त्याचे रंगमंचन झाले. तोच तो महत्त्वाचा दिवस। मराठी रंगभूमीला नारायणराव बालगंधर्व सारखा महान् नट प्रदान करणारा तो दिवस। मराठी रंगभूमीला वैभवाचे दिवस दाखवण्यात सुरूवात करणार तो भाग्यशाली दिवस।

# ॥ २ ॥

किर्लोस्कर नाटक मंडळीतील ज्येष्ठ मंडळींना ''त्या दिवसाबद्दल'' एवढा जिव्हाळा का बरं वाटत होता ? शंकरराव मुजुमदारांना. ज्योतिबाच्या टेकडी-वरील शंकरशास्त्री देव ह्या सिद्ध पुरूषाला भेटून : शुभ दिवस शुभ घटिका मिळवून, अगदी त्या क्षणाला पडदा ओढून नारायणाची परिक्षा घेण्याची आवश्यकता कां वाटली ? देवलांच्या मार्गदर्शनाखाली गणपतराव बोडस ह्यांना नारायणाला तालीम देण्याची गरज कां म्हणून वाटली ? ह्या परीक्षेत नारायण शंभर टक्के गुण मिळवून उत्तीर्ण व्हावा ही सुप्त मनीषा सर्वांचीच कां बरं होती ?

त्याला कारण होतं. आणि त्यासाठी आपल्याला थोडा मागचा इतिहास चाळावा लागेल.

१८४३ साली पाच नोव्हेंबरला विष्णुदास भावे ह्यांनी सीता-स्वयंवर ह्या नाटकाने मराठी नाटकाची सुरुवात केली. (म्हणूनच आपण पाच नोव्हेंबर हा मराठी रंगभूमी दिन म्हणून साजरा करतो.) पण आधुनिक संगीत नाटक अण्णासाहेब किर्लोस्करांनी ३१ ऑक्टोबर १८८० रोजी पुण्याच्या आनंदोद्भव नाट्यगृहांत संगीत शांकुतल ह्या नावाने सादर केले. हे नाटक महाकवि कालिदास ह्यांच्या ''अभिज्ञान शाकुंतलम्'' ह्या नाटकाचे जवळपास भाषांतर होते. सुरुवातीला फक्त तीनच अंक सादर होत. पूर्ण नाटक नंतर तीन चार महिन्यांनी पूर्णानंद नावाच्या नाट्यगृहांत सादर झाले. लोकांनी ह्या नाटकाची अमाप प्रशंसा केली.

त्या काळांत नाटक निषिद्ध मानल्या गेले होते. नाटकवाल्यांचं तोंड दिवसा पाहू नये अशी चाल त्या काळांत होती. स्त्रिया सहसा नाटक बघायला सुद्धा जात नसत. त्यामुळे त्यांनी नाटकांत काम करण्याचा प्रश्नच उरत नसे. समाजातील देखणे : नाजुक पुरूषच स्त्री भूमिका करीत असत. शाकुंतल नाटकांत शकुंतलेची भूमिका शंकरराव मुजुमदार करीत. बाळकोबा नाटेकर आणि मोरोबा वाघोलीकर इतर पुरूष भूमिका करीत. बाळकोबा आणि मोरोबा फार पट्टीचे गाणारे होते. त्यांच्या संगीत भूमिका अतिशय रंगत. शंकरराव मुजुमदारांना गाणं येत नसल्याने शकुंतलेला गाणी नव्हती. सुप्रसिद्ध गायक भाऊराव कोल्हटकर हे

१८८२ साली किर्लोस्कर नाटक मंडळीत दाखल झाले. त्यांनी शकुंतलेची भूमिका करण्याचे ठरल्यावर किर्लोस्करांचे शिष्योतम गोविंद बल्लाळ देवल ह्यांना शकुंतलेची पदे लिहायला सांगण्यात आले. शाकुंतल नाटकांत शकुंतलेची सगळी पदे देवलांनी लिहिलेली आणि संगीत बद्ध केलेली आहेत. भाऊरावांचे सौंदर्य, सुवर्ण केतकीप्रमाणे दिसणारा त्यांचा गौरवर्ण, बांधा, अंगकांति, चेहऱ्याची ठेवण अवयवांची घडण उच्चवर्णीय स्त्री भूमिकांना अनुरूप आणि स्त्री स्वभावाला रंगभूमीवर साकार करू शकतील अशीच होती. फार काय त्यांना आवाज देखील स्त्रीकंठसादृशच लाभला होता. स्त्री कंठाची उंची आणि पल्ला सहज गाठून तो त्यापुढे ही पाच सहा स्वर उंच जात असे. एकजात तेजस्वी जवरीदार, मधुर आणि भरपूर तीन सप्तकांवर हुकुमत गाजवणारा आवाज दिव्यच होता. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या तीनही नाटकांत - शाकुंतल, सौभद्र, रामराज्य वियोग - भाऊरावांनी स्त्री भूमिका केल्या. अण्णासाहेबानंतर त्यांचे शिष्योत्तम गोविंद बल्लाम देवल ह्यांनी लिहिलेल्या विक्रमोर्वशीय, शापसंभ्रम, मृच्छ कटिक इत्यादि नाटकांत त्यांनी स्त्री भूमिका केल्या. वयाची तिशी उलटल्यानंतर स्त्री भूमिका करणे त्यांनी सोडले. नंतरच्या पुरूष भूमिका सुद्धा गाजवल्या. तेरा फेब्रुवारी १९०१ रोजी भाऊराव मरण पावले. १८८२ ते १९०१ म्हणजे १९ वर्षे भाऊरावांनी नाट्य सेवा केली त्यापैकी सतरा वर्षे त्यांनी स्त्री भूमिका केल्या. १८९९ पासून भाऊरावांनी स्त्री भूमिका करणे बंद केले. त्यांच्या पश्चात् चिंतोबा गुरव, कृष्णराव गोरे, रामा डबरी ही मंडळी स्त्री भूमिका करीत. वास्तविक कृष्णराव गोरे अतिशय बुद्धिवान गायक होते, रूपवान होते पण भाऊरावांच्या पश्चात् त्यांच्या गायनाचा व भूमिकेचा प्रभाव पडेना. किर्लोस्कर मंडळीचे उत्पन्न इतके कमी झाले की नोकरांचे पगार देणे कठीण होऊ लागले. तेव्हा एखादा चांगला गाणारा आणि स्त्री भूमिका करून लोकांवर छाप पाडू शकेल अशा सुस्वरूप मुलाचा शोध सुरू झाला. त्याच काळात नारायणाचा किर्लोस्कर मंडळीच्या बिऱ्हाडी प्रवेश झाला. सुरूवातीला नाटकांत काम करण्याची नारायणाची तयारी नव्हती. त्याचे गाणे चांगले होते. रूप स्त्री पात्राला योग्य असे होते. परंतु नाटकांत काम करण्यांत त्याला रुचि नव्हती.

त्याला गाणं शिकून गवई होण्याची इच्छा होती. पण हा मुलगा स्त्री पार्टी म्हणून किर्लोस्कर कंपनीत आला तर कंपनीला पूर्वीचे वैभवाचे दिवस प्राप्त होतील अशी शंकरराव मुजुमदारांना खात्री होती. तेव्हा नारायणाचे मन वळवण्याची जबाबदारी शंकररावांनी गणपतरावांवर टाकली. गणपतरावांनी नारायणाला नीट समजावले. शेवटी एखादी भूमिका करून बघावी. नारायणाला आणि इतर सगळ्यांना ती पसंत पडली तर त्याने नाटकात काम करावे असे उभयपक्षी ठरले. शिवाय, शिकवल्यास स्त्री भूमिका करीन असे नारायणाने कबूल केले होते. म्हणून नारायणाला शारदा नाटकांतील नटीची भूमिका शिकवून ''त्या महत्त्वाच्या दिवशी'' नारायणाने ती करून दाखवली. सगळ्यांना : नारायणाला देखील ती पसंत पडली आणि नारायणाने सर्वांच्या संमतीने किर्लोस्कर नाटक मंडळीत नट म्हणून १९०५ साली गुरू द्वादशीच्या मुहूर्तावर (२५ ऑक्टोबर) प्रवेश केला. त्यासाठी लोकमान्य टिळक : दादासाहेब खापर्डे, शाहू छत्रपती महाराज ह्यांनी प्रयत्न करावा ही गोष्टच अपूर्व होती.

नारायण कंपनीत आल्यानंतर त्याच्यासाठी पहिलं नाटक शाकुंतल निवडण्यात आलं आणि नारायणाला शकुंतलेची भूमिका शिकवण्याची जबाबदारी श्री. देवल मास्तरांनी स्वीकारली. भाऊराव कोल्हटकरांना देवलांनीच तयार केले होते आणि भाऊरावांनी ती अप्रतिमपणे वठवून त्या भूमिकेला खूप उंच नेऊन ठेवलं होते. लोकांना भाऊरावांची शकुंतला खूप आवडली होती. नारायणानं नंतर साकार केलेल्या शकुंतलेची तुलना भाऊरावांच्या शकुंतलेशी होणार होती. देवलांना त्या दृष्टीने जितके आव्हान होते, नारायणाकडून वठवून घेण्याचे, तितकेच किंबहुना त्याही पेक्षा मोठे आव्हान नारायणासमोर होते. परंतु देवल मास्तरांचे शिकवणे अतिशय बुद्धिनिष्ठ होते. शब्दोच्चार आणि रंगमंचावरील हावभाव, चेहऱ्यावरील सूक्ष्म छटा ह्या आपल्या मनासारख्या येईपर्यंत ते त्या पात्राकडून पुन्हा पुन्हा करवून घेत आणि त्याचं समाधान झाल्याशिवाय पुढे जात नसत. मराठी नाट्यसृष्टीत गोविंदरावांसारखा नाट्य शिक्षक झाला नाही. भाऊरावांच्या आणि नारायणरावांच्या नाट्य कारकीर्दीत त्यांना जे यश

मिळालं त्यांत सिंहाचा वाटा देवलांचा होता. शाकुंतल मधील शकुंतलेची भूमिका बालगंधर्वांना शिकवण्याचे ठरल्यावर कंपनीला एक महिन्याची सुटी देण्यात आली. इतर सर्व कलाकार आपआपल्या गावी निघून गेले. त्यामुळे देवलांना नारायणाला मनसोक्त शिकवता आलं. त्याला त्यांनी प्रथम शकुंतलेची भूमिका समजावून दिली. स्त्री हसते कशी : रडते कशी : संतापते कशी : लाजते कशी : हुंदके देते कशी, कृत्रिम कोप कसा प्रकट करते, लाडात कशी येते...... फुरंगटून कशी बसते. ऐक ना दोन. सारे प्रकार नीट समजावून सांगून तसे त्याच्याकडून वारंवार करवून घेतले. चोरट्या नजरेने कशी बघते. वडील माणसांसमोर अदबीने कशी उभी राहते. नमस्कार कशी करते. साऱ्या खुब्या सांगितल्या आणि नारायणाने त्या आत्मसात केल्या. ह्या स्त्रियांच्या भावना व्यक्त करणाऱ्या गोष्टी आपल्या सर्वच स्त्री भूमिकामधून जितक्या ठळकपणे दाखवल्या तितक्याच नाजुकपणे अभिनित केल्या. बालगंधर्वांच्या अभिनयाचा हा फार महत्त्वाचा पैलू होता. त्या जोरावरच त्यांनी रसिकांची मने जिंकली...... सातत्याने जिंकत राहिले.

देवलांना शाकुंतल नाटकातल्या प्रत्येक अंकातील...... शकुंतलेच्या प्रत्येक प्रवेशातील कथानकाचे मर्म आणि त्यावेळची तिची मानसिक जडण घडण ह्याचे सूक्ष्म ज्ञान नारायणाला दिले. त्याचबरोबर अवलोकन शक्तीची महती सांगितली. देवळांत, घाटावर, विहिरीवर : मोठमोठ्या सरदार आणि संस्थानिकांच्या घरी नारायणाला घेऊन गेले : समाजातील सर्वच स्तरांवरील स्त्रियांचे बोलणे : चालणे : वागणे ह्या सर्वांचा सूक्ष्म अवलोकनांती अभ्यास करायला लावला. जिथे जिथे स्त्रियांची गर्दी आणि विविधता आढळेल तिथे नारायणाला देवल मास्तर घेऊन जात. नारायणाचे स्त्री भूमिकेसंबंधी संपूर्ण करीअर त्यांनी पक्क केलं. कोणत्याही नाटकांत कोणत्याही प्रकारची स्त्री उभी करण्यांच सामर्थ्य त्या काळांत देवलांनी नारायणाला दिलं. पुढील आयुष्यात रूक्मिणी सारखी राजकन्या, भामिनी सारखी गर्वोन्नत, सिंधू सारखी सहनशील, रेवती सारखी खेळकर, द्रौपदीसारखी तेजस्वी अशी स्त्रीची अनेक रूपे बालगंधर्वांनी साकार केली त्याचे सर्वस्वी श्रेय देवल मास्तरांचे आहे. असो. सतत सहा महिने देवलांनी नारायणाला

कसोशीची तालीम दिली. "शकुंतला" म्हणून नारायणाला तयार केला. १९०८ सालच्या जानेवारी महिन्यांत मिरज येथील सरकारी थिएटरांत "शाकुंतल" नाटकाचा पहिला प्रयोग जाहीर झाला. त्या प्रमाणे शाहू महाराजांना कळवण्यांत आले. मात्र ह्या नाटकाचे फक्त चारच अंक होणार होते. सर्व दूर त्या प्रयोगाची जाहिरात करण्यांत आली. "ज्याला लोकमान्य टिळकांनी बालगंधर्व ही पदवी दिली आहे तो नवीन मुलगा शकुंतलेचं काम करणार" असे जाहिरातीत ठळकपणे लिहिण्यांत आले. लोकांमधील कुतूहल शिगेस पोहोचेपर्यंत जागोजागी जाहिरात करण्यात आली. शिवाय आसपासच्या गावांतील प्रतिष्ठित मंडळी आणि किर्लोस्कर मंडळींचे हितचिंतक ह्यांना पत्रे पाठविण्यांत आली. त्यामुळें ह्या पहिल्या प्रयोगाबद्दल फार मोठी उत्सुकता रसिक मंडळीत निर्माण झाली. शनिवारी रात्री नऊ वाजता प्रयोग होता. गावोगावाहून तारा करून तिकिटे रिझर्व्ह करणाऱ्या लोकांनी थिएटरमध्ये प्रवेश केला. रात्री नऊच्या प्रयोगासाठी आठ वाजताच थिएटर तुडुंब भरून गेले. नारायण शकुंतलेचा पोशाख करून, रंगरंगोटी करून सज्ज होता. त्याला भेटायला प्रयोगाआधी शाहू महाराज आत आले. नारायणाला त्या वेशभूषेत पाहून आनंद झाला. नारायणाने त्यांना वाकून नमस्कार केला ते पाहून महाराज म्हणाले, "घाबरू नकोस. अण्णासाहेबांच्या तसबिरीला नमस्कार करून त्यांचा आशिर्वाद घे. मनापासून भूमिका वठव. किर्लोस्कर मंडळींचं आणि भाऊरावाचं नाव राख!" आणि अत्यंत समाधानाने आणि उत्कंठतेने शिगोशिग भरलेल्या थिएटरमधे जाऊन तुडुंब भरलेल्या गर्दीकडे अेकवार बघून विंगमध्ये त्यांच्यासाठी ठेवलेल्या कोचात बसले.

"नाटकाला सुरूवात झाली. नटी सूत्रधाराचा प्रवेश रंगला..... संपला.... दुष्यंताचा प्रवेश झाला........त्यानंतर प्रवेशाचा ड्रॉप उचलल्या गेला....शकुंतला आपल्या मैत्रिणींसह बागेतील झाडांना पाणी घालते आहे असे दृष्य दिसू लागले. शकुंतलेला बघताच प्रेक्षकांनी कडाडून टाळी दिली. ही टाळी नारायणानं शकुंतलेचे सोंग वठवले त्याला होती. शकुंतलेच्या सादरीकरणाला (बेअरिंग) होती. नंतर तिच्या चेहऱ्याभोवती भुंगा घिरट्या घालतो आणि ती घाबरून सख्यांना हांक

मारते. त्यावेळचा अभिनय सुंदर झाला.... ''सखे अनसूये''..... ह्या पदाच्या वेळी कोरांटीच्या झाडाला अडकलेला पदर सोडवून घेणे.....पायांत दर्भांकुर रूतल्यामुळे वेदना झाल्या असे दाखवणे.... जातांना दुष्यंताकडे चोरट्या नजरेने पाहणे ह्या सार्‍या अभिनयाला प्रेक्षकांकडून पसंतीची टाळी मिळत गेली. शाहू महाराज, देवल मास्तर, शंकरराव मुजुमदार, सारेच खूष झाले. नाटक अेक सारखे रंगत गेले ''असे वर्णन पहिल्या प्रयोगाबद्दल गोविंदराव टेंबे ह्यांनी आपल्या आत्मवृत्तात करून ठेवले.

शाकुंतलचा पहिला प्रयोग रंगला. नारायणाचे पहिलेच नाटक त्याच्या उज्वल भविष्याची ग्वाही देत राहिले. उपस्थित रसिकवृदांनी अतीव समाधान व्यक्त केले. ''भाऊरावाचं नाव राख'' म्हणून शाहू महाराजांनी नारायणाला पहिल्या प्रयोगाआधी सांगितलं, नारायणानं त्याचं पालन केलं. त्या दिवशी.....पुढे अनेक वर्ष.

अनाथ झालेल्या किर्लोस्कर मंडळीला त्यांचं सौभाग्य नारायणाच्या स्त्री भूमिकेने परत मिळालं।

## ॥ ३ ॥

१८८० साली पुण्याच्या आनंदोद्भव रंगमंदिरात किर्लोस्करांनी तीन अंकी शाकुंतलचा प्रयोग केला होता. जणु आनंदाची सुरूवात झाली-आनंदःअुद्भव ! त्यानंतर संपूर्ण शाकुंतलचा प्रयोग पूर्णानंद (पूर्णःआनंदः) रंगमंदिरात केला. १९०७ साली किर्लोस्कर नाटक मंडळींना पंचवीस वर्ष झाली. परंतु १९०१ साली भाऊराव कोल्हटकरांचा मृत्यू झाला. दुसरा कुठलाही चांगला नट स्त्री पार्ट करायला उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत किर्लोस्कर नाटक मंडळी कशी चालवावी ह्याची चिंता जिथे शंकरराव मुजुमदारांना लागली होती, तिथे रौप्य महोत्सवाचे विचार सुद्धा मनांत आणणं शक्य नव्हते. परंतु नारायणराव बालगंधर्व कंपनीत आले. इतकेच नव्हे तर शकुंतलेची भूमिका अतिशय चांगल्या तऱ्हेने करू लागले तेव्हा शंकररावांना अधिक उत्साहाने रौप्य महोत्सव साजरा करावासा वाटला तर काहीच नवल नव्हते. त्याप्रमाणे रौप्य महोत्सवाकरता श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे नवीन नाटक निवडले ''गुप्तमंजुष''. नारायणरावांची प्रसिद्धी पुण्याला अगोदरच पोहोचली असल्याने नाटकाला लोकांनी अतोनात गर्दी केली. नंदिनीच्या वेषात नारायणाला बघताच लोकांनी कडाडून टाळी दिली. त्यावरून लोकांना त्यांना बघायची केवढी उत्कंठा लागली होती ह्याचा अंदाज यावा. सर्वसामान्य प्रेक्षकांमध्ये हार्मोनियम पटू भाचूभाई भांडारे, गोविंदराव टेंबे, तबला वादक कांताप्रसाद, सुप्रसिद्ध नट मोरोबा वाघोलीकर इत्यादी जाणकार होते. त्या दिवशी नारायणरावांचा आवाज नेमका बसला होता परंतु हा दोष त्यांनी अतिशय लीलया झांकून टाकला. आपल्या आवाक्यातल्या ताना, आलापी करून लोकांना मंत्र-मुग्ध करून टाकले. जवारीदार सुरेल आवाज, अत्यंत लवचिक गळा, दाणेदार तान, ताल-लय ह्यांचा उपजत पक्केपणा ह्यांनी लोक भारावून गेले. एकंदर गाण्यातील संथपणा आणि संयम कल्पनातीत होता. अगदी सर्वसाधारण रागांत ते एखादा विसंवादी स्वर : अशास्त्रीय स्वर, अभावितपणे तरीही इतक्या झोकांत लावत कि त्यामुळे जणु कांही त्या रागाला दृष्ट लागू नये म्हणून त्या विसंवादी स्वराची तीट लावली आहे असे वाटावे......नारायणराव बालगंधर्वांनी आपल्या पहिल्या

दर्शनानेच पुणे जिंकून घेतले. त्यानंतर मुंबईवर स्वारी केली. तिथेही तीच गत ! शाकुंतल, सौभद्र (अण्णासाहेब किर्लोस्कर) शारदा, मृच्छकटिक (देवल) मूकनायक, गुप्तमंजुष (श्री. कृ. कोल्हटकर) इत्यादी नाटकांनी बालगंधर्व रसिकांना नुसते पादाक्रांत करीत गेले. भाऊराव कोल्हटकरांपेक्षा काकणभर सरसच अशी प्रसिद्धी बालगंधर्वांची सर्व दूर झाली. किर्लोस्कर नाटक मंडळीच्या भरभराटीला सीमा राहिली नाही !

नाटकातील काम करणाऱ्या नट मंडळीबद्दल त्या काळांत जनमानसांत विचित्र कल्पना असत. त्यामुळे नाटकांत काम करणाऱ्या मुलांची लग्ने जमवणे कठीण काम असे. नारायणरावांचे लग्न करून देण्याची जबाबदारी कंपनीने स्वीकारल्यावरच नारायणरावांच्या आईने त्यांना कंपनीत जायची परवानगी दिली होती. नानासाहेब जोगळेकर आणि काशीनाथपंत परचुरे ह्या मंडळींनी आपलेपणाने त्यांचा लग्न समारंभ घडवून आणला. श्री. सखारामपंत गाणगापूरकर ह्यांची मुलगी वधू नेमस्त करण्यात आली. मुलीचे नांव लक्ष्मी. काळी-सावळी आणि साधारण रूपाची. सखारामपंतांचा आणि नारायणरावांचे वडील श्रीपादरावांचा चांगला परिचय होता. लग्न समारंभ पुण्यात, सांगली करांच्या वाड्यांत १९०७ साली झाला. त्यावेळी नारायणरावांचे वय अेकोणीस वर्षाचे होते. ह्या विवाहामुळे श्रीपादरावांना आणि अन्नपूर्णाबाईंना तर आनंद झालाच पण किर्लोस्कर नाटक मंडळीतली जबाबदार मंडळी देखील, एका मोठ्या जबाबदारीतून मुक्त झालो, ह्यांत समाधान मानू लागली.

''गुप्तमंजुष'' नाटकाच्या वेळी एक अप्रिय घटना घडली. शंकरराव मुजुमदार आणि गोविंद बल्लाळ देवल ह्यांचे कडाक्याचे भांडण झाले आणि देवल कंपनी सोडून निघून गेले. त्यामुळे देवलांचे नाट्यशिक्षण नारायणरावांना मिळू शकले नाही. वास्तविक बालगंधर्वांना घडवण्यात देवलांचा फार मोठा वाटा होता. पुढील आयुष्यांत नारायणरावांना देवलांचा खूप फायदा झाला असता. देवलांनी नारायणरावांना शिकवायला सुरूवात केली तेव्हा गंधर्वांचे वय तसे पाहिले तर-कोवळेच होते. त्यांच्या समजूतदारपणात नव्हाळीच होती त्यात परिपक्वता

फारशी आली नव्हती. नंतरच्या परिपक्व काळांत देवलांचे मार्गदर्शन लाभते तर कदाचित् बालगंधर्वाचे वेगळे दर्शन घडले असते. तरीही परमेश्वर कृपेने देवलांची कमतरता नंतरच्या काळांत भरून निघाली हे ही तितकेच खरे.

पुण्याच्या ''गुप्तमंजुष'' नाट्य प्रयोगाच्या दृष्टीने आणखीन एक विचित्र घटना घडली. तिच्याबद्दल देखील सांगायला हवे. प्रयोगाच्या आदल्या दिवशी नारायणरावांचे मामा-दत्तुमामा बेलेकर-कंपनीच्या बिऱ्हाडी आले आणि रागावून नारायणाला हाताला धरून जबरदस्तीने आपल्या बिऱ्हाडी नेले. कारण त्यांचे आणि श्रीपदरावांचे, नारायण-रावांच्या वडिलांचे भांडण झाले. त्यांचे, म्हणजे नारायणरावांच्या वडिलांचे म्हणणे असे की दत्तुमामाने कंपनीकडून पैसे खाऊन नारायणाला नाटक कंपनीत रूजू केले. वडिलांच्या मनांत नारायणाने नाटक कंपनीत जाऊ नये असे होते. कारण नारायणाचे दुसरे दोन मामा नाटक कंपनीत होते आणि तिथे त्यांना फारसा फायदा झाला नव्हता. दुसरे दिवशी ''गुप्तमंजुष''चा प्रयोग आणि आदल्या दिवशी किर्लोस्कर कंपनीची संगीताची मंजुषा गुप्त झालेली। त्यामुळे कंपनीतल्या मंडळींना बरीच चिंता लागली. परंतु पुण्यांत त्यावेळी केशवराव कोगजे नावाचे एक पोलीस इन्स्पेक्टर होते. त्यांनी मुजुमदारांना दिलासा दिला. नारायणरावांवर पाळत ठेवली. शंकरराव मुजुमदारांनी लोकमान्य टिळकांच्या मध्यस्थीने श्रीपदरावांची समजूत घालून नारायणरावांना कंपनीत परत आणले. नाटक छान पार पडले.

शाकुंतल, सौभद्र, शारदा, मूक नायक इत्यादी नाकांतील स्त्री भूमिका ह्यापूर्वी कुणींनाकुणी अगोदर केल्या होत्या. नारायणरावांच्या त्या सर्वस्वी स्वतःच्या अशा नव्हत्या. सर्व प्रथम त्यांचीच भूमिका असा योग श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी लिहिलेल्या ''मतिविकार'' ह्या नाटकामुळे आला. त्यातील सरस्वतीची भूमिका त्यांची स्वतःची स्वतंत्र अशी होती. देवल मास्तरांच्या पश्चात् नारायणरावांना शिकवण्याचे काम शंकरराव मुजुमदार आणि गणपतराव बोडस ह्यांनी केले. ही दोघंही मंडळी देवलांच्या तालमीत तयार झाली होती.

मतिविकार नाटकानंतर किर्लोस्कर नाटक मंडळींनी

कोल्हटकरांचेच "प्रेमशोधन" नाटक रंगभूमीवर आणले. नाटकाची रंगीत-तालीम बघून कोल्हटकर स्वतः समाधानी नव्हते म्हणून त्यांनी कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ह्यांना तालमी घेण्याची विनंती केली. बालगंधर्वाच्या दृष्टीने हा एक फार चांगला योग होता. दोघांना एकमेकांची : त्यांच्या कलादृष्टीची, चांगली ओळख पटली. बालगंधर्वाची अभिनयपटुता आणि गायनातले सौंदर्य काकासाहेब खाडिलकरांना जवळून बघायला मिळाले. शिवाय खाडिल-करांच्या शिकवण्याच्या पद्धतीने नारायणरावांचा खूप फायदा झाला. देवलांनी घट्ट घातलेल्या पायावर बारीक सारीक कलाकुसर करून खाडिलकरांनी त्यांच्या अभिनयाची इमारत अधिक देखणी केली. त्यांच्या अभिनयाला खाडिलकरांनी सौंदर्य दिले. तर नारायणरावांच्या अभिनय क्षमतेमुळे आणि गोड गायनामुळे खाडिलकरांना संगीत नाटके लिहिण्याची स्फूर्ती दिली. त्या काळापर्यंत खाडिलकरांची गद्य नाटके खूप लोकप्रिय झाली होती. लोकांची त्यांच्याकडून संगीत नाटकाची अपेक्षा होती. खाडिलकरांचे नाट्य लेखन आणि बालगंधर्वाचे अभिनय-पटुत्व एकत्र यावे असे लोकांना वाटत होते.

खाडिलकरांना संगीत नाटक लिहिण्याची आवश्यकता वाटावी अशी आणखीन एक घटना त्या काळांत घडली. किर्लोस्कर नाटक मंडळींच्या प्रेमशोधन ह्या नाटकाच्या तालमीच्या वेळी बालगंधर्वाचा आवाका किती मोठा आहे हे खाडिलकरांना अनुभवायला मिळाले. महाराष्ट्र नाटक मंडळी त्या काळात खाडिलकरांनी लिहिलेली-सवाई माधवराव ह्यांचा मृत्यू, कीचकवध, भाऊबंदकी, कांचनगडची मोहना, बायकांचे बंड : अशी एकाहून एक सरस गद्य नाटके सादर करीत होती. किर्लोस्कर संगीत नाटकाच्या तोडीचे ते प्रयोग होत असत. खाडिलकर नाट्याचार्य म्हणून ह्या नाट्यकृतींने गाजले होते. शिवाय टिळकांचे भक्तः केसरीमध्ये जळजळीत अग्रलेख लिहिणारे तेजस्वी राजकारणी अशीही त्यांची ख्याती झाली होती. परंतु एक दिवस नरसिंह चिंतामण केळकर आणि खाडिलकर ह्यांच्या मध्ये एकाएकी तीव्र मतभेद झाले. त्याच्या परिणामी खाडिलकरांनी केसरीमधली नोकरी सोडली आणि दुसऱ्या दिवसापासून नाटक लिहावयास सुरूवात केली. नाटकाचं नाव

होते "संगीत मानापमान." त्यांना संगीतातील फारसे गम्य नव्हते. त्यामुळे किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर ह्यांच्या सारखे स्वतःपदे रचून त्याला संगीतबद्ध करणे. त्यांच्या दृष्टीने अवघड काम होते. स्वतः चांगले लेखक असल्यामुळे नाटकांतील पद्य ते रचू शकत होते. पण चाली देण्याकरता दुसऱ्या कुणाची मदत आवश्यक होती. शिवाय संगीत नाटकांतील पदे तयार करण्याचे तंत्र त्यांना तितकेसे अवगत नव्हते. म्हणून त्यांनी प्रथम नांदीची दोन पदे तयार करून किर्लोस्कर मंडळीत आणली. "नमन नटवरा" आणि "मोद हराचा प्रेम वाढवो" ही ती दोन पदे. ह्या पदांना चितोबा गुरव ह्यांनी संगीतबद्ध केलं. परंतु त्या काळांतली पद्धत वेगळी होती. आधी त्या त्या प्रसंगाला अनुरूप अशा चाली निवडायच्या आणि त्या चालींवर शब्द चढवायचे. किर्लोस्कर : देवल इत्यादींना स्वतःच चाली निवडायच्या असल्याने दुसऱ्या कुणाची गरज पडली नाही. खाडिलकरांना मात्र गोविंदराव टेबे ह्यांची मदत घ्यावी लागली. टेबे स्वतः प्रसिद्ध हार्मोनियम वादक म्हणून महशूर होते. त्यांच्या मदतीने खाडिलकरांनी मानापमान मधली पदे तयार केली.

रीतसर, खाडिलकरांनी लिहिलेल्या मानापमान नाटकाचं वाचन झालं. हे वाचन गणपतराव बोडस ह्यांनी केलं. सर्वांना नाटक आवडलं हे सांगायला नकोच. पात्र रचना ठरवण्यांत आली. त्यांत भामिनीची प्रमुख भूमिका बालगंधर्व : धैर्यधर नानासाहेब जोगळेकर : लक्ष्मीधर, गणपतराव बोडस अशी प्रमुख पात्रे निवडल्या गेली आणि काकासाहेबांनी मानापमान नाटकाच्या तालमी घ्यायला सुरूवात केली.


खाडिलकर फार शिस्तप्रिय होते आणि बालगंधर्व तितकेच अघळ-पघळ. त्यामुळे सुरूवातीसुरूवातीला दोघांचे खटके उडतः अर्थात काकासाहेबांच्या समोर कुणाची बोलायची प्राज्ञा नव्हती. तालमींना सगळ्यांनी वेळेवर हजर रहावे ह्यावर त्यांचा कटाक्ष असे. जशा तालमी ठराविक वेळी सुरू होत तशाच त्या ठराविक वेळी बंद होत. खाडिलकर तालमी फार सुरेख घेत. प्रत्येक पात्राला त्यांच्या भूमिका समजावून देत. वाक्यांची : पदांची फोड करून त्याचं मर्म समजावून सांगत. त्यामुळे तालमी देखील परिणामकारक होत. देवलांची पद्धत आणि

काकासाहेबांची पद्धत ह्यात हा महत्त्वाचा फरक होता. देवल वाक्याचे आघात सांगत, अक्टिंग करून दाखवत तर खाडिलकर त्याबरोबरच त्या वाक्याचे : त्या प्रसंगाचे आणि एकंदर परिणामाचे सुंदर विवेचन करून नटांना त्या भूमिकेत शिरायला शिकवत. त्यांच्या सांगण्यामुळे धैर्यधर : लक्ष्मीधर, भामिनी ह्या सर्वांची कामे सुरेख होत. खाडिलकरांनी गणपतरावांनी बोडस ह्यांच्या लक्ष्मीधराच्या कामांत रंगभरला तर जोगळेकरांनी धैर्यधर त्यांच्या मनाप्रमाणे उभा केला. त्यांचा आवाज भूमिकेला योग्य असा चढा होता - त्याचबरोबर मधुर आणि रस-परिपोषक असा होता. बालगंधर्वांना ते सुरेख साथ देत. नाटकातील प्रमुख पात्र-धैर्यधर : भामिनी : लक्ष्मीधर-खाडिलकरांनी खूप मेहनत घेऊन सुरेख बसवली त्यामुळे नाटक रंगणार ह्याची खात्री तालमीतच वाटू लागली. सर्व ठाकठीक झाल्यावर किर्लोस्कर नाटक मंडळीचा मानापमान नाटकाचा प्रयोग मुंबई मुक्कामी रिपन थिओटरमध्ये बारा मार्च १९११ ह्या दिवशी जाहीर झाला. नाट्याचार्य खाडिलकर ह्यांचे पहिले संगीत नाटक : आपल्या गायनाभिनयामुळे गाजलेल्या बालगंधर्वांची प्रमुख भूमिका आणि हार्मोनियम वादनामुळे प्रसिद्धीच्या शिखरावर असलेले गोविंदराव टेंबे ह्यांचे संगीत असा त्रिवेणी संगम असलेल्या नाटकाला रसिकांनी गर्दी केली नसती तरच नवल. प्रयोग जाहीर झाल्याच्या दुसऱ्या दिवशीच नाटकाची सगळी तिकिटे खपली. इतकेच नव्हे तर दुसऱ्या-तिसऱ्या प्रयोगाची पण तिकिटे संपली.

## ॥४॥

बारा मार्च १९११ रोजी मुंबईच्या रिपन थिअेटरमधे संगीत मानापमानचा पहिला प्रयोग जाहीर झाला. बघतां बघतां सर्व तिकिटे खपली. किर्लोस्कर नाटक मंडळींच्या बिऱ्हाडी सगळी धावपळ! त्या दिवशी किर्लोस्कर नाटक मंडळींचे गावोगांवचे स्नेहीमंडळी मुंबईत कंपनीच्या बिऱ्हाडी जमली. मंडळीचे बिऱ्हाड अेखाद्या लग्न मंडपासारखे गजबजून गेले. सगळीकडे एकच उत्साह ओसंडून वहात असता बातमी आली की बालगंधर्वाची अेकुलती अेक चिमुकली कन्या तडकाफडकी वारली!

सगळे जण सुन्न होऊन गेले. किर्लोस्कर मंडळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते नारायणरावांच्या सांतवनांसाठी जमले. नारायणराव खाली मान घालून बसले हाते. बारा तारखेचा शुभारंभाचा प्रयोग बंद ठेवावा असे सर्वानुमते ठरले. शंकररावांनी तसे बालगंधर्वाना सांगताच - बालगंधर्व एकदम मान वर करून म्हणाले.. ''झालं ते झालं! नाटक बंद ठेवू नका!'' आपल्या एकट्याच्या दुःखामुळे अनेक रसिकांचे सुख कशाला हिरावून घ्यायचे ? त्यांचा विरस कशाला करायचा ? अशा वृत्तीने नारायणरावांनी आपले दुःख गिळून टाकले आणि रंगायला गेले. त्या दिवशीचा रिपन थिअेटर मधला मानापमान नाटकाचा प्रयोग अतिशय गाजला. लोकांच्या पसंतीला उतरला. नारायणरावांनी खाडिलकरांना अपेक्षित असलेली भामिनीःखाडिलकरांच्या शिकवण्याबरहुकूम उभी केली. गद्य आणि गायन प्रभावीपणे अभिनित केले. बालगंधर्वाचं प्रत्येक गाणं एकाहून एक सरस होत गेलं. भामिनीचा आढ्यतेखोरपणा जितका उन्मत्तपणे दाखवला तितकाच वनमालेचा हळुवारपणा लोकांच्या नजरेत भरला. धैर्यधराबरोबरचा शृंगाराचा भाग देखील खूप सुरख रंगवला. गणपतराव बोडसांचा लक्ष्मीधर पाहून लोकांची हसून हसून मुंरकुंडी वळली. नारायणरावःगणपतराव आणि नानासाहेब जोगळेकर ह्यांनी जणूः आपआपल्या जीवनांतली सर्वोत्कृष्ट भूमिका केली. १९११ साली मानापमान नाटक रंगले ते आजपावेतो रंगतच आले आहे.



**नाट्य मिलिंद - गोविंद बल्लाळ देवल**

नारायणाचा रंगभूमीवरचा प्रवेशच मुळी देवलांच्या मार्गदर्शनाखाली झाला. त्यांनी नारायणाला - स्त्री हसते कशी, रडते कशी, हुंदके कशी देते, कृत्रिम कोप कसा प्रगट करते, लाडात कशी येते, लाजते कशी सारे शिकवले. वारंवार त्याच्याकडून करवून घेतले. अवलोकन शक्तीची महती सांगितली .... देवळात : घाटावर : विहिरीवर : संस्थानिकांच्या घरी : समाजातील सर्व स्तरांतील स्त्रीयांचे अवलोन करायची संधी दिली.

नारायणाच्या स्त्रीभूमिकांना अनेक पैलूंनी घडवले. त्याचा भरभक्कम पाया रचला.

सौजन्य : श्री. वसंतराव अुढगांवकर, सांगली.

मानापमानांतील संगीत योजना ह्यापूर्वीच्या संगीत नाटकांपेक्षा वेगळी होती. तरीही रसपरिषोषक होती म्हणून ख्याल गायकीच्या पद्धतीची असूनही सर्वसाधारण लोकांना पसंत पडली. नाट्यपूर्ण कथानक, सुस्पष्ट स्वभावचित्रण, आणि सौभद्र रंगभूमीवर आल्यानंतर इतर नाटकांत न दिसलेली शृंगाररसांची खुलावट ह्या मानापमान नाटकाच्या जमेच्या बाजू होत्या. वरपांगी रुक्ष दिसणाऱ्या खाडिलकरांचे अंतरंग किती नजाकती आहे त्याची प्रचीती ह्या नाटकांत दिसली. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या ''मतिविकार'' आणि ''प्रेमशोधन'' ह्यातल्या भूमिका पूर्वी कोणी केल्या नव्हत्याः बालगंधर्वांनी त्या प्रथम रंगवल्या. त्या भूमिकेत ते फार मोहक दिसत होते. फार मंजुळ गात होते. पण त्या भूमिकांचे अंतरंग रसिकांवर छाप पाडण्यासारखे समृद्ध नव्हते. मानापमानने ही कमतरता भरुन काढली. ह्या नाटकातील पद्याइतकेच, किंबहुना त्याही पेक्षा जास्त, गद्य समर्थ होते आणि खाडिलकरांच्या शिक्षणामुळे नारायणरावांना ते गद्य प्रभावीपणे रसिकांसमोर मांडता आले.

नारायणरावांबरोबर मानापमान नाटक रंगवण्यात नानासाहेब जोगळेकर ह्यांचा सुद्धा फार मोठा वाटा होता. त्यांचा आवाज चढा असला तरी मधुर आणि रसपरिपोषक असा होता. बालगंधर्वाबरोबर ते अत्यंत समरसतेने गात आणि त्यांच्या प्रमाणे प्रसंगाशी तादात्म्य होऊन भूमिका वठवीत. त्यातल्यात्यात शृंगाराचे प्रवेश दोघंही भूमिकेशी एकरूप होऊन वठवीत असल्याने फार सुंदर होत.

नानासाहेब जोगळेकरांनी बालगंधर्वाच्यापूर्वी किर्लोस्कर नाटक मंडळीत प्रवेश केला होता. भाऊराव कोल्हटकरांना त्यांचे गाणे आवडल्यामुळे त्यांनी लोकमान्य टिळकांच्या मध्यस्थीने जोगळेकरांना किर्लोस्कर नाटक मंडळीत आणले होते. त्यामुळे किर्लोस्कर मंडळीना एक चांगला नायक मिळाला होता. मानापमान नाटकांमुळे त्यांचे नाट्यगुण लोकांच्या नजरेत भरले. जवळ जवळ आठ महिने मानापमानचे प्रयोग प्रचंड गर्दीत सुरू असतानाच नोव्हेंबर महिन्यात काविळाचा विकार होऊन जोगळेकरांचा करूण अंत झाला! किर्लोस्कर मंडळींवर फार मोठा आघात झाला.

भाऊराव कोल्हटकरानंतर किर्लोस्कर नाटक मंडळीची धुरा नानासाहेब जोगळेकर सांभाळीत होते. त्यांच्या मृत्यूनंतर ही जबाबदारी नारायणराव बालगंधर्व:शंकरराव मुजुमदार आणि गणपतराव बोडस ह्यांच्याकडे आली. त्याचप्रमाणे जोगळेकरांच्या पश्चात् गोविंदराव टेंबे नवीन नायक म्हणून रूजू झाले. मानापमान नाटकाच्या अपूर्व यशानंतर खाडिलकरांनी दुसरे संगीत नाटक लिहिले - ''संगीत विद्याहरण!'' कच-देवयानीच्या पौराणिक कथेवर आधारित हे नाटक होते. ह्यातील चाली बालगंधर्व:भास्करबुवा बखले गोविंदराव टेंबे ह्यांच्या होत्या. गोविंदरावांच्या बरोबरच कृष्णराव गोरे नावाचे चांगले गाणारे नट नाटक मंडळीत आले होते. विद्याहरण नाटकात गोरे शुक्राचार्य:बालगंधर्व-देवयानी:गोविंदराव-कच आणि गणपतराव-शिष्यवराची विनोदी भूमिका अशी योजना झाली. १९१३ साली मे महिन्यात बिद्याहरण नाटकाचा पहिला प्रयोग पुणे येथील किर्लोस्कर नाट्यगृहांत झाला. हाही प्रयोग खूप रंगला आणि मानापमान प्रमाणे ह्याही प्रयोगाला सपाटून उत्पन्न होऊ लागले. श्री. कृष्णराव गोरे ह्यांचे शुक्राचार्यांचे काम विशेष गाजले. दरम्यान शंकरराव मुजुमदार आणि बालगंधर्वादि मंडळीत अनेक गोष्टीत मतभेद झाले. परिणामी बालगंधर्व:गणपतराव बोडस आणि गोविंदराव टेंबे ह्यानी किर्लोस्कर मंडळी सोडून वेगळी कंपनी स्थापन करण्याचे ठरवले. हा विचार त्यांनी बोलून दाखवल्यावर त्याबाबतीत अनेक हितकर्त्यांनी उलट सुलट विचारविनिमय केले. किर्लोस्कर नाटक मंडळी एकसंघ ठेवायचा प्रयत्न अनेक स्तरावरून झाला. त्यात रामगणेश गडकरी, शाहू महाराज, तात्यासाहेब - न. चि. केळकर ही मंडळी प्रमुख होती. पण ह्या मंडळींना यश आले नाही. बालगंधर्व:गोविंदराव टेंबे आणि गणपतराव बोडस ह्यांनी किर्लोस्कर नाटक मंडळींना रामराम ठोकून नवीन कंपनी काढली. नाट्याचार्य खाडिलकरांनी सुचवल्याप्रमाणे नवीन कंपनीचे नाव - ''गंधर्व नाटक मंडळी'' ठेवण्यांत आले. स्थापनेचा दिवस होता पाच जुलै १९१३. पेणचे इनामदार विनायक शिवराम धारकर ह्यांच्याकडून बालगंधर्वानी भांडवल मिळवले. हे पहिले कर्ज! कोल्हटकरांचे ''गुप्तमंजुष'' ''मतिविकार'' ''मूकनायक'' देवलांचे ''मृच्छकटिक'' ''शापसंभ्रम'' ''शारदा'' खाडिलकरांचे ''मानापमान'' ''विद्याहरण''

इत्यादी नाटके करायचे गंधर्व कंपनीने ठरवले. त्याप्रमाणे १९१३ साली तीन सप्टेंबरला ''मूक नायक'' ह्या नाटकाच्या प्रयोगाने गंधर्व नाटक मंडळी लोकांसमोर आली. किर्लोस्कर कंपनीतून रागावून निघून गेलेले देवल मास्तर गंधर्व कंपनीत आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तालमी झाल्या असल्याने ''भूकनायक'' नाटक बेफाम रंगले. एकापाठोपाठ एक नाटके रंगत गेली आणि गंधर्व नाटक मंडळीचे नाव सर्वतोमुखी झालं. वर्षभर व्यवस्थापकाचे काम संभाळल्यावर त्रिंबकराव साठे निवृत्त झाले आणि बाळासाहेब पंडित त्यांचे काम बघू लागले. त्यांनी बागंधर्वाचे खूप कोड कौतुक केले. त्यापायी अफाट पैसा खर्च होऊ लागला. ह्यातील बहुतांश खर्च बालगंधर्व स्वतः करीत त्यामुळे हळूहळू कुरबूर सुरू झाली. गोविंदराव टेंबे ह्यांनी त्यावर खरपूस टीका केली, कुरबुरी वाढत गेल्या. तशांत गोविंदरावांचा आवाज त्रास देऊ लागला. त्यांना गाणे शक्य होइना म्हणून त्यांनी कंपनीच्या मालकीतून आपले अंग काढून घेतले.

स्थापनेपासून केवळ दोन वर्षात गंधर्व मंडळीला तडा जायला सुरुवात झाली. बालगंधर्वाचे एकंदर गोष्टींकडे फारसे लक्ष नसे. शिवाय गणपतराव बोडसांची कडक शिस्त आणि बाळासाहेब पंडित – व्यवस्थापक ह्यांची बेछूट वागणूक, त्यामुळे गंधर्वातला नटवर्ग फारसा समाधानी नव्हता. दरम्यान देवलांनी त्यांच्या जुन्या ''फाल्गुनराव अर्थात तसबिरीचा घोटाळा'' ह्या गद्य नाटकाला संगीताचा साज चढवून, थोडा फेरफार करून ''संगीत संशयकल्लोळ'' नावाने नवीन नाटक बसवायला सुरुवात केली. तेव्हा बालगंधर्वाना प्लूरसीचा विकार जडला. ते नाटकांत निदान कांही महिनेतरी काम करू शकणार नव्हते. त्यांची उणीव भरून काढण्याकरता भास्कर बुवा बखले ह्यांचा पट्टशिष्य ''मास्तर कृष्णा'' हा बुवांच्या पुढाकाराने गंधर्व मंडळीत सामील झाला आणि लगेच त्याने देवलांच्या शारदा नाटकांत शारदेची भूमिका केली. बालगंधर्वाची प्रकृती सुधारल्यावर देवलांनी संशयकल्लोळ नाटकाच्या तालमींना सुरवात केली, नाटक तयार झाले पण पहिल्या प्रयोगापूर्वीच देवलांचे १४ जून १९१६ रोजी निधन झाले. अत्यंत रसपूर्ण नाट्यपदे रचणारे, वास्तववादी चित्रण नाटकांतून करणारे, समर्थपणे

तालीम घेऊन नाटक बसणारे देवल वारले. त्यांची उणीव गंधर्वांना जाणवली. ते लिहून देणार असणारे "वत्सला हरण" नावाचे संगीत नाटक तसेच राहिले. शिवाय एक चांगला तालीम मास्तर जगातून नाहीसा झाला.

१९१६ सालापासून मुंबईला संशयकल्लोळ नाटकाचे प्रयोग सुरू झाले. नाटक अतिशय रंगत असे. त्यांत अश्विनशेठ ह्या गायक नटाची भूमिका गोविंदरावांच्या ऐवजी गंधर्व नाटक मंडळीत नव्याने प्रवेश केलेल्या दत्तोपंत पेठकर ह्यांनी केली. फाल्गुनराव गणपतराव बोडस, रेवती-बागंधर्व, कृत्तिका-सदाशिव रानडे अशी पात्र योजना होती. "एक उत्कृष्ट विनोदी नाटक" असा मान ह्या नाटकाने मिळवला. रेवतीच्या खेळकर आणि शृंगारिक भूमिकेत बालगंधर्वांनी बहार उडवून दिली ! गणपतरावांनी त्यांना खूप चांगली साथ दिली. आपल्या "गंभीर" वागण्याने आणि बोलण्याने त्यांनी विनोद निर्माण केला- स्वतः विनोदी न राहता ! शिवाय पौराणिक भूमिकेतून बाहेर पडून अद्यावत् साज शृंगार बालगंधर्वांना करायला मिळाल्याने त्यांचे एक वेगळे रूप रसिकांसमोर सादर झाले.

नोव्हेंबर महिन्यांत संशयकल्लोळ गाजत असतांनाच डिसेंबर महिन्यात खाडिलकरांच्या नव्या - "संगीत स्वयंवर" नाटकाचा प्रयोग जाहीर झाला. बालगंधर्वःखाडिलकर आणि भास्करबुवा बखले हे अतिश्रेष्ठ त्रिकूट ह्या नाटकाशी संबंधित होते. त्यात कृष्ण-बोडस, रूक्मिणी, बालगंधर्व भीष्मक-जगन्नाथबुवा पंढरपूरकर, रुक्मी दत्तोपंत पेढकर, महाराणी-रघुवीर सावकार, स्नेहलता-रानडे आणि दिनेश्वर ज्योतिषी देवधर अशी पात्र रचना होती. पण प्रत्यक्षांत बालगंधर्व-रानडे पंढरपूरकरबुवा ही खरी आकर्षक पात्र होती. त्यातही रूक्मिणीला ह्या नाटकांत खाडिलकरांनी खूप महत्त्व दिल्यामुळे आणि बालगंधर्वांना मनसोक्त गायनाची पदे त्यांनी आणि भास्करबुवांनी दिल्यामुळे स्वयंवर हे पूर्णतः बालगंधर्वांचेच नाटक होत असे. शिवाय सजावट रंगमंचःकपडेपट ह्यांत गंधर्वांनी अगदी खुला हात ठेवला होता त्यामुळे सर्वच बाबतीत "स्वयंवर म्हणजे स्वयंवर" वाटावं अशा थाटांत स्वयंवरचे प्रयोग होत. "मानापमान" आणि "विद्याहरण" पेक्षा ह्यांतील

शृंगाराची जात थोडी वेगळी आहे. त्याला त्यागाचे कोंदण आहे. बालगंधर्व हा शृंगार अतिशय उच्च पातळीवर नेऊन खुलवत. त्या दोनही नाटकांपेक्षा ह्यातील गाणे देखील वजनदार होते. त्यांत कुठेही रुक्षता नव्हती. ह्या नाटकाने मराठी माणसाला तर भुरळ पाडलीच पण महाराष्ट्रीयेतर जमातीत सुद्धा ह्या नाटकाबद्दल आकर्षण निर्माण झाले-बालगंधर्व महाराष्ट्राचे न राहता सर्वांचे झाले हे फार मोठं यश स्वयंवर नाटकाने बालगंधर्वांना मिळवून दिलं. अमाप पैसा ह्या नाटकाने गंधर्व कंपनीला मिळाला. आपल्या एकट्याच्या खांद्यावर नाटक तोलुन नेण्याची शक्ती बालगंधर्वांनी ह्या नाटकाद्धारे दाखवली. त्यांच्या बद्दलचा कौतुकाचा काळ संपून भक्तीचा काळ सुरू झाला। अलादियाखाँ सारखे शास्त्रीय संगीतातील आचार्य स्वयंवराच्या प्रयोगाला आवर्जून हजर राहू लागले। त्यातील संगीताचा आस्वाद घेण्याकरता.

स्वयंवराचे असे वैभवशाली दर्शन घडवीत असतां बालगंधर्वांनी राम गणेश गडकरी ह्यांच्या जवळ नवीन नाटकाची मागणी केली. शालू शेले आणि दागदागिन्यांनी नटलेली वैभवशाली राजकन्या अभिनित करणाऱ्या बालगंधर्वांना गडकरी म्हणाले ''माझ्या नाटकांत तुम्हाला फाटके लुगडे नेसून दळावे लागेल। आहे कबूल ?'' त्यावर बालगंधर्व म्हणाले - ''देवा, फाटके लुगडेच काय, गोणपाट नेसून देखील काम करायला तयार आहे !'' गडकऱ्यांनी ''एकच प्याला'' नावाचं नाटक बालगंधर्वांकरता लिहायला सुरवात केली आणि नाटक हाती पडताच त्यांच्या तालमींना सुरवात झाली. गद्यभाग हाती आला होता पण पदे मिळाली नव्हती. दरम्यान गडकऱ्यांना क्षयाचा विकार जडून त्यांची प्रकृती खालावली. तेव्हा त्यांचे मित्र विठ्ठल सीताराम गुर्जर ह्यांनी एकच प्याला मधील गाणी तात्पुरती केली. गडकऱ्यांची तब्येत सुधारल्यावर कायम स्वरूपाची पदे गडकरी मास्तर करून देणार होते. तालमी जोरात सुरू झाल्या. गणपतराव बोडस, सुधाकर, बालगंधर्व सिंधू, रामलाल-पंढरपूरकर बुवा, तळीराम-देवधर गीता-रानडे अशी पात्र योजना झाली. नाटकाचा पहिला प्रयोग १९१९ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत बडोद्याच्या महाराजांसमोर करायचे ठरले. त्याप्रमाणे महाराजांसमोर तो प्रयोग झाला. पहिल्या प्रयोगाची तारीख होती वीस फेब्रुवारी १९१९. महाराजांना प्रयोग खूप आवडला. खूष होऊन त्यांनी गंधर्व मंडळींना

नेहमीपेक्षा दोन हजार रूपये जास्त दिले. परंतू दुर्देवाने त्यावेळी गडकरी जिवंत नव्हते. बरोबर एक महिना आधी २३ जाने. १९१९ रोजी सावनेर येथे त्यांचे निधन झाले.

बडोद्याचा प्रयोग यशस्वी करून गंधर्वांनी मुंबईला प्रयोग करायला सुरवात केली. ह्या एकच प्यालाचे विराट दर्शन मुंबईकरांना घडताच भयंकर खळबड उडाली. शारदा आणि कीचकवध ह्या नाटकाचा अपवाद सोडला तर अशी खळबळ ह्यापूर्वी कधीच उडाली नव्हती. दारूचा भयानकपणा इतक्या ''तेजस्वी'' पणाने ह्यापूर्वी कुणीच दाखवला नव्हता. विनोदी नट म्हणून विख्यात असलेल्या गणपतरावांची सुधाकराची शोकरसपूर्ण भूमिका, पंढरपूरकरबुवांची धीर गंभीर भूमिका:तळीरामाच्या कामातील देवधरांचा विनोद रानड्यांची आतापर्यंत साकार केलेल्या भूमिकेपेक्षा सर्वस्वी वेगळी तेजस्वी गीता आणि आजपर्यंत राणी महाराणीच्या वैभवशाली दिमाखात नर्मशृंगार सजवीत आनंदानं गात असलेल्या बालगंधर्वांची कारूण्यमय सिंधू-सारेच प्रेक्षकांना अवाक् करून सोडणारे होते. ''मानस कां बधिरावे?'' हे करूण पद म्हणत प्रवेश करणारी कारूण्यमय मूर्ती प्रेक्षकांना ढवळून टाकत असे. आतापर्यंत नर्मशृंगारात आनंदानं पोहत असणारे प्रेक्षक गंधर्वाबरोबर ढसाढसा रडायला तयार होत होते. बालगंधर्वांनी वेगळ्या स्वरूपात त्यांना जिंकून घेतलं!

रामगणेश गडकऱ्यांच्या आणि त्यांनी रंगवलेल्या, एकच प्याला नाटकांतील सिंधूच्या संदर्भात कविवर्य कुसुमाग्रज फार सुंदर आणि तितकेच सडेतोड भाष्य करून गेले. ते म्हणाले - ''रामगणेश गडकरी म्हणजे प्रतिभेचे जंगल।'' एकच प्याला नाटकांतही ही जंगलाची छाया दिसते. पण ह्या जंगलांत गडकऱ्यांनी एक नाजुक वेल मोठ्या नजाकतीने जोपासली आहे. ती म्हणजे सिंधूची व्यक्तिरेखा! तिच्या रेखाटनात रांगडेपणाचा अंशही नाही. आहे ते स्त्रीत्त्वाचे एक तरल, हृदयस्पर्शी असे करूणामय दर्शन!''

हे दर्शन एकच प्यालामधे गडकऱ्यांनी शब्दबद्ध केले!...... बालगंधर्वांनी त्याला मूर्त स्वरूप दिले!

* * * *

## ॥ ५ ॥

गणपतराव बोडस हे राम गणेश गडकरी ह्यांचे मित्र होते. स्वतःला बालगंधर्वांपेक्षा जवळचे समजत होते. स्वाभाविकच त्यांना आणि बालगंधर्वांना समोर ठेऊन गडकऱ्यांनी नाटक लिहिलं असणार आणि बालगंधर्वांपेक्षा ''एकच प्याला'' ह्या नाटकांत स्वतःला जास्त महत्त्वाची भूमिका असणार अशी गणपतराव बोडस ह्यांची कल्पना. परंतु बालगंधर्वांनी साकारलेली सिंधू इतकि अप्रतिम होती कि सर्व नाटक सिंधूच्या भोवती भोवती फिरत राहिले. तेव्हा गणपतरावांचे स्नेही नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर गमतीनं म्हणाले --

''गणपतराव, गडकऱ्यांनी तुमच्यासाठी शिवलेला कोट नारायणरावांचा अंगाला फिट्ट बसला.''

नाटकांत विनोदी काम करणे त्या मानाने पुष्कळ सोपे असते पण करुण भूमिका वठविणे महाकठीण. बालगंधर्व हे कठीण काम अतिशय सहजतेने करायचे. खऱ्या नटाची कसोटी हे करुण काम कसे करतो ह्यावरच होत असते. नारायणराव बालगंधर्व ह्या परीक्षेत १०० टक्के मार्क मिळवून उतरले होते. ''एकच प्याला'' नाटकांतील सिंधू म्हणजे खऱ्या आर्यललनेची प्रतिमा होती. पतीला दारूच्या व्यसनापासून वाचवण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न ती करते. त्यासाठी अनेक यातना, वाटेल तो अपमान ती सहन करते आणि पतीपासून विभक्त होण्याचे नाकारते. स्वतःचा आणि आपल्या चिमुकल्या अपत्याचा बळी देते. ही भारतीय स्त्रीची प्रतिमा बालगंधर्व जीव तोडून साकार करीत होते. आतापर्यंतच्या अनेक भूमिकांतून वेगळी भूमिका त्यांनी दैदिप्यमान रीतिने सादर केली. प्रेक्षकांना मुक्तपणे अश्रु विमोचन करायला लावणारी ही भूमिका त्यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवीत असे. गडकऱ्यांचे एकच प्याला आणि बालगंधर्वांची सिंधू ही दृष्ट लागण्यासारखी जोडी जमली होती.

''एकच प्याला'' च्या अपूर्व यशानंतर खाडिलकरांचे ''द्रौपदी'' नाटक गंधर्वांनी सादर करायचे ठरवले. त्याच्या तयारीसाठी गंधर्वांनी अफाट खर्च केला. कपडे पट, रंगमंचाची सजावट, राजांचे मुकुट इत्यादिसाठी होणारा हा खर्च गंधर्व मंडळीचे भागीदार आणि अतिशय

व्यवहारी अशा गणपतराव बोडसांना मुळीच पटला नाही. त्यांचे आणि नारायणराव बालगंधर्वांचे ह्या बाबतीत वारंवार खटके उडू लागले. त्याचे पर्यावसान शेवटी गणपतरावांनी भागीदारी सोडण्यांत झाले. नारायणराव एकटे मालक झाले. मग काय ? कशालाच धरबंध राहिला नाही. गंधर्व नाटक मंडळीचे त्या काळातले व्यवस्थापक बाळासाहेब पंडित ह्यांनी बालगंधर्वांना आवर घालण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. ह्या उलट असा प्रयत्न करू पाहणाऱ्या गणपतराव बोडस ह्यांच्याशी ह्या बाबतीत नारायणरावांची बाजू घेऊन हुज्जत घालत असत. ह्यामुळे दोन गोष्टी झाल्या. गणपतरावांसारखा एक चांगला नट आणि त्याहीपेक्षा उत्तम नाट्यशिक्षक आणि तालीममास्तर कंपनी सोडून गेला आणि नारायणरावांना मोकळे रान मिळाले. त्याचे दूरगामी परिणाम गंधर्व नाटक मंडळींना भोगावे लागले. बाळासाहेब पंडितांचा मनमानी कारभार, आणि नारायणराव बालगंधर्वांचा त्यांच्यावर असलेला अंधविश्वास ! परिणामी गंधर्व मंडळीवर एक लाख ऐंशी हजार रूपयांचे कर्ज झाले. त्यापैकी बरीच रक्कम जबर व्याज दर कबूल करून उचलली होती आणि त्यांतही महद्‌आश्चर्याची गोष्ट म्हणजे बालगंधर्वांना त्याची म्हणावी तशी कल्पना नव्हती. कारण बाळासाहेब कोणते व्यवहार करीत ह्याची त्यांनी कधी चौकशी केली नव्हती. बाळासाहेबांना देखील त्यांना चालू असलेल्या व्यवहाराची कल्पना द्यावी ह्याची आवश्यकता वाटली नव्हती. त्यामुळे गंधर्व मंडळींना इतकं कर्ज झालं आहे ह्याचीच जाणीव त्यांना नव्हती. ही जाणीव झाली अतिशय अपमानास्पद परिस्थितीत.

मुंबईचा लांबलेला मुक्काम हलवून कंपनी पुण्याला जायला निघाली. सर्व सामानाची बांधाबांध झाली आणि ते स्टेशनवर नेण्याची तयारी करीत असतांच एका सावकाराच्या पठाणाने ते सामान अडवले !! त्या प्रकारामुळे गंधर्व कंपनीच्या कर्जाचा बभ्रा सर्व मुंबई भर झाला. सावकाराच्या पठाणाने सामान अडवले ह्याची चर्चा मुंबईभर होऊ लागली. नारायणराव आणि सर्वच मंडळी आश्चर्यचकित आणि भयभीत झाली. ह्या महत्त्वाच्या प्रसंगी ज्यांच्यामुळे हा प्रसंग ओढवला ते बाळासाहेब पंडित, त्यांच्यावरील पैशाच्या अफरातफरीच्या

मामल्यात सोलापूर मुख्त्यारमी कोर्टकेसमधे गुंतले होते. त्या खटलाच्या निकाल नेमका तेव्हाच लागून त्यांना तुरूंगवासाची शिक्षा झाली! बालगंधर्वांना धीर देणारे कोणीच नव्हते. अशा प्रसंगी त्यांचे जुने चाहते सॉलिसिटर लाड पुढे आले. सर्व हिशोब तपासून पाहिले तेव्हा लक्षांत आले की गंधर्व कंपनीला एकंदर बहात्तर सावकारांचे मिळून एक लाख ऐंशी हजाराचे कर्ज आहे. मात्र ह्या कर्जात बालगंधर्वांनी स्वतःसाठी एका दिडकीचाही खर्च केला नव्हता. कर्जाची ही वार्ता मुंबईत हां हां म्हणता पसरली आणि बालगंधर्वांचे चाहते आणि नाट्यरसिक ह्यापैकी धनिक मंडळींनी मुंबईच्या मर्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीत सभा घेतली आणि एका आठवड्याच्या आंत ही रक्कम उभी करण्याची हमी घेतली. नारायणरावांना ही हकीगत समजतांत ते गहिवरले आणि म्हणाले ''देवा माझ्यासाठी फंड जमवू नका. माझ्या चुकीमुळे झालेले कर्ज माझे मलाच फेडले पाहिजे. ते फिटेपर्यंत आपणा सर्वांचे आशिर्वाद आणि प्रभूची कृपा कायम असावी इतकीच माझी प्रार्थना आहे. !!!''

नारायणरावांच्या मनाचा मोठेपणा ह्या लहानशा प्रतिक्रियेत व्यक्त होतो. दरम्यान आणखीन एक चांगली घटना घडली. ती सांगायला हवी. बालगंधर्व आणि बाळासाहेब पंडित ह्यांच्या मनमानी कारभारामुळे डिसेंबर १९१९ मधे गणपराव बोडसांनी गंधर्व कंपनी सोडली होती आणि ते होळकरांच्या यशवंत नाटक कपनीत रूजू झाले होते. ''संशय कल्लोळ'' नाटकांत फाल्गुनराव, ''एकच प्याला' मधे सुधाकर ह्या भूमिका ते खरोखरीच चांगल्या करीत. त्यांच्या पश्चात् ह्या भूमिका इतरांच्या वाटेला गेल्या. नारायणराव जरी ह्या दोन्ही नाटकांत उत्तम भूमिका करीत होते, तरी गणपतरावांची साथ मिळत असलेल्या शकार-लक्ष्मीधर इत्यादि भूमिका इतर सामान्य नट करीत असल्याने खुलत नसत. त्यामुळे मानापमान, मृच्छकटिक, एकच प्याला, संशय कल्लोळ वगैरे नाटके पूर्वीच्या मानाने रंगतीत कमी पडू लागले. शिवाय गणपतराव एक चांगले तालीम मास्तर सुद्धा होते. त्यांच्या पश्चात् तालमींना विस्कळितपणा येत चालला होता. ह्या सर्व दृष्टींनी विचार करून गणपतरावांना पुन्हा गंधर्व कंपनीत आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. तिकडे गंधर्व मंडळीतल्या शिस्तशीर आणि राजेशाही व्यवस्थेत

सरावलेल्या गणपतरावांना यशवंत मंडळीतले वातावरण फारसे अल्हाददायक वाटत नव्हते. १९२१ च्या जानेवारी महिन्यांत यशवंत कंपनी सोडल्यावर गणपतरावांनी पुन्हा गंधर्व नाटक मंडळीत ''पगारी नोकर'' म्हणून प्रवेश केला. गणपतराव कंपनीत परतल्यावर पुन्हा सर्वांच्या तालमी त्यांनी घ्यायला सुरूवात केली. विस्कळित झालेली नाटकं त्यांनी शिस्तशीरपणे मार्गी लावली आणि सगळे प्रयोग पुन्हा सुरळीतपणे सुरू झाले. पूर्वीसारखे रंगू लागले. गणपतराव:बालगंधर्व ही जोडी एकत्र पाहून लोकांना पण आनंद झाला.

कर्जाचा मानसिक धक्का बालगंधर्वांना जरूर बसला. पण त्यातून ते लवकरच सावरले आणि नेहमीचे नाट्य प्रयोग धूमधडाक्यात सुरू झाले. गणपतराव परत आल्यामुळे सगळ्या गोष्टी पुन्हा शिस्तशीर सुरू झाल्या. रसिकांनी पूर्वी सारखी गर्दी करायला सुरूवात केली.

एक ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळक ह्यांचे निधन झाले. १९२१ साली महात्मा गांधींनी ''टिळक स्वराज्य फंड'' उभारण्याचे ठरवले. त्या फंडाच्या उभारणीसाठी नारायणराव बालगंधर्व आणि केशवराव भोसले ह्यांनी मिळून ''संयुक्त मानापमानचा'' प्रयोग करावा अशी कल्पना डॉ. रामकृष्ण हरी भांडारकर ह्यांनी नारायणरावांसमोर मांडली. लोकमान्य टिळकांनी नारायणरावांच्या आयुष्याला चांगले रूप आणले होते आणि त्याची ही जाणीव बालगंधर्वांना होती. तेव्हा त्यांनी ह्या कल्पनेला नुसती संमतीच दिली असं नव्हे तर पुढाकार घेऊन स्वतः केशवराव भोसले ह्यांना भेटायला आणि ही कल्पना समजावून सांगायला पुण्याला गेले. तिथे केशवराव भोसले ह्यांची ''ललितकलादर्श'' ही नाट्यसंस्था आपले प्रयोग करीत होती. कंपनीच्या बिऱ्हाडी नारायणराव जाऊन केशवरावांना भेटले. केशवरावांनी ताबडतोब संमती दिली. संयुक्त मानापमानचा प्रयोग आठ जुलै १९२१ रोजी ग्रँट रोडवरील बालीवाला थियेटरमधे होणार असे जाहीर झाले.

आता थोडं केशवराव भोसले ह्यांच्या बद्दल सांगायला हवे. १८९० साली जन्मलेले केशवराव हे बालगंधर्वांपेक्षा दोन वर्षांने लहान. वयाच्या पंधराव्या वर्षी ते जनुभाऊ निमकर ह्यांच्या ''स्वदेश हितचिंतक''

मंडळीत दाखल झाले. तिथे त्यांना नाट्याचार्य गोविंद बल्लाळ देवल ह्यांनी शारदा नाटकातली शारदेची भूमिका शिकवली आणि त्यांनी ती अतिशय सुरेख रीतिने सादर केली. ही भूमिका सर्वार्थाने गाजली. शारदेचे "मूर्तिमंत भीति उभी...." हे गाणं केशवराव अतिशय सुंदर गात. ह्या गाण्याला इतके "वन्समोअर" मिळत की अनेकदा मंडळीचे चालक जनुभाऊ निमकर ह्यांना स्टेजवर येऊन हात जोडून प्रेक्षकांना विनंती करावी लागे की "नटाचे बालवय लक्षांत घेऊन त्याला अधिक त्रास देऊ नये !" शारदा नाटकांत केशवराव भोसले ह्यांनी केलेल्या शारदेची बरोबरी पुढील आयुष्यांत कोणत्याही नटाने केली नव्हती हे सांगितले म्हणजे केशवरावांबद्दल सगळे सांगितले असे होईल. वयाच्या अठराव्या वर्षी केशवरावांनी "स्वदेश हितचिंतक" मंडळी सोडली आणि स्वतःची "ललितकलादर्श" नावाची कंपनी स्थापन केली. किर्लोस्कर, देवल, आणि कोल्हटकर ह्यांची नाटके यशस्वी रितीने सादर करून १९१३ साली वीर वामनराव जोशी ह्या अमरावतीच्या नाटककाराचे "राक्षसी महत्त्वाकांक्षा" नावाचे नाटक करायला सुरूवात केली. त्यात केशवराव मृणालिनीची भूमिका करीत. राक्षसी महत्त्वाकांक्षा ह्या नाटकाने "ललितकलादर्शला" खूप पैसा आणि कीर्ती मिळवून दिली. साधारण १९१३ च्या आसपासची ही स्थिती. परंतु केशवरावांना स्त्री भूमिका तितक्याशा जमत नव्हत्या. त्यांचे गाणे आक्रमक होते, चमत्कृतीजन्य होते, आणि खड्या आवाजातले होते. जसजसे वय वाढले तसतसे ह्याची जाणीव जास्त प्रमाणांत होऊ लागली म्हणून ते पुरूष भूमिकेकडे वळले. मानापमानांत धैर्यधरःविद्याहरणांत कच" मृच्छकटिकांत चारूदत्तः हाच मुलाचा बाप ह्या नाटकात गुलाबःशहा-शिवाजी नाटकांत शिवाजी ह्या त्यांच्या भूमिका खूप गाजल्या. त्यांचा स्वतःच्या एक चाहता वर्ग निर्माण झाला होता. तो सर्व महाराष्ट्रभर होता : मुंबईतही होता. केशवरावांचा होता तसा बालगंधर्वांचा पण होता. हा चाहता वर्ग असा विचित्र होता की तो दुसऱ्याचे नाटक कधीच बघत नव्हता !

"ललित कला दर्श" आणि गंधर्व नाटक मंडळी ह्यांच्या संस्थामधून पात्रांची आणि वादकांची निवड करण्यात आली. ह्या प्रयोगाच्या निमित्ताने "केशवःनारायण" ह्या आपआपल्या क्षेत्रांतील महान

कलाकारांना एकत्र पहायची, ऐकायची संधी मिळणार होती. त्यासाठी महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून मुंबईला प्रेक्षक मंडळी एकत्र झाली. प्रयोग बेफाम रंगला. आलेली रसिक मंडळी तृप्त झाली. मनोमनी नारायण:केशव तुलना करू लागली. वास्तविक ही तुलना अयोग्य होती. एवढे मात्र खरे की केशवरावांच्या विद्युल्लते सारख्या तेजस्वी गायनाने रसिकांवर असामान्य परिणाम केला. शिवाय मनानापमानमधे धैर्यधरचे गाणे मुळातच आक्रमण असल्याने केशवरावाचे असामान्य तेज प्रेक्षकांना दिपवून गेले.

केशवराव आणि नारायणराव ह्यांचा गायनाची तुलना होणे कठीण आहे. बालगंधर्वाचे गायन मंजुळ:हळुवार:मादक, हृदयाला हलवून सोडणारं, स्त्री सुलभ, म्हणून ते सादर करीत असलेल्या स्त्री भूमिकेला अनुरूप असे, तर केशवरावांचे गायन तेजस्वी:आक्रमक:बुद्धीला आवाहन करणारे, पुरूषी। त्यांच्या आवाजाला रुंदी आणि तेज होते आणि ते गातही उंच पट्टीत. त्यांची काम करण्याची पद्धत आणि गायनादी गोष्टी धैर्यधराच्या पात्राला शोभणाऱ्या असल्याने मानापमान नाटकांत त्यांनी बालगंधर्वावर मात केली. टिळक स्वराज्य फंडाकरता संयुक्त मानापमानाचा प्रयोग झाल्यावर संयुक्त सौभद्रचा प्रयोग करून येणारे उत्पन्न दोन्ही संस्थांनी वाटून घ्यायचे असे ठरले. त्याप्रमाणे झालेल्या संयुक्त सौभद्र नाटकात मात्र सुभद्रेचं काम करणाऱ्या नारायणरावांनी बाजी मारली. हया प्रयोगाप्रमाणे असेच संयुक्त प्रयोग करावयाचे असे दोन्ही संस्थानी ठरवले असतांनाच अवघ्या तीन महिन्यानंतर ४.१०.१९२१ रोजी केशवराव भोसले ह्यांचे पुणे मुक्कामी विषमज्वराने निधन झाले।

बालगंधर्वाच्या आयुष्यांतली ही विचित्र शोकांतिका म्हणावी लागेल. प्रत्येक वेळी कांही खूप चांगले घडत असतांना जणु दृष्ट लागून कांही वाईट गोष्टी घडत गेल्या. किर्लोस्कर मंडळीत असतांना त्यांच्या कलाजीवनाला आकार यायला सुरूवात झाली तोच त्यांचे आद्य शिक्षक गोविंदराव देवल व्यवस्थापकांशी मतभेद होऊन किर्लोस्कर मंडळी सोडून गेले, खाडिलकरांसारखा नाट्याचार्य त्यांच्या करता मानापमान सारख्या अप्रतिम नाटकाची निर्मिती करतो, तोच त्याच्या पहिल्या शुभारंभाच्या प्रयोगाच्या

दिवशीच त्यांच्या एकुलत्या एक कन्येचा मृत्यू झाला. मानापमान नाटकाला बहर येत असतांनाच त्यांचे निकटचे सहकारीः धैर्यधराची भूमिका अप्रतिम करणारे नानासाहेब जोगळेकर ह्यांचे निधन झाले. विद्याहरण नाटकाला चांगले उत्पन्न होत असतांनाच किर्लोस्कर नाटक मंडळीत फाटाफूट झाली. स्वतःच्या कंपनीचे मूकनायक ह्या पहिल्या नाटकानंतर गोविंदराव टेबे भागिदारीतून बाहेर पडले....स्वयंवर :एकच प्याला ही नाटके लोकप्रियतेची कमान गाठत असतांनाच गणपतराव बोडस कंपनी सोडून गेले आणि एकच प्यालाच्या तोडीचे दुसरे नाटक देऊ शकणारे राम गणेश गडकरी एकच प्याला रंगभूमीवर यायच्या आतच निजधामाला गेले। आता संयुक्त प्रयोग करून कर्ज फेडीची योजना आखीत असताच केशवराव भोसले ह्यांचे निधन झाले. मला वाटतं सुरूवातीपासून शेवटपर्यंत दुर्दैव असे अधुन मधुन त्यांच्याशी आट्या-पाट्या खेळीत राहिलं। पण आपल्या कलेवरील अकृत्रिम निष्ठा आणि असंख्य रसिकांचे प्रेम ह्या दोन गोष्टींच्या जोरावर गंधर्वांनी त्यावर बहुतांशी मात केलीःत्यावर विजय मिळवला।

❋ ❋ ❋ ❋

## ॥ ६ ॥

द्रौपदी नाटकामुळे गंधर्व मंडळींना कर्ज झालं असा बभ्रा त्यावेळी सगळीकडे झाला. त्यामुळे खाडिलकर व्यथित झले. ''गंधर्व मंडळींवरचं कर्ज फिटेपर्यंत मी द्रौपदी नाटकाच्या प्रयोगाचे पैसै घेणार नाही'' असे त्यांनी सांगितले. त्यानंतर लिहिलेल्या ''मेनका'' ह्या नाटकाच्या वेळी त्यांनी ह्या कर्जाची जाण ठेवली. त्यातले सगळे पुरूष उघड्या अंगाचे रंगवले. मेनकेला देखील फक्त पहिल्या अंकात शालू नेसायला मोकळीक ठेवली नंतरच्या अंकात फक्त एक साधं पातळ नेसून विश्वामित्राच्या आश्रमात सेवा करायला लावली. मास्तर कृष्णराव ह्यांनी निवडलेल्या चालींवर नाट्याचार्यांनी पदे रचली होती. नाटक सामान्य असल्याने फारसे चालले नाही. बालगंधर्वाची काही गाणी गाजली पण पैसा मिळवून देण्यास ह्या नाटकाचा फारसा उपयोग झाला नाही. मात्र कंपनीला ह्या नाटकामुळे सांपत्तिक नुकसान सहन करावे लागले नाही, हेही तितकेच खरे. त्यापूर्वी गंधर्व कंपनीने यशवंत नारायण टिपणीस यांचे ''आशा-निराशा'' हे नाटक रंगभूमीवर आणले. त्यांत गंधर्वांनी गायलेले ''नाचत रसिकांस'' ''तात करी दुहिता'' ''दिलरूबा हा जिवाचा'' ही गाणी बरीच लोकप्रिय झाली. त्यांनी ''लंकेरी'' ची केलेली भूमिका सोडली तर त्या नाटकांत काही विशेष जीव नव्हता. नंतर विठ्ठल सीताराम गुर्जर ह्यांचे ''नंदकुमार'' हे नाटक गंधर्व कंपनीने रंगभूमीवर आणले. श्री. गुर्जर हे राम गणेश गडकऱ्यांच्या ''एकच प्याला'' ह्या नाटकाचे पद्य लेखक म्हणून नावरूपाला आले होते. पण नाटक चालले नाही. कांही पदे चांगली होती. दोन्ही नाटकांना मास्तर कृष्णराव ह्यांचे संगीत होते. गंधर्व जीव तोडून काम करीत होते पण नाटकाने पैसा दिला नाही. सुरूवातीचे प्रयोग चांगले रंगत पण ते तितक्यापुरतेच राहिले. पैशाच्या दृष्टीनेही नाटके समाधानकारक राहिली नाहीत. कदाचित् बालगंधर्वाच्या अभिनयाला विशेष स्थान ह्या दोन्ही नाटकात नव्हते हे कारण असू शकेल. तसे पाहिले तर १९२६ साली रंगभूमीवर आलेल्या मेनका ह्या नाटकांत आणि तेही त्यातल्या पहिल्या अंकात - ही मी आले जळायला-म्हणत हिरवाकंच शालू नेसून बालगंधर्वांनी प्रवेश केला

आणि जे काम त्या अंकात केलं तेच त्यांचे अखेरचे सुरेख काम म्हणता येईल. त्यानंतर त्यांनी केलेल्या कोणत्याही नव्या नाटकात आपली छाप त्यांना पाडता आली नाही-तशा छाप पाडण्यालायक भूमिका त्यांच्यांसाठी लिहिल्या गेल्या नाहीत हेही तितकेच खरे.

१९२८ साली वसंत शांताराम देसाई ह्या तरूण आणि नवीन नाटककाराचे तीन अंकी नाटक ''संगीत विधिलिखित'' खास बडोद्याचे महाराज ह्यांच्या विनंतीवरून सादर केले. निमित्त होते युवराज फत्तेसिंहाचे लग्न. बरीच खटपट करून गणपतराव बोडस ह्यांना पुन्हा गंधर्व मंडळीत आमंत्रित केले होते. त्यांनी वसंतरावाचे नाटक ठाकठीक बसवले. मुळात नाटक तीन अंकी ठरले होते. पण गाणी वाढली. त्यामुळे संवाद वाढले. असे करत करत तीन अंकाऐवजी नाटक चांगले ऐसपैस पाच अंकी झाले.

साधारणपणे १९२१ ते १९२७ ह्या काळांत गंधर्व कंपनी बहुतांश काळ पश्चिम महाराष्ट्रातच आपले प्रयोग करीत होती. कारण लोकाश्रय बरा मिळत होता. थोडी थोडी कर्जाची फेड होत होती. पण नंतर १९२८ साली कंपनीने वऱ्हाडचा दौरा काढला आणि कंपनीच्या नाटकाला जत्रे सारखी गर्दी होऊ लागली. त्यातल्या त्यात अमरावती मुक्कामी कंपनीला खूप पैसा मिळाला. आजू-बाजूच्या गावांतून लोकांच्या झुंडीच्या झुंडी नाट्यगृहाकडे झेपावु लागल्या. ही मंडळी तिकिटासाठी सोन्याचं कडंही समोर ठेवायची ! नाट्यगृह तुडुंब भरले असायचे तरीही लोकांची तिकिटासाठीची गर्दी ओसरत नव्हती. अनेक स्त्रियांना शेवटी एका विंगेत बसवावं लागे आणि नटांना फक्त उरलेल्या एकाच विंगेचा उपयोग करता येई. अनेकांनी बालगंधर्व कधीच पहिला नसल्याने भरजरी शालू नेसून येणारं पहिलं पात्र म्हणजेच बालगंधर्व समजून कडाडून टाळी पडे, मग लक्षांत येई ''हा गंधर्व नव्हे !'' मग नंतरच्या शालूवाल्याला टाळी पडे......हा ही गंधर्व नाही ! असे एक दोनदा झाल्यावर फाजील सावधगिरी बाळगून लोक शांत रहात. मात्र त्यांचं गाणं सुरू झाल्यावर ''हाच तो गंधर्व'' अशी खात्री पटून टाळ्यांचा कडकडाट होई.

नाटकांना अभूतपूर्ण गर्दी होत असे - ''काय वाटेल ते पैसे घ्या पण आम्हाला नाटक पाहू द्या......आम्ही बाहेरगावांहून नाटकासाठी आलो.....'' असा तगादा लोक लावीत. रूक्मिणी, भामिनी, सिंधू ह्या भूमिकांनी बालगंधर्वांनी लोकांना जिंकून घेतलं. वऱ्हाड मधल्या मुक्कामात कंपनीला अमाप पैसा मिळाला. गंधर्व कंपनीने उरले सुरले कर्ज फिटले. आतापर्यंत कंपनीने व्याजासकट जवळ जवळ पावणेतीन लाख रूपये सावकारांच्या घशांत ओतले ! गंधर्व नाटक मंडळी आणि पर्यायानं बालगंधर्व कर्ज मुक्त झाले. अर्थात ह्यांत दादा काटदरे यांची कंपनीच्या कारभारावर असलेली चोख नजर आणि लाडसाहेबांचा सहानुभूतीचा हात ह्यांचा फार मोठा सहभाग होता.

आणि नेमक्या ह्याच काळात बालगंधर्वांची उपवर मुलगी कमला ऊर्फ ताई, ही वारली !

दैवानं पुन्हा एक आट्यापाट्याचा डाव मांडला !

ही बातमी घेऊन बालगंधर्व अमरावतीला परतले त्या दिवशी मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग तुडुंब भरलेल्या अमरावतीच्या थिएटरमधे बालगंधर्वांनी केला.

पहिल्याच प्रवेशात भयभीत झालेल्या वसंतसेनेचा पाठलाग करत शकार येतो असा प्रसंग गंधर्व मंडळी रंगवीत होती. प्रेक्षकांत उपस्थित असलेल्या वसंत शांताराम देसाई ह्यांना बघता बघता शकार म्हणजे जणू दुर्दैवच बालगंधर्वांच्या मागे हात धुवून लागले आहे असं वाटू लागलं ! ऋण मुक्तीचा आनंद मानायचा कि कन्याविरहाच दुःख ?

पण ह्या संकटांची आणि सुख-दुःखाची बालगंधर्वांना सवय झाली होती. नटाचा चेहरा दाखवतांना चित्रकार एकाच मुखवट्याचे हसरा चेहरा आणि रडका चेहरा एकाच फलकावर रंगवतात. बालगंधर्व जणू ते जीवनच जगत आले होते.

ऋणमुक्त झालेल्या गंधर्व नाटक मंडळीने विधिलिखित ह्या नाटकाचा पहिला प्रयोग १९२८ च्या एप्रिल महिन्यांत केला. प्रयोग ठाकठीक झाला. परंतु बालगंधर्वांची नक्कल पाठ नसल्यामुळे विशेष रंगला नाही. प्रयोगाव्यतिरिक्त दोन महत्त्वाच्या गोष्टी ह्या नाटकाच्या वेळेला झाल्या. एक म्हणजे गंधर्व कंपनीने सर्वप्रथम मखमालीचा पडदा



**अण्णासाहेब किर्लोस्कर**

अण्णासाहेबांच्या शाकुंतल नाटकातल्या शकुंतलेच्या रूपानं नारायणाचं दर्शन नाट्यरसिकांना झालं. त्यातली शकुंतला वेगवेगळ्या मनोविकारांना आवाहन करणारी होती आणि नारायणानं ते आव्हान यशस्वीपणे पेललं. नारायणाची शकुंतला प्रथमदर्शनीच नाट्यरसिकांना पसंत पडली-नव्हे त्यांना जिंकून गेली. नारायणाचा नारायणराव बालगंधर्व नाट्यरसिकांच्या गळ्यातलं ताईत बनला. त्यावेळी नारायणरावांचे वय होते १९ वर्षे।

वापरला आणि पुढे तबला संगतीसाठी गाजलेले तिरखवा ह्या नाटकापासून कंपनीत तबलासंगतकार म्हणून रूजू झाले.

पौराणिक विषयांवरील कांही नाटके गंधर्वांनी रंगभूमीवर आणली असली तरी भक्तिरसात्मक असे नाटक आतापर्यंत मंडळीने सादर केले नव्हते. विधिलिखित ह्या नाटकापासून गणपतराव बोडस पुन्हा गंधर्व कंपनीत तालीम मास्तर म्हणून सुद्धा आले होते. त्यांच्या विनंतीवरून प्रख्यात कादंबरीकार, ना.वि.कुळकर्णी ह्यांचे संगीत कान्होपात्रा नावाचे नाटक गंधर्व कंपनीने प्रयोगासाठी स्वीकारले. त्या नाटकासाठी मास्तर कृष्णा ह्यांनी पारंपारिक अभंगांना नव्या नेटक्या चाली दिल्या होत्या. कुळकर्ण्यांची भाषा बाळबोध आणि प्रासादिक होती. बालगंधर्वांनी अर्थातच कान्होपात्राची भूमिका केली. ह्या नाटकाच्या निमित्ताने ललितकलेत आपल्या अभिनय कौशल्याने आणि गायनाने प्रसिद्धी पावलेले नटवर्य गंगाधर लोंढे ह्यांनी गंधर्व कंपनीत प्रवेश केला.

जवळपास दोन वर्ष ह्या नाटकाच्या तालमी झाल्या. मास्तर कृष्ण-रावांनी संगीत फार सुंदर दिले. १९३१ च्या नोव्हेंबर महिन्यात मुंबईच्या रिपन थिअेटरांत ह्याचा पहिला प्रयोग झाला. मास्तरांचं संगीतःबालगंधर्वांची भक्तिरसानं आकंठ बुडालेली भूमिका आणि कुळकर्णी ह्यांची प्रासादिक साधी सोपी भाषा ह्यामुळे नाटक लोकांच्या पसंतीला ताबडतोप उतरले. ''नुरले मानस उदास'', पतित तू पावना'', ''देवा धरिले चरण'' आणि लोंढे ह्यांनी गायलेले ''शर लागला तुझा गे'' इत्यादी पदे खूप गाजली. ह्या नाटकाच्या देखाव्यात पंढरपूरचा देखावा हुबेहुब पंढरपूर सारखा दिसला पाहिजे असा बालगंधर्वांचा हट्ट! त्यासाठी बरीच मेहनत घेतली. जवळपास आठ हजार रूपये त्या एका देखाव्यासाठी बालगंधर्वांनी खर्च केले. रंगभूमीवर ज्या कांही गोष्टी करायच्या त्यात कुठलीही कसर राहता कामा नये ही त्यांची प्रथमपासूनची वृत्ती. ह्या वृत्तीपायी त्यांनी आर्थिक संकटे सोसली. शेवटपर्यंत ही वृत्ती कांही त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. वास्तविक, हा देखावा तयार नसतांना एक तात्पुरता देखावा करून प्रयोग सुरू केला. हा तात्पुरता देखावा प्रेक्षकांना पसंत पडला होता : पण बालगंधर्वांना चैन पडत नव्हती.

कान्होपात्रा नाटकामुळे भक्तिरसात आकंठ डुंबत असलेले नारायणराव लोकांना वेड लावून गेले. नारायणरावांचे हे सर्वस्वी वेगळे रूप होते - आता पर्यंत सादर केलेल्या रूपापेक्षा. शिवाय तल्लीन होऊन ते भजन म्हणू लागले म्हणजे प्रेक्षक भक्तिरसात न्हाऊन निघत होते. ह्या सगळ्याचे श्रेय बालगंधर्वांना जेवढे होते तेवढेच लेखक कुळकर्णी ह्यांची प्रासादिक भाषा आषि मास्तर कृष्णराव ह्यांच्या सुरेख बांधलेल्या चालींना देखील होते. दोन तीन वर्षाच्या कालखंडानंतर कंपनीचा मुक्काम मुंबईला पडल्यामुळे प्रेक्षकांनी प्रयोगांना प्रचंड गर्दी केली. कान्होपात्रा ह्या यशस्वी नाटकानंतर गंधर्व कंपनीने खाडिलकरांचे "सावित्री" नाटक १९३३ सालच्या मार्च महिन्यांत रंगभूमीवर आणले. गंधर्वांनी सादर केलेले खाडिलकरांचे हे शेवटचे नाटक। कान्होपात्रा ह्या नाटकाच्या वेळी आपल्या गोड गायकीने प्रसिद्धी पावलेव्या गंगाधर लोंढे ह्यांनी सत्यवानाची भूमिका केली. शिवाय ह्याही नाटकात भक्तिरसाला अनुकूल वातावरण खाडिलकरांनी रंगवले होते. प्रयोग ठीक झाला. पण नाटकाचा फारसा बोलबाला झाला नाही.

"सावित्री" नाटकाच्या पाठोपाठ वसंत शांताराम देसाई ह्यांचे "अमृत सिद्धी" नाटक गंधर्वांनी सादर केले. विधिलिखित ह्या त्यांच्या पहिल्या नाटकाच्या यशस्वी सादरीकरणानंतर, आणि ते नाटक प्रेक्षकांच्या पसंतीला उतरल्यामुळे नारायणरावांनी वसंत-रावांना "आमच्यासाठी तुम्ही आणखीन एक नाटक लिहिले पाहिजे" अशी प्रेमळ विनवणी केली होती. त्या अनुषंगाने वसंतरावांनी हे नाटक लिहून त्याची वही नारायणरावांच्या स्वाधीन केली होती. ह्या नाटकाच्या तालमी स्वतः नारायणरावांनीच घ्यायला सुरुवात केली. आता बालगंधर्वांचं वय पंचेचाळीस झालं होते. शरीर स्थूलतेकडे झुकलं होतं. त्यामुळं नाही म्हटलं तरी पाठ करतांना पंचाइत होत होती. नवीन नाटक बसवतांना ह्या गोष्टीची जाणीव होउ लागली. ह्या नाटकाच्या तालमीच्या अनुषंगाने वसंतराव नारायणरावांवर सक्त नाराज होते. नाटकाचा प्रयोग जाहीर झाला त्याच्या दोन दिवस आधी जेव्हा वसंतरावांनी तालीम पाहिली तेव्हा त्यांना ती अतिशय असमाधानकारक वाटली. शिवाय नारायणरावांनी

नाटकाच्या संहितेत केलेली कापाकापी परिणामी नाटकाच्या मूळ भावनेला धक्का लावणारी होती. त्या अनुषंगाने वसंतरावांनी नारायणरावांची बरीच कानउघाडणी केली. शेवटी नाटक व्यवस्थित पाठ झाल्याशिवाय, तालमीत व्यवस्थित बसल्याशिवाय रंगभूमीवर आणायचे नाही असे ठरवून, ठरवलेला शुभारंभाचा प्रयोग पुढे ढकलण्यात आला. आठ-दहा दिवस कसून तालमी करण्यात आल्या. नारायणरावांच्या पाठांतराकडे विशेष लक्ष देण्यात आले आणि शेवटी ऑक्टोबर अखेरीस नाटकाचा प्रयोग झाला. नाटकाच्या आणि नारायण-रावांच्या कामाबद्दल परस्पर विरोधी टीका झाल्या. भूमिका वठवण्यांत आणि रंगभूमीवरच्या दर्शनात गंधर्वाचे वय दिसू लागले. त्यांची अभिनयकला उतरणीला लागल्याची जाणीव सावित्री आणि अमृतसिद्धी ह्या दोनही नाटकाच्या वेळी प्रकर्षाने होऊ लागली. ह्याच सुमारास चित्रपटाचे माध्यम रूप घेऊ लागले होते. त्यामुळे प्रेक्षकवर्ग विखुरला गेला. पहिल्या प्रयोगाच्या वेळी आवर्जून राहणारा गंधर्वांचा प्रेक्षक वर्ग ह्या वेळी तितकासा उत्सुक वाटला नाही. आजपर्यंत गंधर्व कंपनीच्या शुभारंभाच्या प्रयोगाला रसिकांची गर्दी असायची. त्यातील अनेक प्रेक्षक आणि त्यांची आसनेःखुर्च्या, ठरून गेलेल्या असायच्या. तशी परिस्थिती ह्या वेळी दिसली नाही. जणू लोकांची नाटक पाहण्याची वृत्ती उदासीन होऊ लागली होती. नवीन सुरू झालेल्या सिनेमाच्या माध्यमाकडे लोक आकृष्ट होऊ लागले होते.

वैभवाच्या शिखरावर असलेल्या नाट्यकलेची झपाट्याने ओहोटी सुरू झाली. त्या शेवटाची सुरूवात झाल्याच्या खुणा गेल्या काही वर्षांपासून दृग्गोचर होऊ लागल्या होत्या. ह्या नाटकाच्या आणि नंतर होत असलेल्या इतर गाजलेल्या जुन्या नाटकांच्या प्रयोगाच्या वेळी त्या अधिकाधिक दृढ होऊ लागल्या. भविष्याची भीषण स्वप्ने दिसू लागलीत.

* * * *

## ॥ ७ ॥

राजाराम बाबाजी वणकुद्रे ह्यांना एकंदर पाच मुले होती. त्यापैकी शांताराम हा नंबर दोनचा मुलगा. त्याचे शिक्षणांत फारसे लक्ष नव्हते. मात्र तो शिक्षकांच्या आणि आपल्या समवयस्क मित्रांच्या नकला करण्यांत पारंगत होता. ही मंडळी कोल्हापूरची. राजाराम नाट्य व्यवसायांत होते पण तो त्यानी नंतर सोडून दिला होता. कोल्हापुरांत शांतारामचा लौकिक विद्याभ्यासापेक्षा नकलाकार म्हणूनच जास्त होता. एकदा बाबा देवल ह्यांनी देवल क्लबमधे शांतारामच्या नकलाचा कार्यक्रम आयोजित केला. त्यावेळी गंधर्व मंडळीचे भागीदार गोविंदराव टेंबे हजर होते. त्यांना ह्याच्या नकला आवडल्या. त्यांनी राजारामांकडून शांतारामला गंधर्व नाटकमंडळीत नाटकात काम करण्यासाठी जणू कांही मागणी घालून मिळवला. शांताराम गंधर्व नाटकमंडळीत बालकलाकार म्हणून रूजू झाला त्याला आणि त्याच्या वयाची आणखीन कांही मुले होती. त्यांना "मगनलाल" नावाचे नृत्य शिक्षक, नाटकातल्या नाचाचे शिक्षण देत : मानापमान नाटकांत "किती मजेदार हार" नावाच्या नृत्य गायनात इतर मुलांबरोबर शांताराम भाग घेत असे. ही सर्व मुले स्त्री वेषांत - म्हणजे मुलींच्या वेषात नृत्य करीत : नंतर शाकुंतल नाटकांत शांतारामने दुष्यंत महाराजांची दासी "वेत्रवती" हिची भूमिका केली. ह्या नाटकाचा प्रयोग बडोद्याला सयाजीराव महाराज ह्यांच्या समोर करण्यात आला. साधारण वर्षभर शांताराम गंधर्व कंपनीत होता. परंतु त्याला त्याच्या दृष्टीने विशेष शिक्षण मिळाले नाही. मराठी रंगभूमी मात्र खूप जवळून पहायला मिळाली. वर्षभरानंतर कंपनीला एक महिनां सुट्टी मिळाली तेव्हा तो जो कोल्हापूरला परत गेला तो पुन्हा गंधर्व कंपनीत परतला नाही. चार पाच वर्षानंतर आपला मावसभाऊ बाबूराव पेंढारकर ह्याच्या बरोबर १९२० साली महाराष्ट्र फिल्म कंपनीत येऊन दाखल झाला. तिथे श्री. बाबूराव पेंटर ह्यांनी दिग्दर्शित केलेल्या कांही मूकपटांत त्याने महत्त्वाच्या भूमिका केल्या. साधारण चौदा मूकपटांत त्याचा सहभाग होता. पुढे १९२९ साली काही सहकाऱ्यांच्या समवेत त्यानं कोल्हापूर येथेच प्रभात फिल्म कंपनीची स्थापना केली, कांही मूकपटाचे दिग्दर्शन करून पहिल्या दर्जाचा सिनेदिग्दर्शक म्हणून

ख्याती मिळवली. साधारण दोन वर्षानंतर बोलपटाचे युग सुरू झाले. १९३२ साली प्रभात फिल्म कंपनीने "अयोध्येचा राजा" हा पहिला बोलपट काढला. त्याचे दिग्दर्शन शांतारामने (आता व्ही. शांताराम) केले होते. नंतर एकापेक्षा एक सरस बोलपट काढून एक उत्कृष्ट सिनेदिग्दर्शक म्हणून भारतातच नव्हे तर भारताबाहेर ख्याती मिळवली.

१९३४ साली शांताराम ह्यांनी गंधर्व कंपनीचे एकच प्याला नाटक बघितले आणि अनेक लोकांप्रमाणे ते भारावून गेले. गंधर्वांची सिंधूची भूमिका बघून ते अक्षरशः अवाक् झाले. त्यांच्यातला दिग्दर्शक जागृत झाला. त्यांना वाटले असा हा असामान्य नट सिने सृष्टीत आला तर चमत्कार घडवून आणता येईल. ही गोष्ट १९३४ सालातली.

१९३० साली बालगंधर्वांनी आपल्या मुलीचा-सरोजिनीचा विवाह पुण्याच्या डॉ. भास्करराव वाबळे ह्यांच्याशी खूप थाटामाटाने साजरा केला होता. बालगंधर्वांच्या घरांतले हे पहिलेच कार्य. शिवाय बालगंधर्वांची हौस अती दांडगी. जवळदूरची मित्रमंडळी, हितकर्ते, परिचित अशी अनेक मंडळी लग्नाला आवर्जून हजर झाली. जवळ जवळ आठवडाभर पंगती चालू होत्या. वेगवेगळे खाद्यपदार्थ गोडधोड मिष्टान्ने ह्यांची रेलचेल होती. दागदागिने, कपडे ह्यांची खरेदी चालू होती. लग्नाच्या वरातीत इतके शोभिवंत दारूकाम केले की पुण्याच्या ज्ञान प्रकाश दैनिकाने लिहिले 'अशी वरात पुणेकरांनी गेल्या पंचवीस वर्षात पाहिली नसेल", सरोजिनीच्या लग्नात बालगंधर्वांनी जवळ जवळ तीस हजार रूपये-त्या काळांत खर्च केले. बालगंधर्वांच्या खाजगी जीवनातला तो अतिशय आनंदाचा आणि वैभवाचा काळ होता. सरोजिनीच्या लग्नानंतर बालगंधर्वांनी आपल्या जावयाला उच्च शिक्षणासाठी परदेशांत पाठवले. ह्या सर्व प्रकारांत गंधर्वांना पुन्हा कर्ज काढावे लागले. कर्ज फार नव्हते. नाटकाचे प्रयोग करून सहज फेडून टाकू अशी त्यांची कल्पना. वास्तविक मागचे पावणे तीन लाखांचे कर्ज फिटले तेव्हा पासून कांही स्थावर इष्टेट असावी ह्या भूमिकेतून १९२८ साली पुण्याला जागा खरेदी केली. तिथे बंगला बांधावा अशी योजना होती-किंबहूना तसा त्यांच्या आप्तेष्टांचा आग्रह होता. पण जवळ

तितका पैसा नव्हता आणि ''देवा आता कर्ज नको !'' म्हणून तो विचार त्यांनी सोडून दिला होता. स्वतःकरता कर्ज काढण्याची नारायणरावांची इच्छा नव्हती मात्र मुलीचे-सरोजिनीचे-लग्न थाटामाटाने करण्यासाठी त्यांनी बिनदिक्कत कर्ज काढले. कल्पना ही, कि प्रयोग करून फेडून टाकू, धूमधडाक्याने प्रयोग करायची धमक होती पण - आपण थोडं मागं जाउ.....

नारायणरावांच्या कलाबाह्य आणि संसारी जीवनाबद्दल थोडे सांगायला हवे. नाटकवाल्या मंडळींची लग्न होत नाहीत म्हणून नारायणरावांना किर्लोस्कर मंडळीत प्रवेश करून देण्यापूर्वी अन्नपूर्णाबाईनी-नारायणरावांच्या आईने-जोगळेकर आदी किर्लोस्कर मंडळीतल्या प्रमुख मंडळींना गळ घातली होती की नारायणचे लग्न करून देण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली पाहिजे. त्याप्रमाणे त्यांनी १९०७ साली एका साधारण रूपाच्या काळासावळ्या मुलीशी नारायणरावांचा विवाह करून दिला. हे आपण मागे सांगितलेच आहे. नारायणराव लक्ष्मीबाईशी शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिले. मात्र अपत्यसुखाच्या बाबतीत ते दुर्दैवीच ठरले. एक मुलगी आणि दोन मुले बालवयांतच वारली. एक उपवर मुलगी-उरलेल्यातही सर्वात मोठी ताई-बालगंधर्वांचे अमरावती येथे मृच्छकटिक नाटकाचे प्रयोग धूमधडाक्यात चालू असता वारली. ताई अत्यंत सालस, गरीब भाबडी असल्यामुळे नारायणरावांचा तिच्यावर विशेष लोभ होता. तिच्या लग्नाच्या खटपटीत गंधर्व होते. कानांतला मळ काढण्याचे निमित्त झाले. काट्याचा नायटा व्हावा त्याप्रमाणे कानात झालेल्या लहानशा दुखापतीने उग्ररूप धारण केले, मुंबईला नेऊन सगळे उपाय करण्यात आले पण यश आले नाही. ताईचा मृत्यू त्यांना सहन करता आला नाही. त्यांचा प्रसन्नपणा तेव्हा पासून जो हरवला तो त्यांना केव्हाच परत मिळवता आला नाही.

पुत्र प्राप्तीची आत्यंतिक इच्छा दोघांनाही होती. त्यासाठी उपास-तापास, देवधर्म बुवाबाजी सगळ्या गोष्टी उभयतांनी केल्या.....नारायणांचा ह्या गोष्टींवर मुळीच विश्वास नव्हता तरी पण.....केवळ पत्नीच्या इच्छेकरता त्यांनी ह्या केल्या. नारायण

नागबळी ह्या नावाचा धार्मिक विधीसुद्धा! अशा अनेक आध्यात्मिक उपायानंतर लक्ष्मीबाईंना दिवस जाऊन १९३० साली त्यांची प्रसूतीची वेळ आली. ह्या वेळी नक्की मुलगा होणार ह्या विश्वासाने आणि अशा मुलाच्या जन्माच्या वेळी मुलाच्या पित्याने जवळ असले पाहिजे ह्या शास्त्रानुसार नारायणराव लक्ष्मीबाईंच्या प्रसूती समयी त्यांच्याजवळ थांबले. तो शनिवार रात्रीचा समय होता. त्यावेळी द्रौपदीचा प्रयोग जाहीर झाला होता. आयुष्यांत पहिल्यांदा स्वतःच्या सोयीसाठी नारायणरावांनी प्रयोग रद्द करून लोकांचे पैसे परत केले. मुलगा होणार हे वर्तवलेले भविष्य होते - ते खरे ठरले. मध्यरात्री लक्ष्मीबाई प्रसूत होऊन सुरेख मुलगा झाला. सर्वत्र आनंदी आनंद झाला......पण सूर्योदयापूर्वीच त्या मुलाचा मृत्यू झाला. नारायणराव:लक्ष्मीबाईंना जबरदस्त धक्का बसला. दुसऱ्या दिवशी......किंबहूना त्याच दिवशी रविवारी जाहीर झालेला स्वयंवर नाटकाचा प्रयोग नेहमीप्रमाणे बालगंधर्वांनी अप्रतिम रंगवला.

१९३३ साली गंधर्वांनी सादर केलेले अमृतसिद्धी हे त्यांचे शेवटचे नवीन नाटक. त्यानंतर कोणतेही नवीन नाटक गंधर्व कंपनीने रंगभूमीवर आणले नाही. त्यावेळी गंधर्वांचे वय होते ४५ वर्षे. साधारण १९३२ सालापर्यंत गंधर्वांच्या नाटकाला खूप चांगले उत्पन्न होत होते. दरसाल जवळ जवळ पावणे दोन लाख. तरीही बालगंधर्वांचे कर्ज फिटेना. त्याचे मुख्य कारण म्हणजे अफाट खर्च. रंगभूमीला:रंगभूमीवरच्या पात्राला भूषवण्यासाठी, नाटकांत रंग भरण्यासाठी योजलेल्या पात्रांच्या संदर्भात, रंगभूमीवरील गायन उठावदार होण्यासाठी निवडलेल्या वादकांच्या संदर्भात, नारायणरावांनी कधीही तडजोड केली नाही. त्यामुळे कंपनीच्या कपडे पटाच्या संद्रर्भात, देखावे तयार करण्याच्या संदर्भात, किंबहुना तिरखवा: कादरबक्ष, ऑर्गन सारखे वाद्य इत्यादी संदर्भात कमी प्रतीच्या गोष्टींचा स्वीकार केला नाही. स्वतःला मनसोक्त अत्तर चोपडून गंधर्व रंगभूमीवर जात. त्याचा सुवास थिअेटर बाहेरच्या रस्त्यापर्यंत दरवळत जात असे. परंतू रंगमंचाबाहेर नारायण बालगंधर्वांच्या कपड्यांना अत्तर लागत नसे. सुरूवातीपासून अशा खर्चाची सवय गंधर्व नाटक मंडळींना आणि तिचे मालक नारायणराव बालगंधर्वांना लागली होती. ३१-३२

सालापर्यंत भरमसाठ उत्पन्न होत असतांनाही कर्जाची फेड होऊ शकली नव्हती आणि १९३२ नंतर उत्पन्न कमी कमी होऊ लागल्यावर त्याची शक्यता कमी झाली.

बत्तीस नंतर गंधर्वांचा आवाज त्रास देऊ लागला. त्यामुळे वारंवार प्रयोग बंद ठेवावे लागत. जेव्हा केव्हा प्रयोग होत तेव्हा आवाजाच्या अडचणीमुळे प्रेक्षक बालगंधर्वांच्या गायनावर नाखूष असत. त्यामुळे ज्या गावी मुक्काम असे त्या गावात नाटकाचा "बोलबाला" चांगला होत नसे. काढलेले कर्ज त्याचा गुणधर्माप्रमाणे आणि कांहीअंशी देखील न फेडल्यामुळे हळूहळू वाढतच जाऊ लागले. खर्च कमी करण्याच्या उद्देशाने गणपतराव बोडस, विनायकराव पटवर्धन इत्यादी माणसे कंपनी सोडून गेली. प्रकृती अस्वास्थ्यामुळे दादा काटदरे सारखे समर्थ व्यवस्थापक विश्रांती करता निघून गेले. थोडक्यांत बालगंधर्वा व्यतिरिक्त इतर चांगली चांगली माणसे कंपनीपासून दुरावली. परिणामी प्रयोग रंगतीत कमी पडू लागले. त्याचा परिणाम उत्पन्नावर झाला आणि शेवटची कुऱ्हाड, नवीनच लोकप्रिय होत चाललेल्या बोलपटांनी मारली. नाटकापेक्षा बोलपट पहाणे लोकांना जास्त पसंत पडू लागले. ह्या कारणाने नाटक कंपन्या अेका मागून अेक बंद होअू लागल्या: ह्या सर्व गोष्टींचा परिणाम होईपर्यंत १९३४ साल अुजाडले. दादा काटदरे ह्यांनी उत्कृष्ट ठेवलेल्या व्यवस्थेमुळे प्रत्येक नाटकाला किती उत्पन्न झाले : किती खर्च झाला ह्या गोष्टी सहज समजत असत: त्यातून शेवटी हे निश्चित झाले की इतःपर केवळ नाट्यप्रयोगाच्या उत्पन्नातून कर्ज फिटणे अशक्य आहे. कारण कर्जाचा आकडा आता सत्तर हजारापर्यंत पोहोचला होता. कर्ज वाढत होते तसे बालगंधर्वांचे वय देखील वाढत होते. कमी होत होते फक्त उत्पन्न! ह्या कमी उत्पन्नाला आणखीन अेक कारण होते. रंगभूमीवर आता स्त्रियांनी कामे करायला सुरवात केली होती. साहजिकच वयाने प्रौढ झालेल्या पुरूषांच्या स्त्री भूमिका पहाण्यापेक्षा स्त्रियांनी केलेल्या स्त्री भूमिका निश्चितपणे लोकांना आकर्षित करू लागल्या होत्या.

अशी मानसिक जडण घडण बालगंधर्वांची होत असतांना व्ही. शांताराम ह्यांनी त्यांच्याशी संपर्क साधून अेक प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेवला! "--- नारायणराव जर आमच्या भागीत (म्हणजे प्रभात

कंपनीच्या भागीत ) तीन वर्षात सहा चित्रपट करतील तर त्यांच्या हिश्श्यावर त्यांना कमित कमी सहा लाख रूपये मिळतील !" सहा लाख रूपये ही भूल पाडणरी रक्कम निश्चितच होती. सत्तर हजाराचे कर्ज फिटून पुढच्या स्वस्थ्या करता हाताशी मुबलक पैसा राहणार होता. म्हणून नारायणरावांनी त्यांचे हितचितक-निढान लाटसाहेब किंवा खाडिलकर ह्यांचा सल्ला न घेता प्रभातचा प्रस्ताव स्वीकारण्याचा बेत मनोमनी पक्का केला.

"नारायणरावांची स्त्री भूमिका चित्रभूमीवर चांगली दिसेल कां ?... नाटकाप्रमाणे चित्रपटांत त्यांना प्रभावी संवादाची जोड मिळू शकेल कां ?..... चित्रपटांतील तीन किंवा चार मिनिटांचे गाणे त्यांच्या प्रेक्षकांचे समाधान करू शकेल कां? प्रेक्षकांनी तुडुंब भरलेल्या रंगमंदिरात भूमिका करण्यात त्यांची हयात गेली त्यांना स्टूडिओतील कलोपासना रूचेल का ?" असे अनेक प्रश्न होतेः त्याचे समाधानकारक उत्तर त्यांच्याजवळ नव्हते..... त्यावर ते विचार करण्याच्या मनस्थितीतही नव्हते, त्यांना दिसत होते सहा लाख रुपये आणि त्याहिपेक्षा जास्त महत्त्वाचे म्हणजे कर्ज फेड ! नारायणरावांसारखा असामान्य कलावंत कोणतीही भूमिका चांगलीच करील असा शांताराम ह्यांना विश्वास होता तर "शांतारामबांपू कोणतीही भूमिका माझ्याकडून छानच करून घेतील" अशी नारायणरावांना खात्री होती. दोघांचाही विश्वास स्वतःपेक्षा दुसऱ्यावरच जास्त होता आणि एकमेकांच्या कर्तुत्वावर विसंबून दोघंही निश्चिंत होते !

१८ मे १९३४ साली बालगंधर्व-प्रभात करार मूर्तस्वरूपांत उतरला. सुरवातीला करार दोन बोलपटासाठी झाला. उभयपक्षी सोयीचा वाटला तर तो पुढे वाढवता येईल अशी बोलणी झाली. हे दोन बोलपट पहिल्यावर्षी काढायचे होते. चित्रपटाचा खर्च प्रभात कंपनीने करावयाचा आणि जो नफा होइल तो दोघांनी वाटून घ्यायचा असे कराराचे स्वरूप होते. प्रभात कंपनीत गेल्यामुळे साहजिकच गंधर्व कंपनी ३१.१२.३४ रोजी बंद करण्यात आली. ही घटना कोल्हापूर मुक्कामी घडली.. कंपनीतले अबालवृद्ध बालगंधर्वाचा निरोप घ्यायला एकत्र जमले. आपआपल्या भविष्याविषयीच्या काळजीमुळे नव्हे तर भूतकालच्या

सुखद स्मृतीमुळे प्रत्येकाच्या डोळ्यातून घळघळ अश्रू वाहत होते. त्यांना निरोप देतांना नारायणराव इतकंच म्हणत "--कर्ज फेडण्यासाठी मला नाईलाजाने कंपनी बंद करणं भाग आहे !" हे वाक्य म्हणतांना त्यांना गहिवर अनावर होत असे.

ज्या कोल्हापुरांतून शाहू छत्रपतींनी एकोणतीस वर्षापूर्वी लहानग्या नारायणाला नाट्यसृष्टीत अभिमानाने पाठवले त्याच कोल्हापुरांत गंधर्व मंडळीनी आणि बालगंधर्वांनी रंगभूमीचा निरोप घेतला !

कराराप्रमाणे बालगंधर्व एक जानेवारी पस्तीस पासून प्रभात नगरात जाऊ लागले. त्यांच्या आवडीचा संगीत दिग्दर्शक म्हणून मास्तर कृष्णराव देखील प्रभातच्या सेवेत रूजू झाले. मास्तरांबरोबर कादरबक्ष आणि तिरखवा हे देखील संगतीकार म्हणुन प्रभात मधे राहिले. ह्यापैकी मास्तर कृष्णराव सोडले तर इतरांचा करार गंधर्वापुरताच होता. मास्तर मात्र नंतर प्रभातशी संबंधित राहिले. तिथे त्यांनी पुढे फार चांगली कामगिरी केली हे जाता जाता सांगायला हरकत नाही.

नारायणरावांकरता भूमिका निवडणे हा देखील विचार करण्यासारखा प्रश्न होता. त्यांचे वय लक्षांत घेता स्त्री भूमिका अर्थातच निकालात निघाल्या होत्या. शिवाय स्त्रियाच स्त्रियांची कामे करू लागल्यामुळे तसा विचार सुद्धा करणे अशक्यच होते. तेव्हा त्यांच्या पोक्त वयाकडे पाहून संत एकनाथ ह्यांच्या जीवनावर चित्रपट काढून नारायणरावांना एकनाथांची भूमिका योग्य होईल असे वाटून त्या अनुषंगाने के. नारायण काळे ह्यांनी कथेची उभारणी केली. शिवाय नंदकुमार, कान्होपात्रा, अमृतसिद्धी ह्या त्यांच्या नंतर नंतरच्या नाटकांत भक्तिरसपूर्ण भूमिका त्यांनी चांगल्या वठवल्या होत्या. त्यातली भजने देखील भक्तिभावाने म्हटली. हाही विचार कदाचित शांतारामबापूंच्या मनाच्या कोपऱ्यांत कुठेतरी असावा.

व्ही. शांताराम ह्यांची वृत्ती सामाजिक जाणीवेने परिपूर्ण भरली होती. त्यामुळे संतपटात देखील चमत्कृतीवर त्यांनी कधीही भर दिला नाही. "अस्पृश्यता निवारण" ह्या तत्वाला त्यांनी प्राधान्य दिले आणि त्यानुसार के. नारायण काळे ह्यांनी कथेची आणि प्रसंगाची, संवादाची गुंफण केली होती. गंधर्वाच्या जोडीला रत्नमाला ही त्या काळची

नावाजलेली नटी आणि ''वासंती'' ही बालनटी ह्या सिनेमांत काम करणार होती. संगीत अर्थातच मास्तरांचे. सिनेमा मराठी आणि हिंदी ह्या दोन भाषांमध्ये निघणार होता.

सुरवाती सुरवातीला नारायणराव मन लावून भूमिका करण्याचा प्रयत्न करीत होते. पण लवकरच त्यांचे मन ह्या वेगळ्या वातावरणात रमेनासे झाले. समोर तुडुंब भरलेल्या प्रेक्षकांसमोर भूमिका करणे, गाणे म्हणणे, त्यांच्या कडून मिळणारे कौतुक स्वीकारणे वगैरे गोष्टींचा जिवंतपणा ह्या निर्जिव कॅमेरा समोर मृतवत् वाटू लागला --- ''देवा ह्या धंद्यात आमच्या नाटक धंद्यासारखा आनंद नाही.'' असे उद्गार ते वारंवार काढू लागले. पुन्हा नाटकाकडे वळावे असे त्यांना राहून राहून वाटू लागले.

इकडे गंधर्व मंडळीचे विसर्जन झाल्यावर त्यातल्या नट मंडळीसमोर प्रश्न उभा राहिला---चरितार्थाचा--बहुतांश मोठ्या कंपन्या ह्या पूर्वीच बंद झाल्या होत्या. त्यामुळे तीहि द्वारं बंद झाली होती. शेवटी बालगंधर्वा- शिवाय गंधर्व कंपनीची पुनर्घटना करण्याची हालचाल सुरू झाली. गंगाधरपंत लोंढे, ह्यांनी त्यात पुढाकार घेतला व वालावलकर, मास्टर दुर्गाराम, अभ्यंकर, हरी देशपांडे, बापूराव राजहंस, ह्यांनी चार महिन्यांनी-चार एप्रिल रोजी गंधर्व नाटक मंडळी पुन्हा विधिवत् सुरू केली. नारायणरावांच्या गैरहजरीत मास्तर कृष्णा आणि बापूराव राजहंस ह्यांनी भूमिका केल्या. लोकांचा जुजबी प्रतिसाद मिळू लागला. निदान खर्चाचा मेळ बसू शकत होता.

सप्टेंबर अखेर महात्मा चित्रपट तयार झाला. पण महात्मा शब्दाचा अन्वय त्या काळात महात्मा गांधीशी जोडल्या जाण्याचा संभव जास्त वाटल्याने सेंसार ने चित्रपटाच्या नावाला हरकत घेतली. प्रभात कंपनीला नाव बदलावे लागले. ''धर्मात्मा'' ह्या नावाने तो सादर करण्याचे ठरवले तेव्हा चित्रपट प्रदर्शित करायला परवानगी मिळाली. त्या प्रमाणे सात डिसेंबर १९३५ रोजी मुंबईच्या ''कृष्ण'' टॉकीज मधे प्रदर्शित झाला. बालगंधर्वांचा पहिलाच चित्रपट म्हणून लोकांनी अलोट गर्दी केली, पण सगळे निराश होवून परतले. गंधर्वांचा मेकअप्, तीन चार मिनिटात आटोपलेली गाणी, त्यांना समाधान देइना. शिवाय त्यांचा रंगभूमीवरचा

स्त्रीभूमिकेतला लाडिवाळ अभिनय बघण्याची सवय--किंबहुना व्यसन जडलेल्या रसिकांच्या सिनेमातला त्यांचा वेगळ्या प्रकारचा अभिनय पसंतीला उतरला नाही. सगळे खूप निराश झाले. नारायणरावांचे पहिलेच चित्र अयशस्वी झाले. सपशेल पडले. फार मोठ्या अपेक्षा बाळगून केलेला हा प्रयत्न असमाधानकारक झाल्यामुळे दोघंही -- शांताराम आणि बालगंधर्व निराश झाले. सहा चित्रपट काढून दहा बारा लाख रुपये कमावण्याचे आणि त्यातून सर्व कर्जफिड करून पुढील सुखी समाधानी आयुष्य व्यतीत करण्याचे स्वप्न अशा रितीने भंग पावल्यामुळे नारायणराव उदास बनले. त्यांचे मन पुन्हा पुढच्या चित्रपटांत रमणे दुरापास्त वाटू लागले. बालगंधर्वांना घेऊन आणखी चित्रपट काढणे फायद्याचे होणार नाही ह्याची जाणीव शांतारामना झाली. उभयतांच्या दृष्टीने अयशस्वी ठरलेली ही युती पुढे चालू ठेवण्यात काही लाभ नाही पाहून हा करार रद्द करण्यांत आला. बालगंधर्वांना मोकळे करण्यात आले.

बालगंधर्वाचे मन सिनेसृष्टीत कधीच रमले नाही. वारंवार त्यांना रंगभूमीची आठवण येऊ लागली. करार संपुष्टात येताच त्यांनी पुनर्घटित गंधर्व मंडळीत प्रवेश केला. तो देखील कंपनी कोल्हापूर शहरांत असतांना. ज्या कोल्हापूर शहरात असतांना लहानग्या नारायणाला श्रीमंत छत्रपती शाहू महाराजांनी नट होण्यासाठी किर्लोस्कर नाटक मंडळीत पाठवले होते त्या कोल्हापूर शहरात नारायणरावांनी पुन्हा रंगमंचावर अवतीर्ण व्हायचे ठरवले हा एक विचित्र योगायोगच म्हटला पाहिजे. स्वयंवर, द्रौपदी, एकच प्याला ही नाटके पुन्हा रंग भरू लागली.

कर्ज फेडण्याच्या उद्देशाने नाटक सोडून सिनेमा कंपनी जवळ केली. पण शेवटी सत्तर हजाराचे कर्ज जसेच्या तसे ! शांताराम सारखे सिद्ध हस्त, कलापूर्ण चित्रपट काढण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या दिग्दर्शकाला अभिनय कुशल बालगंधर्वांना घेऊन यशस्वी चित्रपट कां काढता आला नाही ? नुसत्याच अभिनयासाठी नव्हे तर त्या बरोबर गायनासाठी सुद्धा प्रसिद्ध असलेल्या, नव्हे अभिनयकुशल गायनाने अनेक लोकांना वेड लावणाऱ्या बालगंधर्वांच्या ह्या कलागुणांचा योग्य वापर शांताराम

ह्यांना करता आला नाही कां ? की त्या दोघांबद्दल लोकांच्या अपेक्षा चुकल्या ?

बालगंधर्व रंगभूमीवर ज्या सुकोमल भूमिका करतात त्या चित्रपटात चित्रित होणे शक्य नाही. मग एक निराळाच बालगंधर्व प्रेक्षकांसमोर उभा करावा असा विचार शांताराम ह्यांनी केला असावा. म्हणून नेहमीच्या ललित स्वरूप बालगंधर्वा ऐवजी ''जाडेभरडे धोतर नेसून, बाराबंदी चढवलेला, डोक्यावर पागोटे अडकवलेला आणि भरदार मिशी ठेवून डोक्याचा गोटा केलेला बालगंधर्व त्यांनी लोकांसमोर उभा केला. वर्षानुवर्ष पाहिलेल्या बालगंधर्वाच्या कोमल सुशीतल सुंदर मूर्तीला ही सिनेमातील मूर्ती सर्वस्वी छेद देणारी होती. त्यामुळे त्या स्वरूपात बालगंधर्वांना स्वीकारणे प्रेक्षकांना मुळीच शक्य झाले नाही. त्यांच्या चित्रपट पडद्यावरील पहिल्या दर्शनानेच त्यांचा भ्रमनिरास झाला. ज्या त्यांच्या रंगमंचावरील पहिल्याच दर्शनाला कडाडून टाळी पडत असे, तिथे चित्रपटात पहिल्या दर्शनालाच निराशेचे सुस्कारे सोडल्या गेले. प्रथम दर्शनाने जिंकण्याचे स्वप्न असे धुळीला मिळाले. त्यानंतरच्या प्रवेशामधे जो एकनाथ शांतारामांनी उभा केला तो, एकतर तुकाराम, ज्ञानेश्वराच्या मानाने अपरिचित होता. शांतारामांनी अस्पृश्यता निवारण ह्या आपल्या वैचारिक भूमिकेवरून......भक्ति भावापेक्षा वेगळा चित्रपट घेतला असल्याने लोकांच्या एकदम पचनी पडला नाही. जो बालगंधर्वाचा भक्तिरस कान्होपात्रा किंवा मीराबाई ह्यांच्या जीवनावर घेतलेल्या नाटकांमधून लोकांच्या परिचयाचा होता, तो संत एकनाथ मधे अभावानेच शिल्लक होता. ''प्रभात कंपनीची योजना अत्यंत सद्हेतूपूर्वक असली तरी प्रेक्षकांच्या अपेक्षांही जुळणारी नव्हती. परिणामी नारायणरावांच्या चित्रपट सृष्टीतला अवतार अत्यंत विघातक रीतीने संपुष्टात आला. नारायणरावांच्या नाटकांतल्या भूमिका पुन्हा सुरू झाल्या.

गंधर्व मंडळीची नाटके पुण्याला चालू असतांना ''बालगंधर्वाची स्त्री भूमिका चित्रपटांत कशी दिसेल''. ह्याचा नुसता अंदाज घेण्याकरिता सरस्वती सिने टोन चे मालक दादासाहेब तोरणे ह्यांनी स्वयंवर नाटकांतला एक लहानसा भाग चित्रित केला. तो जेव्हा

पडद्यावर बघितला तेव्हा तो अतीशय सुरेख दिसला. त्यातला अभिनय, त्यातले ''स्वकुल तारक सुता''... हे गाणे, हे सगळे इतके सुरेख वाटले की पुन्हा पुन्हा ऐकायची इच्छा होत होती. कोल्हापूरच्या रॉयल सिनेमाचे मालक बाबूराव रूईकर ह्यांनी तो भाग बघताच नारायणरावांची स्त्री भूमिका असलेला चित्रपट काढायचा विचार त्यांनी जवळ जवळ पक्का केला. त्यांत धंद्याबरोबरच आणखी एक चांगला विचार होता. तो म्हणजे त्या चित्रपटाला वेगळ्या दृष्टीनं येणारं ऐतिहासिक महत्त्व. भाऊराव कोल्हटकरांच्या स्त्री भूमिका गाजल्या. परंतू त्या आता बघता येतील असे मागे काहीच राहिले नाही. पण नारायणरावांची स्त्री भूमिका चित्रित केली तर ती पुढे अनेक वर्ष एक संग्राह्य वस्तू राहील. कंपनीच्या मुंबईच्या मुक्कामात अमृतसिद्धी नाटकाचे प्रयोग करून त्याचे चित्रीकरण करावे असा विचार करून मोबदल्या खातर ''बालगंधर्वांना पंचवीस हजार रुपये आणि इतर मंडळींना एक महिन्याचा पगार''. असे त्यांनी सुचवले. ह्या चित्रपटासाठी बालगंधर्वांना व्यवसायांतर करण्याची गरज नाही हा दुसरा आणि महत्त्वाचा फायदा होता. कोल्हापूरचे चित्रपट महर्षी बाबूराव पेंटर ह्यांनी दिग्दर्शनाची जबाबदारी स्वीकारली. त्यामुळे ''स्त्री भूमिकेतले त्यांचे दर्शन कसे दिसेल ह्याबद्दल शंका व्यक्त करणाऱ्यांना दिलासा मिळाला. बाबूराव सौंदर्य दृष्टीबद्दल प्रख्यात होते. आणि ''जे चित्र सुंदर दिसणार नाही असे चित्र बाबूराव काढणारच नाहीत'' अशी सर्वांना खात्री वाटत होती. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन सुरूवातीला तयार नसलेले नारायणराव ह्या चित्रीकरणकरता तयार होऊन जून १९३७ साली मुंबईला ''बालगंधर्व-रूईकर'' करार झाला. बालगंधर्वावर असलेले ''सत्तर हजार रूपयाचे कर्ज'' हा सुद्धा बालगंधर्वांना हा करार करण्यास राजी करणारे एक महत्त्वाचे कारण होते.

मुंबईच्या ''फिल्म सिटी'' नामक स्टुडिओत नाटकातला एक पडदा सोडून त्या पार्श्वभूमीवर रंगभूमीवर करतात त्याप्रमाणे अमृतसिद्धी ह्या नाटकाचे ''साध्वी मीराबाई'' ह्या नावाने चित्रीकरण व ध्वनीमुद्रण झाले.

चित्रपटाचेच असे विशिष्ठ तंत्र न वापरता एखाद्या नाटकाचा जो

चित्रपट तयार करतात त्याला ''स्टेज टॉकी'' म्हणतात. परंतु त्याचे सुद्धा काही वेगळे तंत्र असले पाहिजे. हा प्रकार पाश्चात्य देशात यशस्वी झाला असला तरी त्यासाठी त्यांनी कोणते तंत्र वापरले ह्याची बाबूराव पेंटर ह्यांना कल्पना नव्हती. किंवा तसा त्यांनी प्रयत्न देखील केला नाही. त्यामुळे तयार झालेला ''साध्वी मीराबाई'' हा चित्रपट अत्यंत कलाशून्य आणि अयशस्वी ठरला. नारायणरावांचा चित्रपट सृष्टीतला हा दुसरा पराभव.

त्यांच्या तिसऱ्या आणि शेवटच्या पराभवाला गोहरबाई जबाबदार होती. ही कहाणी आहे १९४५ सालातील. तो पर्यंत नारायणराव गोहरबाई च्या पूर्ण कह्यात गेले होते. गोहरबाईची इच्छा, बालगंधर्वांनी पुन्हा सिनेमात काम करावे कारण त्यामुळे बरेच पैसे मिळतील. आज पर्यंत नारायणरावांनी सिनेमांत काम करावे म्हणून सिनेमा निर्माते नारायणरावांना विनवीत होते. आता --केवळ गोहरबाईच्या इच्छेला मान द्यावा म्हणून-- नारायणराव निर्मात्याकडे चकरा मारू लागले. त्यासाठी सीताकांत लाड ह्यांच्यामार्फत ग.दि. माडगूळकर ह्यांचा वशिला लावून सुधीर फडके ह्यांच्या ''विठ्ठल रुखमाई'' ह्या चित्रपटांत संत तुकारामची भूमिका मिळवली. त्यात ''आम्ही जातो आमुच्या गावा'' हा अभंग बालगंधर्व अतिशय सुरेख गायले. बालगंधर्वांना त्या बद्दल पंधरा हजार रुपये मिळाले. परंतु चित्रपट अगदिच कलाशून्य असल्यामुळे कुणाच्या स्मरणांत सुद्धा राहिला नाही. नारायणरावांचा हा तिसरा दारूण पराभव.

❋ ❋ ❋ ❋

## ॥८॥

एक जानेवारी १९३५ रोजी नारायणराव प्रभात कंपनीत रूजू झाले. जून १९३६ ला ते पुनर्घटित गंधर्व कंपनीत सामील झाले. ह्या दीड वर्षात पुलाखालुन बरेच पाणी वाहून गेले. लोकांना त्यांची स्त्री भूमिका बघण्याची सवय झाल्यामुळे, हजारो प्रेक्षकांसमोर काम करायची सवय असल्यामुळे यंत्रासमोर काम करतांना जाणवणारा निर्जीवपणा, रंगभूमीवरच्या लांबलचक गायनाची सवय असलेल्या नारायणरावांना तीन चार मिनिटांत गायन रंगवण्याची हतोटी साधली नसेल, अशा अनेक गोष्टींमुळे त्यांचे चित्रपटातील काम जमले नसेल अशी कल्पना काही मंडळीची झाली. पण ते खरे कारण नसावे. तसेच असते तर अमृतसिद्धी नाटकाचा प्रयोगच जवळपास जसाच्या तसा चित्रित करून--आणि तेही बाबुराव पेंटर सारख्या सिद्धहस्त दिग्दर्शकाच्या मार्गदर्शनाखाली -- संत मीराबाई -- नावानं काढलेला चित्रपट यशस्वी झाला असता. खरी गोष्ट अशी कि नारायणरावाचं वय वाढलं. त्यांचा शरीराचा डौलही पूर्वीसारखा राहिला नव्हता. आवाज देखील सततचे बर्फाचे पाणी पीत राहिल्याने खराब झाला होता आणि वाढत्या वयामुळेच नकला म्हणण्यातला अस्खलितपणा राहिला नव्हता. शरीराची चपळाइपण कमी झाली होती. ह्या सर्व गोष्टी असून प्रयोग लोक पहात होते पण उत्पन्न जेमतेमच होत होते. कंपनीच्या भरवशावर कर्जफिडीची अपेक्षा करणे रास्त नव्हते. थोडक्यात बालगंधर्वांनी आता स्त्री भूमिका करणे बंद करणे आवश्यक होते. पण त्याला सध्यातरी इलाज नव्हता आणि कर्जाचा बोजा डोक्यावरून उतरणे आवश्यक होते. त्यालाही इलाज सापडत नव्हता. अशा विचित्र मनःस्थितीत असतांना ''गोहरबाई'' नावाची स्त्री त्यांच्या जीवनात आली. तो दिवस होता तीस डिसेंबर १९३७!

गोहरबाई ही मूळची कर्नाटकची. म्हणून तिचा उल्लेख गोहर कर्नाटकी असा होत असे. सुप्रसिद्ध नट शंकर नीलकंठ उर्फ नाना चापेकर ह्यांच्या मदतीने ती मुंबईला आली. त्यांनीच तिला व्यावसायिक स्थिरता मिळवून दिली. दिसायला चांगली. आवाज गोड आणि चांगली गायिका त्यामुळे मुंबईच्या सिनेसृष्टीत तिला प्रवेश मिळाला. रूप आणि गळा



**नाट्याचार्य खाडीलकर**

खाडीलकरांनी नारायणाला - त्यांच्या स्त्री भूमिकांना वैचारिक कणा दिला. त्यांनी अभिनित केलेल्या भूमिकांची फोड करून त्यांच्या स्वभावातले मर्म समजावून सांगितले. भामिनी, द्रौपदी, देवयानी, सिंधू, मेनका ह्यांच्या भूमिकेतले वैशिष्ठ्य कळल्यामुळे नारायणाची स्त्रीरूपे ठसठशीतच नव्हे तर अेकमेकांपासून वैशिष्ठ्यपूर्णतेने वेगळी वाटली.

चांगला असल्याने व त्या काळात पार्श्व गायनाची पद्धत नसल्यामुळे पाच सात हिंदी चित्रपटांत तिने कामं केली. बालगंधर्वाचं गायन तिला फार आवडत असे. त्यांच्याबरोबर रंगभूमीवर कामे करावी अशी तीव्र इच्छा तिची होती. त्या दृष्टीने तिने बालगंधर्वाची भेट घेण्याचा प्रयत्न पण केला. त्यावेळी तिला ते शक्य झाले नाही. बालगंधर्वाच्या ध्वनिमुद्रिका आणून त्यांची गायकी तिने बऱ्याच प्रमाणात साध्य केली होती. नारायणरावांची सरळ सरळ गाठ पडत नाही पाहून तिने एकदा त्यांच्या आईच्या घरी आपल्या गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात यश मिळवले. त्या कार्यक्रमाला नारायणराव हजर राहिले. त्यांना तिचे गायन आणि त्यांची स्वतःची शैली यशस्वी रितीने वापरण्याची तिची पद्धत--दोन्ही गोष्टी आवडल्या. त्यांनी तिला तशी पावती पण दिली होती. गोहरबाईंनी बालगंधर्वाच्या मातोश्रींना विनंती केली --"आई, मला महाराजांच्या कंपनीत प्रवेश मिळवून द्या. मी तुमचे उपकार जन्मोजन्मी विसरणार नाही." त्यावेळी ती बालगंधर्वांना महाराज म्हणत असे. अर्थात त्यावेळी तिचा हेतू साध्य झाला नव्हता . तरीही तिने नारायणरावांचा नाद सोडला नाही. त्यांच्या नाटकांत त्यांच्या बरोबर काम करणे ही तिची महत्वाकांक्षा होती. तो एकच छंद ती जोपासत आली होती. त्यासाठी नानाप्रकारचे प्रयत्न तिने केले.. अखेर पर्यंत चालू ठेवले. शेवटी तिची तपश्चर्या फळाला आली. मात्र त्यामागची कारणे वेगळी होती.

साधारण ३२ सालापासून गंधर्वाच्या नाटकांना उत्पन्न कमी होऊ लागले होते. त्याची कारणे आपण पाहिलीच आहेत. ३७ च्या सुमारास नटवर्य लोंढे हे एकमेव गायक कलाकार, गंधर्व कंपनी सोडून गेले. त्यांच्या बरोबर हरीभाऊ देशपांडे, वालावलकर, कृष्णाप्पा भांडारकर इत्यादी मंडळी पण गेली. गंधर्वाचा आवाज बसला. लोंढे गेल्यामुळे त्यांच्या जागी कृष्णराव चोणकर कंपनीत आले. त्यांना कंपनीत घेण्यात गोहरबाईची बरीच मदत झाली त्याची जाणीव नारायणरावांना होती. शिवाय चोणकर कंपनीच्या अतिशय निकडीच्या काळात नारायणरावांबरोबर आले. त्यामुळे नारायणरावांना बराच धीर आला होता. स्वाभाविकच गोहरबाईचे जणू ह्याही कंपनीवर आणि विशेषतः नारायणरावांवर खूप उपकार झाले आहेत अशीच नारायणरावांची

धारणा झाली. त्यामुळे त्यांच्या विम्याचे पैसे घेण्याकरता ते जेव्हा मुंबईला गेले तेव्हा गोहरबाईंनी दिलेले आमत्रंण ते टाळू शकले नाहीत. उलट त्याचा सन्मान करणे आपले कर्तव्य आहे ह्या भावनेनेच ते गोहरबाईच्या बिऱ्हाडी गेले.

नारायणराव बिऱ्हाडी आलेले पाहून गोहरबाई अतिशय आनंदित झाली. त्यावेळी नारायणरावांच्या बरोबर कृष्णराव चोणकर : मास्टर दुर्गाराम आणि ओळकर होते. सर्वांना बरोबर घेऊन गोहरबाईंना भेटायला जाण्याची ही पहिली आणि शेवटची वेळ. त्यानंतर जेव्हा जेव्हा ते तिच्याकडे गेले ते एकटे गेले ! खरे पाहिले तर ह्या पूर्वी ते कधीही कुणाकडेही एकटे असे गेले नव्हते. त्या दिवशी गोहरने त्यांचे खूप छान स्वागत केले. जणू परमेश्वर तिच्या भेटीला आला आहे अशा भावनेने तिने त्यांच्या अंगावर गुलाबाच्या फुलांच्या पाकळ्या उधळल्या. त्यांच्या पायावर डोके ठेवले. हाताला धरून आसनावर बसवले. थोड्या इकडच्या तिकडच्या क्षेम कुशल गोष्टी झाल्यावर ---"मी आपली दुसरी तरी काय सेवा करू शकते"? म्हणत जवळची हार्मोनियम घेउन कांही भजने म्हणून दाखवली. ते कान्होपात्रा नाटकातील अभंग होते. त्यात नारायणरावांच्या काही हरकती सही सही तशाच होत्या - ज्या बालगंधर्व प्रयोगात गातांना घेत असत. गाणे झाल्यावर सर्वांना तिनं जेवणाचा आग्रह केला. ह्या सर्व प्रसंगी ती बालगंधर्वांशी अतिशय अदबीने वागत होती. तिच्या गायनानं ते अतिशय खूष झाले होते. त्यामुळे तिच्या जेवणाच्या आग्रहाला संमती दिली. जेवता जेवता बऱ्याच दिलखुलास गोष्टी झाल्या. त्या प्रसंगी गोहरबाईनं नारायणयावांच्या बरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली. पण ते तेवढ्या पुरतेच राहिले. परत जाण्याकरता सर्व जण मोटर मध्ये बसले असता गोहरबाईने नारायणयावांना परत बोलावले. दहा पंधरा मिनिटांनी बालगंधर्व परत आले तो त्यांच्यात जणू आमूलाग्र बदल झाला होता. ते सर्वस्वी गोहराबाईच्या जणू अधीन झाले. त्या प्रसंगी गोहरबाई आणि बालगंधर्व एकटेच असल्याने त्यांच्यात काय बोलणी झाली किंवा त्यांच्यात प्रत्यक्षांत काय घडले हे कळायला काहीच मार्ग नव्हता. परंतु त्यांच्या वागणुकीत इतका आश्चर्यकारक बदल झाला कि काही लोकांना गोहरबाईनी नारायणरावांवर जादूटोणा केला असावा असे वाटू लागले.

त्या दिवसानंतर नारायणराव गोहरबाईकडे एकटे जाऊ लागले. ते तिच्या प्रेमपाशात सापडले. तिच्याशी विवाहबाह्य संबंध प्रस्थापित झाले. परिणामी १९३८ च्या संक्रातीच्या दिवशी गोहरबाई गंधर्व कंपनीत कृष्णराव चोणकर ह्यांच्या समवेत दाखल झाली. हे तिचे आगमन कंपनीतल्या बऱ्याच मंडळींना आवडले नाही. ह्यावेळी कंपनीचा मुक्काम धुळे येथे होता. त्याच मुक्कामात हरीभाऊ देशपांडे, मा. दुर्गाराम, बालावलकर, लोंढे, अभ्यंकर आणि मुख्य म्हणजे नारायणरावांचे धाकटे बंधू बापूराव राजहंस ह्यांनी गंधर्व कंपनीला रामराम ठोकला. त्याने काहिशा हादरलेल्या बालगंधर्वांना गोहरबाईने धीर दिला. "काहीही झाले तरी मी तुम्हाला सोडणार नाही" असा विश्वास दिल्यामुळे तर बालगंधर्व तिच्यावर अधिक लुब्ध झाले. इतकंच नव्हे तर तिचे गुलाम बनले. त्यावेळी बालगंधर्वांचे वय होते पन्नास वर्ष!

गोहरबाईच्या आगमनामुळे कंपनीतले नव्हे तर बालगंधर्वांचे इतर मित्र आणि हितचिंतक खूप नाराज झाले. त्यांच्यावर प्रेम करणारे, त्यांच्यावर श्रद्धा असणारे सारेच नाराज झाले. कराची इथे असलेले सेठ लाला लक्ष्मीचंद ह्यांनी गंधर्वांना समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. त्यांनी आतापर्यंत बालगंधर्वांना पन्नास हजारांची मदत केली होती. ह्या बाईच्या व्यसनात सगळे पैसे बुडतील म्हणून त्या कर्जाच्या पोटी गंधर्व मंडळीची सगळी मालमत्ता, पुण्याची पेरूची बाग, ह्या मिळकतीचे खरेदी खत आपल्या नावावर करून घेतले. तरी पण त्यांचे नारायणरावांवरील प्रेम आणि श्रद्धा कायम होती......"तुम्हाला ग्रासणाऱ्या ग्रहणातून तुम्ही मुक्त झालांत म्हणजे ही मिळकत जशीच्या तशी परत करीन" म्हणून आश्वासन दिले. नंतर लालाजींची प्रकृती अचानक बिघडली. मरता मरता बालगंधर्वांचे गाणे ऐकावे असा त्यांनी ध्यास घेतला. तसे बालगंधर्वांना तारेने कळवले. परंतु बालगंधर्व आणि मास्तर कृष्णा कराचीला पोहोचले त्याच्या आदल्या दिवशी त्यांचीच "दया छाया घे निवारुनी प्रभू मजवरी कोपला!" ह्या गाण्याची ध्वनिमुद्रिका ऐकता ऐकता १०.२.३८ रोजी त्यांनी प्राण सोडला!

गोहरबाईना घेऊन बालगंधर्वांनी महाराष्ट्रात मोठ्या गांवी संशय-

कल्लोळ, मृच्छकटिक, मानापमान ही नाटके केली. त्यांत बालगंधर्वांनी पुरुष भूमिका आणि त्यांच्या बरोबर त्यांच्या प्रेयसीची कामे गोहरबाईनी केली. पण नाटके विशेष रंगली नाहीत. बाईचा गळा चांगला होता. गंधर्वांच्या कांही जागा त्या छान घेत असत पण गद्य मुळीच जमत नसे. जन्माने कानडी, जातीने मुसलमान, सरावाने हिंदी, त्यामुळे मराठी शद्धोच्चार त्यांना नीट जमत नव्हते. पर्यायाने नाटके रंगत नसत. त्यामुळे १९३९ अखेर गोहराबाईचा गंधर्व नाटक मंडळींना काहीही उपयोग नाही हे नारायणरावांच्या पूर्ण लक्षात आले. स्वयंवर, द्रौपदी, एकच प्याला ह्या नाटकांत त्यांनी पुन्हा स्त्रीभूमिका करायला सुरवात केली. तेव्हा त्यांचे वय झाले होते बावन्न वर्षे. वसंत शांताराम देसाई ह्या त्यांच्या मित्राने गोहरबाईचा त्याग करायचा सल्ला दिला. पण....."आयुष्यात मी अनेक चुका केल्या. त्याचे परिणाम मी भोगले. तसे ह्या चुकीचेही परिणाम मला भोगले पाहिजेत". असे उत्तर त्यांनी दिले.

१९४० मधे कर्जवसुलीसाठी एका सावकाराने कंपनीवर जप्ती आणली. नारायणरावांच्या पत्नीचे, लक्ष्मीबाईचे, देव रस्त्यावर फेकले. त्याचा परिणाम होऊन २१ नोव्हेंबर १९४० मधे, जप्तीच्या आठ दिवसानंतरच त्यांचा मृत्यू झाला. तशा त्या नारायणरावांनी गोहरबाईला कंपनीत आणल्यापासून खंगतच होत्या. दोन वर्षांनी कृष्णराव चोणकर कंपनी सोडून गेले. गोहरबाईची कंपनीतल्या कारभारात ढवळाढवळ वाढू लागली. गंधर्व मंडळीतली शिस्त नाहीशी झाली. अतिशय मौल्यवान शालू जे बालगंधर्वांनी मुक्तहस्ते पैसा खर्च करून विकत घेतले होते त्यातली जर काढून गोहरबाईने विकायला सुरवात केली. ह्या सर्व गोष्टी कंपनीचे पालक म्हणून काम पहाणारे डॉ. भडकमकर ह्यांना सहन झाले नाही. गंधर्व कंपनीत बाईने काहीही ढवळाढवळ करू नये ह्या उदात्त दृष्टिकोनातून कंपनीचा कारभार कृष्णाप्पा भांडारकर आणि सदाशिव नेवरेकर ह्या जुन्या नटांकडे सोपवला. त्याचा नारायणरावांनी आणि गोहरबाईनी निषेध डॉ. भांडारकरांकडे नोंदवला पण त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी हा वाद विकोपाला जाऊन १९४३ सालाच्या डिसेंबर मध्ये नारायणराव

आणि गोहरबाई गंधर्व नाटक कंपनीतून बाहेर पडले.

नाटक मंडळीतून बाहेर तर पडले, पण पुढे काय ? स्वतःची कंपनी नव्याने काढणे शक्य नव्हते आणि दुसऱ्या एखाद्या संस्थेत काम करणे किंवा त्या कंपनीत सामील होणे त्यांच्या इभ्रतीला शोभण्यासारखे नव्हते. दरम्यान नाट्यशताब्दी महोत्सव साजरा करायचे ठरले. त्या अनुषंगाने सांगली येथील महोत्सवात वेगवेगळ्या संस्थानी एकत्र येऊन शारदा नाटकाचा प्रयोग केला. त्यात नारायणरावांनी इंदिराकाकूंची भूमिका केली. ह्या शताब्दी महोत्सवाचे मुंबईचे स्वरूप जास्त भव्य होते. डॉ. अ.ना. भालेराव ह्यांनी ह्यासाठी खूप परिश्रम घेतले त्या महोत्सवांत अनेक नाटके झाली. त्यात स्वयंवरचा पण प्रयोग झाला. स्वाभाविकच नारायणरावांनी रूक्मिणीची भूमिका अतिशय सुरेख केली. ह्या प्रयोगाला गानसम्राट अलादिया खासाहेब आवर्जून उपस्थित होते. त्यांची तब्येत चांगली नव्हती. त्यांना बालगंधर्वांचा पाच शब्दांचा यमन (नाथ हा माझा) ऐकायचा होता. त्यांना अक्षरशः उचलून रंगमंदिरात आणावे लागले. ह्या महोत्सवात आणखी एक चांगली गोष्ट घडली. बडोद्याचे सरदार माधवराव मुन्शी हे बालगंधर्वांचे भक्त होते. त्यांच्याकडून गोहरबाईने चौदा हजाराचे कर्ज घेतले होते. हे कर्ज वेळेवर परत न केल्यामुळे माधवरावांनी बालगंधर्वांवर फसवणूकीची फिर्याद दाखल केली होती. ही कोर्टबाजी टाळण्याकरता महोत्सवांचे प्रयोग झाल्यावर नारायणरावांच्या मदतीसाठी :"एकच प्याला" नाटकाचा प्रयोग करायचे ठरले. २१ एप्रिल १९४४ रोजी दहा हजार प्रेक्षकांसमोर बालगंधर्वांनी "सिंधू" उभी केली. प्रयोगासाठी सरदार माधवराव मुन्शी आवर्जून उपस्थित होते. प्रयोग बेफाम रंगला. बालगंधर्व वाक्ये विसरत होते. सुधाकरचं काम करणारे लोंढे स्टेजवरच त्यांना प्राम्पटिंग करत होते. प्रेक्षकांना त्यात काही वावगे वाटत नव्हते. प्रयोगाला पुरेसे उत्पन्न झाले. माधवराव मुन्शींना कर्जापोटी तडजोड करून आठ हजार रूपये देऊन उरलेली रक्कम जेव्हा डॉ. भालेराव नारायणरावांना देऊ लागले तेव्हा नारायणराव म्हणाले - "देवा ! ही रक्कम पंधरा दिवसांपूर्वी मुंबईला जो गोदीत स्फोट झाला त्यातल्या जखमींना वाटून टाका !"

हे केवळ बालगंधर्वांनीच करावं ! पैशाचा मोह त्यांना कधीच झाला

नाही. पैसा त्यांच्या जवळ अमाप असतांनाही नाही आणि त्यांच्याजवळ नसतांना देखील नाही.

ह्याच सुमारास जी.आय.पी. रेल्वेमधील कांही मंडळींनी 'रेड क्रॉस फंड'' ह्या नावाचा एक निधी निर्माण करून त्याच्यासाठी पैसा गोळा करण्यासाठी बालगंधर्वाची नाटके करायचे ठरवले. त्या अनुषंगाने बालगंधर्वांनी काही नाटकांच्या प्रयोगात भूमिका करायच्या आणि प्रत्येक भूमिके मागे पाचशे रूपये बिदागी म्हणून घ्यायची अशी योजना झाली. त्यामुळे बालगंधर्वाची पैशाची आवक सुरू झाली. वर्ष दीड वर्ष ही योजना कार्यान्वित होती. स्वयंवर, द्रौपदी, एकच प्याला इत्यादी नाटके केली. १९४७ नंतर काही ठेकेदारांनी ठेकेदारी पद्धतीनं बालगंधर्वाची नाटके लावली. त्यात ''नाईट'' प्रमाणे त्यांना पैसा मिळू लागला.

गोहरबाई त्यांच्या जीवनात आल्यापासून आणि ते गोहरबाईच्या आधीन झाल्यापासून बाई सर्वेसर्वा झाली होती आणि हे ओघाने आलेच. गोहरबाईचा आवाज चांगला होता. वयाने ती नारायणरावांपेक्षा पुष्कळच लहान होती. रियाझ करून नारायणरावांच्या हरकती आणि गायकी आणखी वाढवू शकत होती. त्याचप्रमाणे गायनाचे कार्यक्रम करून पैसा मिळवणे तिला शक्य होते. परंतु तिने तसे काहीच केले नाही. त्या कामी तिने नारायणरावांना जुंपले. अशाच उद्देशाने सुधीर फडके ह्यांनी काढलेल्या ''विठ्ठल रखुमाई'' ह्या बोलपटासाठी १९५० साली नारायणरावांना तुकारामाची भूमिका करायला लावली. चित्रपट सर्वसाधारणच होता. आणि बालगंधर्वाची भूमिका तशी नगण्यच होती.

सत्तावीस एप्रिल १९५१ रोजी बालगंधर्वांनी गोहरबाईशी नोंदणी पद्धतीने विवाह केला. त्यावेळी त्यांचे वय होते त्रेषष्ठ वर्षे. १९५३-५४ साली प्रथम एक आणि दुसरा असे दोन्ही पाय अधू झाले. त्यांना चालता सुद्धा येईना त्यामुळे १९५५ साली नारायणराव रंगभूमीवरून निवृत्त झाले. तरीपण त्यांचे भजनांचे कार्यक्रम चालूच होते. कारण पैसा मिळवण्याची जबाबदारी त्यांच्यावरच होती. त्यांची अपंग अवस्था लक्षांत घेऊन महाराष्ट्र सरकारने त्यांना दरमहा तीनशे रूपयाची मदत सुरू केली. ते साल होते १९५५. त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षात म्हणजे

१९६४ साली ती साडेसातशे रूपये प्रति माह वाढवली. दोन्ही पाय पंगू होईपर्यंत त्यांनी रंगभूमीवर भूमिका केल्या. एक पाय अधू झाला तेव्हा नाटकांच्या संहितेत असो किंवा नसो, त्यांच्या बरोबर एक दासी असे. तिचा आधार घेत. रंगमंचावरच्या आसनाचा आधार घेत किंवा विंगच्या फळकुट्यांचा आधार घेत ते भूमिका करीत. मात्र १९५५ नंतर ते त्यांना शक्य झाले नाही.

नाटकांतले काम करणे बंद झाले तरी पोटापाण्याच्या सोयीकरता गायनाचे कार्यक्रम करणे भाग होते. त्या कार्यक्रमांचा त्यांच्या गळ्यावर परिणाम होई. पूर्वीपासूनचा दम्याचा विकार बळावत चालला होता. त्यामुळे भयानक अशक्तपणा येई. गाण्यातला सूर त्यांच्यापासून दूर जाऊ लागला. त्याची जाणीव होताच त्यांना अतिशय वाईट वाटे. ज्यांच्या गायनांत अल्लादिया खां साहेबांसारख्या गान महर्षींना संगीतातील स्वरांचे मूर्तिमंत दर्शन घडत असे. त्याच बालगंधर्वांचे सूर त्यांच्यावर रूसून दूर दूर जाऊ लागले. त्यांचे गाणे कणसूर होऊ लागले. बेसूर वाटू लागले. त्याचे त्यांना मरणप्राय दुःख होत असे. आपल्या मित्रांजवळ एकदा ते म्हणाले "आता देवाने आमचे डोळे मिटावेत. आता जिणे नकोसे वाटते. आता मी कणसूर व्हायला लागलो. ते मला समजते, पण दाबून स्वर लावायला ताकद पोहोचत नाही. कणसूर लागला की अनंत यातना होतात. अशा स्थितीत गायचं कसं? आणि गायचं नाही तर खायचं काय?"

१९५१ सालानंतर गोहरबाईची प्रकृती बिघडत चालली होती. तिच्यावर दोन वेळा शस्त्रक्रिया करावी लागली. त्यामुळे पुढे पुढे बालगंधर्वाबरोबर कार्यक्रमाला जात नव्हती. मुंबई किवा हवापालट करण्यासाठी विजापूर. अशाच ठिकाणी तिचे बस्तान असे. शेवटी २० नोव्हेंबर १९६४ रोजी मुंबईत असतांना अचानक मरण पावली. स्मशानात बालगंधर्वांनी एखाद्या अनाथ झालेल्या विधवेसारखा आकांत केला. आणि त्याच दिवशी बालगंधर्वांचा शेवटचा आधार गेला अशी जाणीव त्यांना झाली. तिच्या मृत्यूनंतर स्थिती अधिकच बिघडली.

नंतर त्यांना दुःख एकच होते. आवाजाचे. आवाज लागत नसे.

त्यांची मुलगी किंवा जावई भेटायला गेले की ऑर्गन काढायला सांगत. त्यावर स्वर लावायचा प्रयत्न करीत. एखादे पद म्हणाचा प्रयत्न करीत......कधी कधी शब्द आठवत नसत......''पुढे काय रे ?'' विचारायचे.......

त्यांच्या आवाजातली स्वरांनी चिंब भिजलेली पदे सातत्याने ऐकून हजारो श्रोत्यांना पाठ झालेली असायची त्या अविस्मरणीय गाण्यांचे शब्द बालगंधर्वांना आठवेनासे झाले होते. खऱ्या अर्थाने ज्या दिवशी सूर त्यांच्यावर नाराज होऊन त्यांना सोडून गेला, ज्या दिवशी त्यांचे स्वतःचे अविस्मरणीय स्वरावगुंठित शब्द सापडेनासे झाले, आणि ज्या दिवशी ह्या गोष्टींची त्यांना जाणीव झाली त्याच दिवशी हजारो लाखो रसिकांच्या हृदयावर अधिराज्य करणारे बालगंधर्व दिवंगत झाले असेच म्हणावे लागेल. नंतर उरले ते त्यांचे केवळ अस्तित्व !

पण त्या अस्तित्वावरही लोकांनी अतोनात प्रेम केले. सरकारने त्यांच्या कलेची वज राखून सुरवातीला तीनशे रूपये आणि नंतर दरमाह साडेसातशे रूपये असे मानधन सुरू केले. अभिनयासाठी संगीत नाटक अकादमीचे राष्ट्रपती पारितोषिक देण्यात आले. १९६४ साली पद्मभूषण देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

१९५२ ते १९५५ पर्यंत केलेल्या भूमिका लोकांनी बघितल्या -- नव्हे आवर्जून पाहिल्या त्यांत अनेक त्रुटी होत्या. आवाज लागण्याच्या अडचणी, पदाचे किंवा संवादाचे शब्द आठवण्याबाबत अडचणी. एक पाय अधु झाल्यामुळे सहाऱ्याशिवाय नीट उभे राहण्याच्या अडचणी-- ह्या अडचणीसकट त्यांनी सादर केलेल्या -- साकार केलेल्या नव्हे -- सादर केलेल्या भूमिका नाट्यरसिकांनी पाहिल्या. With all thy faults. I love thee Hamlet. ह्या उक्तीप्रमाणे त्यांच्या सर्व उणीवांकडे दुर्लक्ष करून लोकांनी त्यांच्या भूमिका बघण्यासाठी गर्दी केली. त्याला कारण एकच. लोकांनी त्यांच्यावर अतोनात प्रेम केलं. अप्रतिम कला सादर करतांना केलं त्यात काहीच आश्चर्य नाही. पण ती कला पुष्कळ अंशी ओसरली असतांना सुद्धा आपली माया कमी होऊ दिली नाही. असे सुदैव दुसऱ्या कुठल्याही कलावंताला प्राप्त झाले नसेल. ह्याची जाणीव नारायणरावांना नव्हती असे नाही. त्यांनी आपल्या

नाट्यरसिकांचा उल्लेख सातत्याने'' -- माझे अन्नदाते'' असाच केला आहे. आणि परमेश्वराजवळ, त्यांच्याच दीर्घायुष्याची मागणी केली.......सातत्याने केली. वास्तविक, साधारण ४० सालापासून त्यांना नैराश्याने घेरले होते. आपल्या कुटुंबियांना पाठवलेल्या पत्रांत त्याचे प्रतिबिंब सातत्याने दिसत असे. आपल्या मुलीला --- सरोजिनीला २४.३.४१ रोजी पाठवलेल्या पत्रात ते लिहितात''........ यापुढील माझे आयुष्य अगदी वाईट जाणार असे वाटते......आतापर्यंतची आयुष्याची त्रेपन्न वर्षे फुकट गेली हे तर सिद्धच झाले आहे......आयुष्याचा शेवट गोड झाला पाहिजे...... ते नशीबि दिसत नाही....... माझ्या आयुष्याचे विलक्षण घोटाळे झाले आहेत.......'' जोहरबाईशी संबंध ठेवण्यात फार चूक झाली ह्याची जाणीव त्यांना झाली असली तरी त्यांतून सुटायला मार्ग नाही हेही शल्य त्यांना बोचत असले पाहिजे.

१९५५ साली ''एकच प्याला'' नाटकांतील सिंधूची भूमिका केल्यानंतर दोन्ही पाय अधू झाल्यामुळे त्यांनी नाटकांतली भूमिका करणे सोडले...... सोडले म्हटल्यापेक्षा त्यांना सोडावे लागले असे म्हणणे जास्त सयुक्तिक होईल. तरी पण काही वर्ष त्यांचे भजनाचे कार्यक्रम चालूच होते. त्या कार्यक्रमाला देखील लोकांनी गर्दी केली. (बालगंधर्वा समवेत गोहरबाई देखील आपले नाट्यगीतांचे आणि भजनांचे कार्यक्रम करीत असे.) पण नंतर नंतर हे कार्यक्रम देखील त्यांना झेपेनासे झाले.

हळूहळू त्यांना असलेला दम्याचा विकार बळावत चालला होता......एक हात पक्षघाताने अधू झाला. मोतीबिंदूमुळे डोळ्यांनी नीट दिसेनासे झाले. ऐकू येण्याची अडचण पूर्वीपासून होती ती आणखीन वाढत गेली. जणू एक एक प्रक्रिया त्यांना सोडून जाऊ लागली. भेटायला येणाऱ्या मंडळीकडे ते नुसते बघत......काही बोलण्याचा प्रयत्न करीत पण तोंडातून स्पष्ट शब्द उमटत नसत. १९६७ साली साधारण एप्रिल महिन्यात त्यांची शुद्ध हरपली. ही बातमी मुंबईत पसरली. दर्शनासाठी अनेक चहाते मंडळी येऊ लागली. मनोमनी त्यांच्या स्वास्थ्यासाठी सारे प्रार्थना करीत पण ते होणे नव्हते. हरवलेली

शुद्ध शेवटपर्यंत परत आली नाही. मृतवत ते पडून असत. मृत नाहीत म्हणून जिवंत आहेत अशी परिस्थिती झाली. मे महिन्याच्या पहिल्या तारखेला त्यांना पुण्याला नेण्यांत आले. तशाच बेशुद्ध अवस्थेत डॉ. माइणकरांच्या शुश्रुतेत ठेवण्यात आले. पुण्यातल्या लोकांची, त्यांच्या दर्शनासाठी येणाऱ्या मंडळीची रीघ लागली होती.

नारायणराव भीष्माचार्याप्रमाणे शरपंजरी पडले होते. मंचकावर झोपल्या सारखे दिसत होते. त्यांची कन्या त्यांना मधून मधून ''नाना, नाना'' अशी हाक मारीत असे......पण नाना डोळे उघडायच्या परिस्थितीतच नव्हते. जून महिन्याच्या सव्वीस तारखेला, त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी - त्यांना पुण्याच्या सुप्रसिद्ध जहांगीर हॉस्पिटल मधे हलवले. वाटलं काहीतरी करता येईल. सारखी धडपड. धावपळ डॉक्टर मंडळीची चालू होती पण.....

पण शेवटी सर्व व्यर्थ.

ज्या पुण्यांत त्यांचा जन्म झाला. ''बालगंधर्व'' ही पदवी लोकमान्यांनी दिली. आणि गंधर्व मंडळीची स्थापना, बालगंधर्व, गणपतराव, गोविंदराव ह्या त्रिकुटानी केली.

त्याच पुण्यात १५ जुलै १९६७ रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बालगंधर्वानी आपली जीवनयात्रा संपवली.

बालगंधर्व म्हणायचे पुण्यांत आले म्हणजे माहेरी आल्यासारखे वाटते.

''जाईन मी आता आपुल्या माहेरा ! निरोप हा संता हाती आला !

म्हणून तर शेवटी शेवटी त्यांना पुण्याला हलवण्याची बुद्धी त्यांच्या सहकाऱ्यांना झाली नसेल ?

शक्य आहे.

कुठलाही गाजावाजा न करता, घाईघाईने, कोणत्याही इतमामा शिवाय सायंकाळी साडेसहा पूर्वी त्यांचा अत्यंविधी ओंकारेश्वर येथे पार पाडण्यांत आला.

काही भाग्यवंत लोकांचे आवडते असतात तर काही राजांचे. पण दोघांनाही आदरणीय वाटावेत असे जे काही थोडे लोक असतात. त्यात नारायणराव बालगंधर्व परमादरणीयच म्हटले पाहिजेत !

असा हा भाग्यवंत पुण्याला २६ जून १८८८ रोजी जन्मला आणि पुण्यालाच १५ जुलै १९६७ रोजी जणू आपले अवतारकार्य संपवून हा स्वगृही गेला.

शापित गंधर्व शापमुक्त झाला !!

वसंत शांताराम देसाई म्हणतात.--- ''मराठी भाषेचे पावित्र्य ज्ञानेश्वरीत. तिचे सामर्थ्य गडकऱ्यांच्या नाट्यकृतीत तर भाव-माधुर्य नारायणरावांनी गायलेल्या नाट्यगीतात प्रगटले.''

''खाडिलकरांच्या नाटकांतील मेनकेची भूमिका बालगंधर्व करीत असत. स्वतःसंबंधी ती विश्वामित्राला सांगते -- ''तुझ्यासारखी मूर्ती माझ्या हातून पुन्हा घडणार नाही असं सर्व देवांच्या देखत प्रत्यक्ष विधात्यानं मला सांगितलं.''

बालगंधर्वांच्या कारकीर्दीचे इतके सुंदर आणि समर्पक वर्णन कोणते असू शकेल ?''

## ॥ ९ ॥

बालगंधर्वाच्या कर्जाबद्दल बऱ्याच उलटसुलट बातम्यांचे पेव त्या काळात फुटले होते. त्याचा ओझरता उल्लेख मागे आपण केला आहे. त्याबद्दल प्रत्यक्ष परिस्थिती जाणून घेणं आवश्यक आहे.

किर्लोस्कर मंडळीच्या कर्जाचा आणि नारायणरावांचा "अर्थाअर्थी" अर्थातच संबंध नव्हता कारण नारायणराव तिथे पगारी नोकर होते. परंतु त्या कंपनीतून फुटून बाहेर निघाले आणि गणपतराव-गोविंदराव ह्यांच्या भागीदारीत गंधर्व नाटक मंडळीची स्थापना केली, तेव्हा नारायणराव, एक-तृतियांश का होईना पण मालक होते. त्यावेळी गंधर्व कंपनीच्या स्थापनेसाठी त्यांनी पेणचे बाबासाहेब धारकर ह्यांच्याकडून विनायक शिवराम तथा बाळासाहेब पंडित ह्यांच्या मार्फत सात हजार रूपयांचे कर्ज मिळवले. गंधर्व कंपनीचे ते पहिले कर्ज. आणि बाळासाहेब पंडित ह्यांचा अप्रत्यक्षरित्या कर्जाबद्दल पहिला संबंध.

बालगंधर्वाच्या कपड्याच्या बाबतीत जी खर्चिक वृत्ती झाली त्या दृष्टीने एक लहान कथा सांगणे आवश्यक आहे. उंची कपडा हा बालगंधर्वाचा दृष्टीने हौसेचा मामला होता. तो मामला गोविंदराव टेंबे ह्यांनी बिनखर्चाने आणि अतिशय कुशलतेने सोडवला. बडोद्याचे विख्यात सरदार वाघोजीराव शिर्के ह्यांचा, रसिकता आणि औदार्य ह्या गुणांबद्दल लौकिक होता. तसेच देवासच्या महाराजांच्या बंधुच्या पत्नी.......म्हणजे सौ. सुमतीबाई पवार ह्या वाघोजीरावांच्या कन्यका. त्या सुद्धा तितक्याच रसिक आणि उदार, बरे देवासच्या राणी साहेब ह्या कोल्हापूरच्या महाराजांच्या कन्या. ही सर्व मंडळी बालगंधर्वाच्या नाटकांची शौकिन ! तेव्हा गोविंदराव टेंबे ह्यांनी बडोदे आणि देवास येथे सफरी करून उंची शालू आणि अनेक जरीकाठी लुगडी मिळविली. त्या वस्त्रांची इतकी जाहिरात झाली की ते शालू आणि लुगडी पाहण्यासाठी लोक गर्दी करू लागले ! असे अप्रतिम कपडे कंपनीच्या सुरवातीच्या नाटकांत नेसायला मिळाल्यावर दुसरा कोणताही कपडा त्यांना, नारायणरावांना आवडेनासा झाला. त्यांची कपड्यांच्या बाबतीतली निवड अशा रितीने चोखंदळ झाली. पुढे झालेल्या कर्जाच्या दृष्टीने ही पार्श्वभूमी लक्षांत ठेवायला हवी. ह्या पार्श्वभूमीवरच गंधर्व

नाटक मंडळीला जेव्हा सौभद्र नाटक करण्याची परवानगी मिळाली तेव्हा त्यांनी "पन्नास रूपये वार ह्या दराचे खऱ्या किनखापाचे कापड कृष्ण रूक्मिणीकरता, आणि स्वतः करता (म्हणजे सुभद्रे करता) पाच-सहा उंची साड्या खरेदी केल्या. राजघराण्याचे चित्र दाखवायचे तर राजघराण्याला शोभेसा कपडा हवा असे त्यांचे म्हणणे असे."

कपडेपटाबरोबरच रंगभूमीवरची सजावट किंवा रोषणाई ह्याबद्दल देखील बालगंधर्व खूप हौशी होते. त्यासाठी त्यांनी सढळ हाताने पैसा खर्च केला. केवळ सुरेख, उंची भारदस्त कपडे हीच फक्त ऐश्वर्याची कल्पना, असे त्यांना वाटत नव्हते. त्या अनुषंगाने रंगमंचावरची सजावट सुद्धा श्रीमंत वाटली पाहिजे. ह्यासाठी ते पैसा खर्च करायला मागे पुढे पहात नसत. उलट, आपल्याला झेपेल इतपतच खर्च व्हायला हवा. ऋण काढून सण करण्यांत काय अर्थ आहे अशी गणपतरावांच्या मनाची धारणा होती. शिवाय गणपतराव फार हिशोबी. जमाखर्चावर जातीने लक्ष ठेवीत असत. स्वयंवर-एकच प्याला... ह्या नाटकांच्या यशामुळे आणि होणाऱ्या विक्रमी उत्पन्नामुळे गंधर्व कंपनीने स्थापनेच्या वेळी धारकरांकडुन काढलेले कर्ज फिटले होते. त्यासाठी गणपतरावांची हिशोबी वृत्ती कारणीभूत होती. त्याला दुसरीही बाजू होती. कर्ज काढले तरी बिनासायास नाटकांचे प्रयोग करून हां हां म्हणता फेडता येते असा विश्वास नारायणरावांना निर्माण झाला होता ! त्यामुळे रंगभूमी सजवण्याकरता कर्ज काढायला कांहीच हरकत नाही अशी त्यांच्या मनाची धारणा झाली.

अशी मनाच जडण घडण झाली असतांना खाडिलकरांचे आणखी एक नाटक गंधर्वांनी रंगभूमीवर आणले --- "संगीत द्रौपदी"--- तो पर्यंत, कोणतेही श्रीमंत नाटक गंधर्व कंपनी जास्तच श्रीमंत करते अशी कंपनीची प्रसिद्धी झाली होती. आपल्या रंगभूमीला शृंगारण्याचा आगळा छंद बालगंधर्वांना लागला होता. ह्या बाबतीतला वैचारिक संघर्ष झाल्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवणारे दोघेही भागीदार --- गोविंदराव टेंबे आणि गणपतराव बोडस कंपनी सोडून गेले होते. त्यामुळे नारायणराव कंपनीचे एकटे मालक झाले. भरीस भर द्रौपदी नाटकात मयसभा होती, द्यूतसभा होती. कौरव पांडव होते. राजसूय यज्ञानंतरचे

पांडवांचे वैभव होते. मग काय? खर्चासाठी, रंगभूमीला सजवण्यासाठी बालगंधर्वांना **मनासारखी** संधी मिळाली होती.

नाटकातले देखावे कोल्हापूरचे सुप्रसिद्ध चित्रकार बाबूराव पेंटर ह्यांनी रंगवले होते. सर्व पात्रांसाठी भरजरी पोशाख केले होते. प्रमुख राजे, राजपुत्र ह्यांचे मुकुट चांदीचे असून त्याला सोन्याचे पाणी देण्यात आले होते. संगीताची मोहकता वाढविण्यासाठी होर्मोनियमच्या जागी ऑर्गन वापरण्यात आला होता. त्याला सारंगीवादनाची जोड देण्यासाठी कादरबक्ष सारखा अप्रतिम सारंगी नवाझदेण्यात आला. त्या स्वस्ताईच्या काळांत द्रौपदी नाटकासाठी सत्तर हजार रूपये खर्च करण्यात आले होते. इतके करूनही द्रौपदी नाटकाचा पहिला प्रयोग प्रेक्षकांना खूष करू शकला नाही. त्याला अनेक कारणे होती पण ती इथे सांगणे अप्रस्तुत होईल.

बालगंधर्वाच्या वैयक्तिक आणि गंधर्व कंपनीच्या कर्जासंदर्भात बाळासाहेब पंडित ह्यांचे नांव प्रामुख्याने घेतल्या जाते. गंधर्व मंडळीची स्थापना झाल्यानंतर कंपनीला वेळोवेळी सल्लामसलत करून मार्गदर्शन करण्याकरता पंचाची समिती नेमण्यांत आली होती. त्यांत नरसिंह चिंतामण केळकर, दत्तायत्र लक्ष्मण वैद्य (सालिसिटर) श्रीमंत सरदार आबासाहेब विंचूरकर (पुणे) आणि कृष्णाजी परशुराम उर्फ बाळासाहेब पंडित, विनायक शिवराम उर्फ बाळासाहेब धारकर होते. थोडक्यात बाळासाहेब पंडित ह्यांची भूमिका गंधर्व कंपनीच्या भल्याकरता असावी अशी अपेक्षा होती. नाटक मंडळीच्या स्थापनेनंतर साधारण वर्ष भरानंतर बाळासाहेब पंडित ह्यांनी गंधर्व मंडळीच्या व्यवस्थापकाची सूत्रे हाती घेतली. अर्थात ते व्यवस्थापक झाल्यामुळे सल्लागार मंडळीत त्यांच्या ऐवजी सॉलिसिटर लाड ह्यांना सामावून घेण्यांत आले.

बाळासाहेब पंडितांनी आपल्या अखत्यारीत काही निर्णय घेतले. ते अंगाशी आले. जसे एक दुय्यम नटसंच त्यांनी निर्माण केला. त्यामुळे कंपनीचा खर्च तेवढा वाढला. उत्पन्नात भर पडली नाही. नारायणरावांच्या भरमसाठ खर्चाला आळा घालण्याऐवजी त्यांच्या त्या वृत्तीला ते दुजोरा देत राहिले. त्यामुळे गणपतरावांचे आणि

नारायणरावांचे मतभेद वाढीला लागले. परिणामी गणपतरावांनी भागीदारी सोडली. त्याबद्दल त्यांच्या वाट्याचे २७,०००/- रूपये देतांना तितके कर्ज काढावे लागले. गणपतराव कंपनीतून निघून गेल्यावर दोन गोष्टी घडल्या. एकतर कंपनीच्या खर्चावर काटेकोरपणे लक्ष ठेवणारी कोणीही व्यक्ती कंपनीत राहिली नाही. परिणामी बाळासाहेब पंडित सर्वेसर्वा झाले. दुसरी गोष्ट म्हणजे ते निघून गेल्यामुळे ज्या नाटकात गणपतराव भूमिका करीत त्या नाटकांच्या प्रयोगांतली रंगत कमी होऊ लागली. शिवाय गणपतरावाची तालीम मास्तर म्हणून जी बहुमोल मदत मिळत होती ती मिळेनाशी झाली. उत्तरोत्तर प्रयोग विस्कळित होऊ लागले. त्याचाही नाही म्हटलं तरी उत्पन्नावर थोडा बहुत परिणाम झालाच.

बाळासाहेब पंडितांनी नारायणरावांवर अशी काही मोहिनी घातली होती की, "पंडित करतील ते सर्व बरोबरच असणार" अशी त्यांची भूमिका तयार झाली. (नंतर सर्व गोष्टींची जाणीव झाल्यावर "मी बाळासाहेबांचा ग्रामोफोन झालो होतो." अशी कबुली पण त्यांनी दिली.) परिणामी गंधर्वाचा पैसा तो बाळासाहेबांचा पैसा असे पंडित वागू लागले. एकदः तर कंपनीला दरवर्षी प्रमाणे एक महिना सुटी देण्यांत आली. त्यावेळी नारायणरावांच्या उत्पन्नातले सर्व पैसे घेऊन पंडित महाशय तीर्थयात्रेला निघून गेल होते. नारायणरावांजवळ कांहीच पैसे शिल्लक नव्हते. ही स्थिती पाहून गंधर्व कंपनीतले दादा काटदरे ह्यांनी बालगंधर्वांना सावध करण्याचा प्रयत्न केला. "बाळासाहेबांवर फार विसंबून राहिलांत तर गंधर्व मंडळीतला तुमचा हिस्सा सावकाराकडे गहाण पडेल !" ह्याची जाणीव करून दिली. त्याचा काहीच उपयोग झाला नाही. उलट ही गोष्ट जेव्हा बाळासाहेबांना समजली तेंव्हा त्यांनी दादा काटदरे ह्यांनाच गंधर्व कंपनीच्या नोकरीतून काढून टाकले ! बाळासाहेबांनी नारायणरावांना पूर्णपणे आपल्या कह्यात घेतले होते. इतके की नारायणरावांचे खाजगी गाणे देखील बाळासाहेबांच्या परवानगी शिवाय होत नसे. पंडित कोणते व्यवहार करीत आहेत ह्याची बालगंधर्वांना कल्पना नसे ! बाळासाहेबांनी वेळोवेळी समोर ठेवलेल्या कागदांवर नारायणराव जणू आंधळेपणाने सह्या करीत होते.


दरम्यान सोलापूरच्या बँकेत पंडितांवर एक अफरातफरीचा खटला

चालू होता. त्यासाठी त्यांना वारंवार सोलापूरला जावे लागे. त्या खटल्याच्या संदर्भात गंधर्व कंपनीने एक्कावन हजार रूपये खर्च केले. ह्या शिवाय पंडितांनी एका घराचा सौदा केला. त्यात आलेली पंधरा हजार रूपयाची नुकसानी गंधर्व कंपनीने सोसली. ह्यात भरीस भर म्हणून द्रौपदी नाटकासाठी बहात्तर हजार रूपयांचा खर्च केला. ह्या सर्व खर्चाची बेरीज एक लाख पासष्ठ हजार होते. त्यावरचे व्याज वाढतच गेले.

मात्र एक गोष्ट येथे प्रामुख्याने लक्षात येते. ती म्हणजे ह्या सर्व खर्चात नारायणरावांनी स्वतःसाठी एकही पैसा वापरला नाही. जो काही खर्च केलातो सर्वस्वी रंगभूमी करता आणि केवळ रंगभूमी करताच होता. तरी पण बालगंधर्वांचा भाबडा स्वभाव, बाळासाहेब पंडितांवर मितांत विश्वास टाकण्याची वृत्ती, ह्या गोष्टी अप्रत्यक्षपणे कर्जाकरता जबाबदार धरता येतील. ह्या वृत्तीमुळे गंधर्व कंपनीचे मालक होण्यास ते सर्वस्वी अपात्र होते असेच म्हणावे लागेल. सर्व कारभार जेव्हा योग्य हातात गेला तेव्हा कर्जफेडी सोपी झाली. तो सारा इतिहास आपण मागे पाहिला आहे.

गंधर्वांनी १९२७ अखेर सर्व कर्जाची फेड केली. रंगभूमीकरता तिला सजवण्याकरतां, रंगभूमीवरील पात्रे त्या त्या वैभवाने रंगभूमीवर वावरली पाहिजेत ह्या उद्देशाने काढलेले कर्ज त्यांनी रंगभूमीवर कामे करूनच फेडले. इतर कुणाकडूनही दान म्हणून किंवा मदत म्हणून पैसे स्वीकारले नाहीत. स्वतःच्या हिमतीने सारे कर्ज फेडले. म्हणूनच बन्याबापू कमतनूरकर म्हणाले --- ''लुगडे नेसून कर्ज फेडणारा तो खरा मर्द आहे।'' तर वसंत शांताराम देसाई ह्यांच्या मताने ''स्त्रीचे रूप घेऊन कलेची उपासना करणाऱ्या एका कलावंताचा तो पुरूषार्थ होता.'' ही दोन्ही मते किती सार्थ होती।

त्यानंतर तिसऱ्यांदा नारायणरावांनी कर्ज काढले ते त्यांच्या सरोजिनी नावाच्या मुलीच्या अनुषंगाने. हा इतिहास मागे आलाच आहे. हे शेवटचे कर्ज काढतांना मागचा अनुभव लक्षांत घेऊन नाटकांचे प्रयोग करून ते फेडता येईल ह्या विश्वासावर. परंतू तोपर्यंत नारायणरावांचे दिवस पालटले होते. त्या कर्जाने त्यांची शेवटपर्यंत पाठ सोडली नाही. तो सारा इतिहास सांगून झाला आहे.



**हार्मोनियमपटू गोविंदराव टेंबे**

''संगीत मानापमान'' ह्या खाडीलकरांच्या पहिल्या संगीत नाटकाच्या चाली गोविंदराव टेंबे ह्यांनी निवडल्या होत्या. त्याचा बाज केवळ शास्त्रीय नव्हे तर अनेकरंगी होता.
ते बहुढंगी गायन बालगंधर्वांनी पेश केलं.
मानापमान मधील गद्य भूमिका देखील तशीच कसदार होती.
नारायणरावांनी दोन्ही बाबतीत वादातीत यश मिळवलं.
गोविंदरावांनी नारायणरावांच्या गायनाला शास्त्रीय बैठक दिली. स्वागतार्ह वेगळेपणा दिला.

## ॥ १० ॥

बालगंधर्वासंबंधीच्या आणि त्यांच्या कला जीवनाशी निगडित असलेल्या, कांही कथा आहेत. त्या बऱ्याच बोलक्या आहेत. त्या अशा.....

बालगंधर्वाच्या वाडवडिलांचे खरे आडनांव देशपांडे होते. ह्या देशपांड्यांचे राजहंस कसे झाले ह्याची मनोरंजक कहाणी आहे. नारायणरावांनी जी आत्मवृत्तपर टिपणे लिहिली त्यात ही कहाणी सांगितली आहे. ती अशी.....

''फार वर्षापूर्वी आंबेजोगाई येथून देशपांडे नावाचे एक गृहस्थ ग्वाल्हेर येथे गेले. त्यांनी तेथे दरबारात मोठी मानाची जागा मिळवली. ते गणपतीचे महान् भक्त होते. त्यांच्या हितशत्रूंनी त्यांच्या विरूद्ध काही कुभांड रचले. त्यामुळे संशयाने महाराजांनी त्यांना तुरूंगात डांबले. तेव्हा देशपांडेयांच्या आईला फार राग आला. गणपतीवर त्यांची नितांत श्रद्धा होती, त्याला तडा गेला. तिने रागाने पूजेची गणपतिची मूर्ती घोड्याच्या पागेत नेली आणि तिथे ती पुरून टाकली. त्या मूर्तीला ती म्हणाली --- ''आमच्या मुलावर अन्यायाने झालेल्या आरोपाचे निरसन होऊन त्याला बंधमुक्त करीपर्यंत तुला हीच शिक्षा !''

त्यानंतर योगायोग असा घडला की तुरूंगाचे दरवाजे चार आठ दिवसानंतर एकाएकी उघडले. देशपांडे तिथून मुक्त झाले आणि कोणाला नकळत दक्षिणेत आले. त्यांच्या मुक्ततेनंतर राजेसाहेबांना दृष्टांत झाला की देशपांडे निर्दोष आहेत. खरे गुन्हेगार वेगळेच आहेत. देशपांडे अन्यायाने बंदिवासात होते ते आता दक्षिणेत आहेत. राजेसाहेबांना आपल्या चुकीचा पश्चात्ताप झाला. त्यांनी देशपांडे ह्यांचा तपास करून सन्मानाने दरबारांत बोलावले. त्यांचा सत्कार केला आणि त्यावेळी भाषणात म्हणाले ---''देशपांडे ह्या पुण्यवान पुरूषाने गणपतीच्या कृपेमुळे राजहंसाप्रमाणे तुरूंगातून भरारी मारली. कारण ते खरोखरच निरपराध आहेत. आम्ही ह्या राजहंसाचा सत्कार करतो.''

तेव्हापासून देशपांडे हे राजहंस ह्या नावाने ओळखल्या जाऊ लागले.

* * * *


नारायण राजहंस ह्याचे वय दहा वर्षे असतांना पासून त्याच्या गायनाचे कार्यक्रम मित्रमंडळीत घडत असत. त्याला वाचीव प्रसिद्धी बरीच मिळत असे. नारायणाचे एक नातेवाईक यशवंतराव कुळकर्णी केसरीच्या कचेरीत नोकरीला होते. अकॉऊंटस् डिपार्टमेंटमधे. तिथे लोकमान्य टिळकांना ह्या कुळकर्णींचा पुतण्या लहान असून देखील खूप छान गातो अशी माहिती कुणीतरी दिली. तेव्हा एक दिवस टिळकांनी कुळकर्णींना म्हटले --- ''तुमचा पुतण्या नारायण चांगला गातो असे ऐकले ! आम्हाला एकदा ऐकवा तरी त्याचे गाणे'' स्वाभाविकच कुळकर्ण्यांना आनंद झाला. टिळकांच्या घरीच त्याच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित केला. लोकमान्यांनी तन्मयतेने त्याचे गाणे ऐकले. अगदी खूष झाले. गाणे ऐकल्यावर ते कुळकर्ण्यांना म्हणाले --- ''अरे वा ! कुळकर्णी, तुझा नारायण म्हणजे एक बालगंधर्वच आहे बुवा !'' ही गोष्ट रविवारची. नंतरच्या मंगळवारच्या केसरीमधे बातमी छापून आली. ''नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व ह्यांचे सुरेख गायन झाले.'' वगैरे वगैरे.

तेव्हापासून नारायण ''बालगंधर्व'' म्हणून ओळखल्या जाऊ लागला.

* * * *

किर्लोस्कर कंपनीचे व्यवस्थापक शंकरराव मुजुमदार हे फार तीक्ष्ण विनोद बुद्धीचे होते. जुलै १९१३ मधे बालगंधर्व, गणपतराव बोडस आणि गोविंदराव टेंबे. ही प्रमुख मंडळी कंपनी सोडून निघून गेली. त्यांनी गंधर्व नाटक मंडळी स्थापन केली त्या सुमाराची गोष्ट.

नाटकाला आलेले प्रेक्षक जिथे तिथे थुंकून थिएटर घाण करतात म्हणून शंकररावांनी थिएटरच्या रंगाऱ्याला ''इथे थुंकू नका'' अशी सूचना करणाऱ्या पाट्या रंगवायला आणि काही ठिकाणी ठोकायला सांगितल्या. त्याप्रमाणे काम झाल्यावर रंगारी एक पाटी घेऊन आला



**भाषाप्रभू - रामगणेश गडकरी**

आजपर्यंत बादशाही वैभवात वावरणारी स्त्री नारायणरावांनी अुभी केली होती.

तिला सर्वसाधारण पातळीवर आणतांना सुद्धा अेका वेगळ्या तेजानं गडकऱ्यांनी खुलवली. फाटक्या पातळाला पैठणीचं रूप देणारी सिंधू तुमच्या आमच्यातली वाटत असतांना देखील तिच्या बद्दलचा आदर दुथडी भरून वहात होता. अशी आदराने आधंबलेली स्त्री नारायणरावांनी निर्माण केली.

मात्र निर्माता होता, महान नाटककार भाषाप्रभू राम गणेश गडकरी.

आणि म्हणाला --- "नाना. ही एक पाटी उरली आहे, ती कुठं लावू?" शांतपणे शंकरराव म्हणाले --- "माझ्या तोंडावर लाव! बालगंधर्वाला सांभाळू शकलो नाही. तो कंपनी सोडून गेलाय् ! तेव्हा लोक इथंच जास्त थुंकतील!"

* * * *

किर्लोस्कर नाटक मंडळीत असतांना कंपनीतल्या मुलांना शिकवण्याकरता शंकरराव मुजुमदारांनी एका मास्तरांची नेमणूक केली होती. त्या मास्तराचे नांव होते राम गणेश गडकरी. त्यांचा आणि नारायणराव-गणपतराव बोडस ह्यांचा चांगलाच स्नेह जमला होता. गंधर्व मंडळीची स्थापना झाल्यावर नारायणरावांनी गडकरी मास्तरांजवळ नाटक लिहून मागितले. तो पावेतो गंधर्व राजकन्यांची कामे करीत. भरजरी शालू, दागदागिने, दासदासी ह्यांची नाटकामधे चंगळ होती. नाटक मागितल्यावर गडकरी म्हणाले --- "नारायणराव, तुम्हाला उंची वस्त्रप्रावरणं नेसून दासदासींच्या समवेत रंगभूमीवर वावरायची सवय, आणि तुम्हाला तसं बघण्याची तुमच्या प्रेक्षकांना सवय झालेली. माझ्या नाटकांत फाटके लुगडे नेसून दळण दळावं लागेल. कराल ?"

नारायणराव म्हणाले --- "देवा, तुम्ही जी भूमिका द्याल ती मी करीन. तुम्ही बघा तर खरं !"

गडकऱ्यांनी "एकच प्याला" नाटक लिहिले त्यात बालगंधर्वांनी सिंधूची भूमिका करून, फाटके लुगडे नेसून दळण दळत "चंद्र चवथीचा" हे पद म्हटले, "देवा तुम्ही बघा तर खरं! असं नारायणराव म्हणाले तर खरें--

पण ते बघायला गडकरी मास्तर जिवंत नव्हते.

"एकच प्याला" चा प्रयोग वीस फेब्रुवारी १९१९ साली झाला.

त्या आधी तेवीस जानेवारीला गडकऱ्यांचा सावनेर मुक्कामी मृत्यू झाला होता !

* * * *

एकच प्याला हे नाटक आणि बालगंधर्वांची सिंधूची भूमिका हे अप्रतिम रसायन त्या काळी तयार झाल होतं. त्याची महती सांगणारी आठवण वसंत शांताराम देसाई ह्यांचा मखमलीचा पडदा ह्या पुस्तकात लिहिली आहे. कथा अशी.......

''रमाकांत मंडळी बंद झाल्यावर पुन्हा एकदा नवीन कंपनी स्थापन करण्याचा बेत पांडोबा क्षीरसागरांनी १९३९ साली केला. पण सावकार मिळत नाही म्हणून ते उदास होऊन बसत. चित्रकलेची एक रेघ देखील सरळ ओढण्याची पात्रता नसतांना ''पेंटर'' ह्या टोपण नावाने बाळकृष्णबुवा जोशी नावाचे एक गृहस्थ तिथे होते. त्यांनी क्षीरसागरांना विचारलं''--- पांडू, तू हल्ली असा उदास कां असतोस ?'' ''एखादा सावकार देता का गाठून ?'' पांडोबा म्हणाला ''नाटक कंपनी काढायची आहे. त्यासाठी सावकार हवा. त्याशिवाय कंपनी कशी काढता येईल ?''

पांडोबांनी आपली अडचण आणि उदास बसण्याचे कारण सांगितले।

''पांडू, मी तुला झकास युक्ति सांगतो. एक छदाम खर्च केल्याशिवाय तुला कंपनी काढता येईल !''

पेंटरनी युक्ति सांगायला प्रस्तावना केली. पांडोबा सावरून बसले. त्यांच्या कल्पनाशक्तीत त्यांना नवीन कंपनी दिसू लागली.'' --- ''बोला पेंटर'' ते म्हणाले.

''--- तू फक्त दोन गोष्टी पैदा कर !'' पेंटरांनी सांगायला सुरूवात केली.

''पेंटर, एक सावकार सोडून दोनच काय दहा गोष्टी पैदा करून दाखवतो.'' पांडोबांनी आत्मविश्वासाने हमी दिली. आपण कल्पवृक्षांच्या छायेखाली बसलो आहोत असे त्यांना वाटू लागले.

''हे बघ पांडू, दोनच गोष्टी पैदा कर !'' पेंटर सांगू लागले --- ''बालगंधर्वा सारखं एक पोर आणि ''एक प्याला'' सारखं एक नाटक।

एकच प्याला नाटकाच्या नावातला ''च'' पेंटरांना कायमचा वर्ज्य होता !

गुरूमाऊलींचा तो आदेश एकून पांडोबा सर्द झाले.

पेंटरांनी मागितलेल्या ह्या दोन गोष्टींपेक्षा दहा सावकार मिळवणे सोपे होते. पण सकृत् दर्शनी आचरटपणाचा वाटणारा तो पेंटराचा आदेश खरोखरच अर्थगर्भ नव्हता का ?"

* * * *

बालगंधर्वांच्या संगतीत असलेला कलाकार सर्वस्वी त्यांचा होऊन जात असे. कांही कारणांमुळे त्यांच्यापासून मतभेद होऊन किंवा नोकरी वगैरेच्या कारणांनी त्यांच्यापासून दूर गेला तरी दुरावत नसे.

१९४७ साली कोल्हापूरला गंधर्व मंडळीची नाटके चालू होती. त्याचवेळी एका संगीत परिषदेसाठी तिरखवा तिथं आले होते. त्यांनी गंधर्व कंपनी सोडून रामपूरच्या दरबारी नोकरी धरली होती. गंधर्व मंडळीचं "स्वयंवर" नाटक होते आणि काही जणांनी आग्रह केला म्हणून तिरखवा त्या प्रयोगाची संगत करणार होते. नाटकाला अर्थातच लोकांनी तुफान गर्दी केली. प्रयोग संपल्यावर तिरखवा खांसाहेबांना बिदागीचे एकशे एक रूपये देऊ केले तेव्हा त्यांनी नाकारले. ज्या बालगंधर्वांच्या कंपनीत सात वर्षे नोकरी केली, ज्या बालगंधर्वांच्या कंपनीमुळे आणि बालगंधर्वांच्या साथीमुळे त्यांचा नावलौकिक झाला, ह्या नारायणरावाच्या नाटकात त्यांची मजेनी साथ केली त्याचे पैसे घेतांना त्यांना संकोच वाटला.

त्या बिदागीच्या नोटांकडे पहात खासाहेब कावऱ्याबावऱ्या नजरेने पहात म्हणाले"--- नही जी, ऐसी बुरी बात मत करो !.......मैंने पैसे लिये तो मालक क्या कहेंगे ?" तसे पाहिले तर कोण कुणाचा मालक उरला होता?

१९४३ च्या मे महिन्यांत हरीभाऊ देशपांड्याच्या मुलाच्या मुंजीत नारायणराव गात होते. वसंत शांताराम देसाई, गणपतराव बोडस, गंगाधर पंत लोंढे त्या गाण्याला उशिरा पोहाचले. त्यावेळी मैफल अैन रंगात आली होती. व्यवहाराच्या व्यस्त त्रैराशिकामुळे नारायणरावांचे आणि लोंढ्यांचे संबंध बिघडले होते. पण लोंढे क्षणमात्रच श्रोत्यांमध्ये बसले आणि मग झटकन उठून नारायणरावांच्या मागे तंबोऱ्यावर बसून स्वरसाथ करू लागले.

कलेच्या सिंहासनावर आरोहण केल्यावर कुणीही अशी सलामी द्यावी हा बालगंधर्वांचा हक्क अबाधित राहिला.

चालू पद संपल्यावर गणपतरावांनी बालगंधर्वांना ''मना तळमळसी' हे शाकुंतल नाटकातलं पद म्हणण्याची विनंती केली. क्षणार्धात नारायणरावांनी ते पद सुरू केले.

नुकतेच गणपतराव बोड्स ह्यांचे ''माझी भूमिका'' हे पुस्तक प्रसिद्ध झाले होते. बालगंधर्वांबद्दलचे सारे किल्मिश त्यांत होते. गाणं ऐकल्यावर ते म्हणाले --- ''नारायणरावाला गातांना समोर बघितलं म्हणजे सर्व विसरावसं वाटतं!''

बालगंधर्वांच्या स्वरांचा स्पर्श झाल्यामुळे व्यवहारदक्ष गणपतराव विसरून कलावंत गणपतराव बोलत होते..... ''आज नारायणरावाला पहाताच मिरज मुक्कामी त्याने किर्लोस्कर कंपनीत शकुंतलेची पहिली भूमिका केली ती आठवली. त्या दिवशी त्याने हे पद फार सुंदर म्हटले होते. पुन्हा ऐकावसं वाटलं!''

एक साधं पद ऐकतांना पन्नास वर्षांची परंपरा आणि अडतीस वर्षांच्या सहवासातील आनंदाचे मुख्य टप्पे गणपतरावांच्या समोर एकदम उभे राहिले. नारायणरावांच्या सहवासाची ही देण होती.

* * * *

कलावंत म्हटला म्हणजे तो व्यसनी असायचा हा एक समज आहे. आणि बहुतांश कलावंतानी आपल्या वागणुकीने त्याला खतपाणी घातले आहे. नारायणरावांना पान तंबाखूचे व्यसन होते. मद्यपान देखील ते अधुन मधुन करीत पण वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांनी पान खाणे सोडले. फक्त लवंग आणि तंबाखू ते खात. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांनी चहा सोडला. तो देखील कायमचा. मद्यपान मात्र तेव्हा त्यांचे सुटले नव्हते. ते सोडले त्यामागे एक लहानशी कथा आहे.

सोलापूरचे एक धनाढ्य गिरणी मालक हे नारायणरावांचे स्नेही होते. गंधर्वांचा सोलापूरला मुक्काम असला म्हणजे ते त्यांना आवर्जून मद्यपान करण्यासाठी बोलवत. त्यावेळी इतरही काही मित्रमंडळी असत. अत्यंत दर्जेदार मद्याचे सेवेन त्यावेळी होत असे. त्या जमान्यात

ध्वनिमुद्रण करण्यासाठी ''हिजमास्टर्स व्हाइस'' कंपनीचा तज्ञ परदेशांतून सहा सहा महिन्यांनी हिंदुस्थानात येत असे आणि काही ठराविक मंडळींच्या गायनाच्या ध्वनिमुद्रिका काढल्या जात. त्या दृष्टीने हिंदुस्थानातील शास्त्रज्ञांना ती कला फारशी अवगत नसल्यामुळे वारंवार ध्वनिमुद्रण करता येत नसे. १९२४ साली बालगंधर्वांच्या ध्वनिमुद्रणांत काही दोष उत्पन्न झाले. वरच्या स्वरांत त्यांचा आवाज चिरल्या सारखा येत होता. अर्थातच ध्वनिमुद्रण सदोष वाटत होते. त्यामुळे स्वाभाविकच बालगंधर्व नाराज झाले. त्यांना थोडी चिंता वाटू लागली. आपल्या मित्रमंडळीत ह्या गोष्टीची त्यांनी चर्चा केली. तेव्हा एका मद्यपान प्रसंगी, सर्वांनी मद्य, सोडा बर्फ वगैरे सगळे टाकून ग्लास तोंडाला लावण्यापूर्वी नारायणरावांचे मित्र-गिरणी मालक म्हणाले --''नारायणराव मी आपल्याला प्रेमाने बोलावतो : आपण माझा मान राखून येता देखील, पण मला वाटते आपण मद्य घेता त्यामुळे आपला आवाज असा वरच्या स्वरांवर चिरकल्या सारखा येतो. मद्यपानामुळे आपल्या आवाजावर परिणाम होतो असं मला वाटतं. तेव्हा आपण मद्यपान करू नये अशी माझी इच्छा असते!''

त्यांचे हे बालणे संपताच बालगंधर्वांनी मद्यपानासाठी घेतलेला हातातला पेला टेबलावर परत ठेवला आणि म्हणाले ---''ह्या क्षणापासून मी मद्यपान सोडले! ह्या पेल्यातील मद्यदेखील मी घेणार नाही!''

त्या क्षणापासून खरोखरच नारायणरावांनी मद्यपान कधीही केलं नाही. १९२४ साली त्यांची परिस्थिती बिकट झाली होती. तरीही त्यांनी कधी मद्याला स्पर्श केला नाही. मद्यपान करणाऱ्या मैफिलीत ते बसत. थट्टामस्करीत सामील होत. कधी कधी मित्रांच्या पेल्यात मद्य ओतून देत पण स्वतः कधीही पेल्याला स्पर्श करीत नसत!

* * * *

गंधर्व मंडळींना कर्ज झाले. ते एकूण एक लाख ऐंशी हजार झाले होते. त्या कर्जाच्या वसूलीसाठी सावकारांनी बालगंधर्व आपल्या कंपनीचा मुक्काम मुंबई येथून हलवण्याची तयारी करीत असता, त्यांचे

सामान अडवले. त्यावेळी सॉलीसीटर लाडसाहेब गंधर्वांच्या मदतीला धावले. गंधर्व कंपनीचा कारभार त्यांनी आपल्या ताब्यात घेतला. सर्व कारभारावर करडी नजर ठेवण्याकरता दादा काटदरे सारखा हुशार आणि हिशोबी माणूस देखरेख ठेवण्यासाठी नेमला. मात्र त्यांनी सुरवातीलाच दादांना सांगितले --- "आपण परावलंबी झालो आहोत असं नारायणरावांना बिलकुल वाटता कामा नये. पूर्वीसारखेच आताही ते गंधर्व कंपनीचे मालक म्हणून मिरवले पाहिजेत. ते कलावंत आहेत. त्यांना खूष ठेवलं तरच त्यांच्या हातून कलोपासना होईल. आणि सावकाराचे कर्ज फिटेल.......त्याहीपेक्षा प्रेक्षकांना त्यांच्या कलेचा आनंद कित्येक वर्ष घेता येईल." लाडसाहेब दररोज कचेरीतून परत जातांना गंधर्वांच्या बिऱ्हाडी येऊन बालगंधर्वांच्या पाठीवर थाप मारून "काय नारायणराव ठीक आहे ना ?.......घाबरायचं काही कारण नाही" असा धीर देत असत.

अनेक गोष्टीमधे सल्लामसलतीसाठी लाडसाहेब नेहमीच बाल-गंधर्वांच्या पाठीशी असत. बालगंधर्वांवर अकृत्रिम प्रेम करणाऱ्या मंडळीमधे लाडसाहेबांबरोबरच, वसंत शांताराम देसाई, मुंबईचे डॉ. अ.ना.भालेराव, डॉ. रामकृष्ण हरी भडकमकर, अलादिया खां साहेब, नरसिंह चिंतामण केळकर, काकासाहेब खाडिलकर, छत्रपती शाहू महाराज, कराचीचे तेजूमल लक्ष्मीचंद, त्यांचे वडील लक्ष्मीचंद ईश्वरदास, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, किती नांव सांगावी ! ह्या सगळ्यांना बालगंधर्वांनी जिंकून घेतलं होत. आपल्या गायनाने आणि अभिनयाने.

* * * *

बालगंधर्वांच्या नाटकांच्या प्रेक्षकांबद्दल त्यांना काय वाटायचे ते थोडे सागांयला हवे. त्यांचा प्रेक्षकवर्ग इतर कंपन्यांच्या प्रेक्षकवर्गापेक्षा अधिक संपन्न व अधिक व्यापक होता. गजांत लक्ष्मीत लोळणारे व्यापारी - जवळपास सर्वधर्माचे, समाजातील वरच्या स्तरांतील मंडळी जसे वकील, डॉक्टर, परगावांहून आलेली पाहुणे मंडळी, बहुतांश मंडळी केवळ बालगंधर्वांचं नाटक पहायला येत असत. श्रीमंत व घरंदाज विद्यार्थीगण, अशा प्रकारच्या

प्रेक्षकवर्गाने रंगमंदिर तुडुंब भरलेले असायचे. प्रेक्षकांत स्त्रीवर्गाचा भरणा ''प्रेक्षणीय'' असायचा. परीटघडीचे रेशमी कपडे, कनोजी अत्तरांचा आणि पॅरिसच्या सेंटस्‌चा सुवास, बहारदार फुलांच्या नयनमनोहर वेण्यांच्या गंधात मिसळून जात असे. मुंबईचा सर्व शौकिन वर्ग एकत्र झालेला असायचा. सिंधूचे करूण चित्र पाहून डोळ्यांतली आसवे टिपण्यासाठी शेजारच्या कोमल करपल्लवांत लव्हेंडरने भिजलेला रूमाल विराजमान झाला म्हणजे ''एकच प्याला''शी तन्मय झालेल्या प्रेक्षकांना सत्यसृष्टीची सुगंधी जाणीव झाल्या शिवाय राहत नसे.

एखादे नाटक जर कमीत कमी पांच तास चालले नाही तर प्रेक्षक नाराज होत असत. म्हणून फाल्गुनराव नाटक संगीताची जोड देऊन ''संगीत संशय कल्लोळ'' ह्या नावाने गंधर्व रंगभूमीवर आले तेव्हा त्यात ''जलशाचा प्रवेश'' टाकला, ह्या प्रवेशात मास्तर कृष्णरावांनी साधारण अर्धातास गायन केले म्हणजे तो संपायचा. ही टूम नंतर इतर कंपन्यांनी देखील सुरू ठेवली. हिराबाई बडोदेकरांच्या कंपनीत ह्या प्रवेशांत त्या जवळ जवळ पाऊण तास गात असत, तर रघुवीर सावकारांचा जलसा दीड तास चालत असे आणि प्रामुख्याने हाच प्रवेश खूप रंगत असे कारण शृंगारिक ठुमऱ्या ते हावभाव-किंवा अदा करून म्हणत असत. असो !

वेगवेगळ्या शहरातले प्रेक्षक वेगदेगळ्या पद्धतीचे असतात.

नाटक मंडळ्या वारंवार येत नसल्यामुळे इंदूर वगैरेचा प्रेक्षक, पहायला मिळेल त्या नाटकाची लज्जत, फार खोलांत न शिरता, पण आवडीने चाखायची अशी त्यांची पद्धत असे. मुंबईचा बाणा वेगळाच. हा प्रेक्षक शौकिन. त्यातल्या त्यात नवीनतेचा, शोभिवंतपणाचा, संगीताचा, विशेष शौकिन. नाटक आवडले नाही तर मुकाट्याने उठून निघून जाईल ! दक्षिण महाराष्ट्राचा प्रेक्षक सर्वसाधारण. त्यांच्यात खास वैशिष्ट्य नाही. कोकणचा प्रेक्षक म्हणजे खूप चिकित्सक. नाटक ''बरे'' आहे कळलं तरच बघायचे नाहीतर तिकडे फिरकायचे सुद्धा नाही. त्यांच्या शद्बकोशात ''चांगले'' हा शद्बच नाही. ''बरे'' हीच त्यांच्या शिफारशीची शेवटची मर्यादा. गोव्याचे प्रेक्षक फक्त गाण्याचे शौकिन ! मराठी भाषेबद्दल विशेष प्रेम नाही. पुण्याचा प्रेक्षक संगीताच्या

लज्जतदार खुमारीची आणि वाङ्मयीन वैशिष्ठ्यांची मौज लुटणारा. पुणेकरांसमोर नाटक करायचे म्हणजे एक परिक्षाच असते, असे बालगंधर्व नेहमी म्हणत. नटाच्या तोंडून एखादा चुकीचा शब्द बाहेर पडताच त्याची मस्त खिल्ली उडवतील. प्रयोग कंटाळवाणा होत चालला तर सरळ रंगभूमीवरील नटांना भजी फेकून मारतील. वऱ्हाडचा प्रेक्षक तर विचारूच नका ! गातांना बेसूर झाला की सारे एक जात ''पार्वतीपते हरहर महा दे ऽऽ व !'' ची गर्जना करतील. त्यात फक्त पिटातीलच प्रेक्षक असतील असे नाही तर खुर्चीवरील प्रेक्षकही त्यात सूर मिळवतील. ह्याहीपेक्षा जास्त म्हणजे सरळ खुर्च्या फिरवून रंगमंचाकडे पाठ फिरवून बसतील.

ही प्रेक्षकांची वर्गवारी बालगंधर्वांनी स्वतः अनुभवाने केलेली आहे।

* * * *

संगीत नाटकाची सुरूवात नांदीने होते. सूत्रधार आणि दोन पारिपार्श्वक अशी तिघं मंडळी नांदीचे गायन करीत. ह्या नांदीची सहसा दोन पदे असतात. पहिले पद केवळ ईश्वरस्तवनपर असे, तर दुसऱ्या पदातील ईशस्तवन खुबीदार असते. सहसा शंकर त्यासाठी निवडला असतो. ह्या शंकराचे स्तवन करता करता पुढे होणाऱ्या नाटकाचे कथानक त्यात मोठ्या खुबीने गुंफले असायचे. एक साधे उदाहरण देतो म्हणजे माझा मुद्दा चांगल्या रीतीने स्पष्ट होईल. संशयकल्लोळ नाटकाच्या नांदीचे दुसरे पद बघा कसे खुबीदार आहे ते. पद असे आहे......

सौख्यसुधा वितरो तुम्हा नव.
तुम्हा सदाशिव, हिमगिरीजाधव
साधु जनांचा ताप विहरवो ॥१॥

ह्या स्थाईचे शब्द सोपे. त्यामुळे सहज अर्थ कळेल, पण नंतरचा अंतरा मजेदार आहे तो असा.......

स्वकरे निजशिरी गंगा बसवी
मत्सर भावे सतीस रूसवी ।
शशिलक्षसि तू अशिवे केवी
पुसे हसे तो भवितारो ॥२॥

ह्या अंतऱ्यात खरी गंमत आहे. थोडा बारकाईने विचार करा. शंकराने स्वतःच्या हाताने --- म्हणजे आपणहून गंगेला आपल्या मस्तकावर स्थान दिलं --- गंगा ही बाई परकी. अशा परस्त्रीला डोक्यावर पाहून सतीस -- पार्वतीला राग आला. तिचा मत्सरभाव जागृत झाला.......तिला वेगळाच संशय आला. अशा मत्सराने ग्रासलेल्या पार्वतीला मिश्किलपणे विचारतो शंकर की "शशि लक्षसि तू अशिवे केवी?" तो पार्वतीला विचारतो "माझ्या डोक्यावरील चंद्राकडे तू का बरं पहाते आहेस ?" थोडक्यात शंकराला पार्वतीचा संशय आणि पार्वतीला शंकराचा संशय। असा संशय कल्लोळ । पुढच्या नाटकाच्या कथानकाची कल्पना ह्या पदातून मांडली. अशा ह्या पदाला सूचक पद म्हणत.

अशी नांदीची दोन्ही पद झाल्यावर दर्शनी पडदा उघडण्यांत येत असे अशी परंपरा.

परंतु एकदा शांकुतल नाटकाच्या वेळी अण्णासाहेब किर्लोस्कर सूत्रधार म्हणून हातात पूजेचं तबक घेऊन उभे होते. दोन बाजूला दोघे परिपार्श्वक म्हणून बाळकोबा नाटेकर आणि शेवडे त्यांच्या बाजूला उभे होते. त्यांनी नांदीचे पद सुरू केले --- "पंचतुंड नररुंड मालधर......" तो सगळा प्रसंग इतका हृद्य, इतका आकर्षक होता की पडदा उघडणारा इसम हरखून गेला. त्याला वाटलं हा प्रसंग प्रेक्षकांनी सुद्धा बघितला पाहिजे. त्याने पडदा वर उचलला आणि हे तीन महापुरुष प्रेक्षकांना दिसले. त्यांनी आनंदानं टाळ्यांचा कडकडाट केला.

तेव्हापासून नांदी पडदा उघडल्यावर होऊ लागली.

* * * *

अण्णासाहेब किर्लोस्करांच्या शाकुंतल नाटकांत दुष्यंताचे काम करणारे मोरोबा वाघोलीकर हे देवभोळे आणि साधुसंतांवर विश्वास ठेवणारे होते. ते एकदा पुण्याचे प्रसिद्ध साधू "जंगली महाराज" ह्यांचा आशिर्वाद मागायला गेले आणि त्यांना त्यांनी आपल्या नाट्यप्रयोगाचे आमंत्रण दिले. जंगली महाराजांनी त्यांच्या हातावर उद टाकला आणि

आशिर्वाद दिला. म्हणजे "जरूर येईन. मात्र प्रयोगापूर्वी हा उद्द जाळ!" बाळकोबांनी "हो" म्हणून मान हलवली. आणखीन उद्द विकत घेतला त्यात हा प्रसादाचा उद्द मिसळला. तो प्रयोगापूर्वी जाळला. प्रयोगाला सुरवात झाली. प्रयोग खूप रंगला. नंतर बाळकोबा पुन्हा महाराजांना भेटायला गेले. म्हणाले "महाराज, माझ्यावर नाराज आहांत कां ? काल प्रयोगाला आला नाहीत." तेव्हा महाराजांनी संपूर्ण नाट्य प्रयोगात जे जे घडलं ते इत्थंभूत वर्णन करून सांगितलं! बाळकोबांना आश्चर्य वाटलं. मग महाराज म्हणाले......"बेटा तू उद्द जाळलास ना ? त्याच्या धूपांत मी होतो. तुझा सर्व प्रयोग मी बघितला." बाळकोबांना खूप आनंद झाला.

तेव्हापासून नाटकांच्या प्रयोगाच्या सुरवातीला उद्द जाळण्याची प्रथा सुरू झाली. त्या धूपातून श्रेष्ठ माणसांचे आर्शिवाद पाठीशी असतात अशी भावना.

* * * *

"एकच प्याला" ह्या गडकऱ्यांच्या अजरामर नाटकासंबंधी एक आठवण.

गंधर्व नाटक मंडळीच्या नाटकाचे वाचन हाही एक मोठा सोहळा असे. एकच प्याला नाटकाचे वाचन सॉलिसिटर लाड ह्यांच्या घरी झाले. त्यांचे घर त्यांच्या श्रीमंतीला साजेसे होते. शिवाय लाडसाहेबांचे कुटुंब सगळेच सुशिक्षित आणि नाटकाचे शौकिन आणि तिथे आदरातिथ्याला काहीच कमी नसे. वाचनाला बालगंधर्व, बाळासाहेब पंडित, सॉलिसिटर वैद्य, कुंटे, लाड ह्यांच्यासह त्यांचे कुटुंबीय, गडकरी, गणपतराव बोडस, ही मंडळी होती. वाचन अर्थातच गणपतरावांनी केले. गणपतराव सारखा उत्कृष्ठ नाट्यवाचन करणारा नाट्यक्षेत्रांत कुणीच झाला नाही. त्यांनी आपल्या वाचनाने सर्वांना मनसोक्त हसवले आणि मनसोक्त रडवले सुद्धा! नाट्यवाचनानंतर नाटक सुखान्त करावे ह्याबद्दल चर्चा झाली. सुधाकरला दारू सोडायला लावून शेवटी आनंदी आनंद झाला असे दाखवावे असे काही लोकांचे मत होते. ट्रॅजडी कधी चालायची नाही लोक शोकान्त नाटक पहाणार नाहीत असे ह्या लोकांचे म्हणणे होते.

पण नारायणराव बालगंधर्वांना हे पटले नाही. सकाळपर्यंत उलट सुलट चर्चा झाली. पण त्यांना शेवट बदलण्याबद्दल नकारच दिला. आपले मत बदलले नाही आणि ते ट्रजेडीच ठेवायचे ठरले. ट्रजेडी पहायला लोक येणार नाहीत हे प्रयोगांती खोटे ठरले. ही ट्रजेडी बघायला, रडायला प्रेक्षकांनी रंगमंदिरात झुंडीच्या झुंडीने येऊन गर्दी केली, ही गर्दी कैक प्रयोग झाले तरी संपली नाही.

गंधर्वाची नाट्यसंहितेबद्दलची समज किती परिपक्व होती हे ह्या एकाच उदाहरणाने त्यांनी दाखवून दिले.

****

# ॥ ११ ॥

बालगंधर्व नटसम्राट म्हणून गाजले होते. त्यांच्या नाटकातल्या भूमिका रसिकांनी भरभरून पाहिल्या, त्याचे नितांत कौतुक केले. अशा गाजलेल्या, रसिकांच्या लाडक्या नटसम्राटाला खाजगी जीवन देखील असते. बहुतांश लोकांना त्या खाजगी जीवनाबद्दल फारशी माहिती नसते. त्याबद्दल ते फारसे उत्सुकही नसतात. आपल्या खाजगी जीवनाचा नाटकी जीवनावर काहीही परिणाम होऊ नये इतक्या तटस्थपणे सर्वच कलावंताना वागता येत नाही. मात्र बालगंधर्व त्यातले नव्हते. त्यांच्या खाजगी जीवनात अनेक दुःखाचे प्रसंग आले. क्वचित मानहानीचे देखील आले पण त्याने त्यांच्या कलाजीवनावर फारसे परिणाम झाले नाहीत. मानापमान नाटकाच्या प्रथम प्रयोगाच्या दिवशी त्यांची कन्या निवर्तली पण प्रयोग रंगतदार झाला. अमरावतीच्या एका प्रयोगाच्या आधी त्यांची दुसरी कन्या मुंबईला कानाच्या दुखण्यानं वारली --- त्या नंतरच्या प्रयोगांत त्यांच्या भूमिकेवर त्यांनी त्याची छाया पडू दिली नाही. मुलगा व्हावा म्हणून त्यांचा स्वतःचा विशेष विश्वास नसतांना देखील काही धार्मिक कार्यक्रम त्यांनी पार पाडले. मुलगा होईल ह्या खात्रीने आणि अशा प्रसंगी मुलाच्या वडीलांनी प्रसूती समयी हजर राहणे ही "धार्मिक" आज्ञा म्हणून त्या रात्रीचा प्रयोग स्थगित करून ते हजर राहिले......प्रभू कृपेने मुलगा झाला......खूप दिवसांचे पतीपत्नीचे स्वप्न साकार झाले परंतु दुर्दैवाने कांही तासातच पहाटे त्या नवजात पुत्राचे निधन झाले ! तरीही त्या दिवशी रविवारचा दुपारचा मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग बालगंधर्वांनी रंगवला असे नारायणराव बालगंधर्व !

परंतु म्हणून नारायणरावांना घरगुती जबाबदाऱ्या नव्हत्या आणि त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले असे नाही. वडील श्रीपादराव इरिगेशन डिपार्टमेंटमधे ड्राफ्ट्स्मन होते. पगार यथातथाच होता. शिवाय त्यांचा संसार मोठा. त्यामुळे पैशाची सतत ओढाताणच असायची. अशा परिस्थितीत नारायणरावांचे बालपण व्यतीत होत होते. त्यांना शिक्षणात फारशी गोडी नव्हती. परंतु ईश्वरदत्त मधुर आवाज ही त्यांना मिळालेली फार मोठी देणगी होती. वडीलांची फिरतीची नोकरी असल्याने

लहानपणीच ते त्यांच्या आतेबहीणींचे यजमान श्री. अबासाहेब म्हाळस यांच्याकडेच रहात असत. शिकण्याबद्दलची अनास्था आणि गोड आवाज ह्यांचा विचार करून जळगांव येथील मेहबूब खां ह्यांच्याकडे गायनाचे शिक्षण सुरू केले. एकंदर घरची हलाखीची स्थिती, वडिलांचे आजारपण, वडीलबंधू दादा ह्यांची देखील घराची जबाबदारी स्वीकारण्याची असमर्थता ह्या सर्वांचा विचार करून निसर्गदत्त मधुर आवाज आणि संगीताचे शिक्षण ह्यांच्या सहाय्याने वडीलांच्या संसाराला मदत करण्याच्या भूमिकेतून नारायणरावांनी किर्लोस्कर मंडळीत प्रवेश केला. त्यांच्या स्वतःच्या आवडी-बरोबरच संसाराला मदत करणे ह्या उद्देशाने नारायणराव स्त्री भूमिका करणारे कलाकार झाले. त्यावेळी त्यांचे वय केवळ सतरा वर्षे होते. ह्या लहान वयात एकत्र कुटुंबाच्या आठ दहा माणसांच्या पालनपोषणाची जबाबदारी स्वीकारण्यास सिद्ध व्हावे लागले. किर्लोस्कर मंडळीतल्या नानासाहेब जोगळेकर इत्यादी मंडळींनी, नारायणरावांच्या आईला कबूल केल्याप्रमाणे १९०७ साली वयाच्या १९ व्या वर्षी त्यांचा विवाह करून दिला. मुलगी काळीसावळी आणि रूपानं यथातथाच होती. पण आईने पसंत केल्यामुळे त्याचा प्रश्न नव्हता. त्या सुमारास नारायणराव किर्लोस्कर मंडळीत स्थिर झाले होते. त्यांच्या स्त्री भूमिकेचा बोलबाला सर्वत्र होऊ लागला होता त्यामुळे त्यांच्या दृष्टीने विवाह ही एक औपचारिक घटना होती. स्वतःच्या आणि वडिलांच्या कुटुंबाची सांपत्तिक जबाबदारी पार पाडत असतांनाच वडिलांचा आणि धाकट्या मुलीच्या मृत्यूचा आघात सहन करावा लागला. वडिलांच्या मृत्यूनंतर अर्थातच स्वतःच्या आणि वडील भावाच्या संसाराची जबाबदारी त्यांना सांभाळावी लागली. तसेच सुस्वरूप नसलेल्या आणि अपत्यांच्या अकाली निधनामुळे असंतुष्ट आणि सतत दुःखी असलेल्या पत्नी बरोबर त्यांना संसार करावा लागला.

नारायणराव तसे भोळसर स्वभावाचे होते. समोरच्या माणसावर त्यांचा चटकन् विश्वास बसे आणि एकदा त्याला आपला म्हटला म्हणजे सहसा त्याला ते दूर लोटत नसत. त्याच्यासाठी वाटेल तो त्याग, वाटेल ते कष्ट भोगायला ते तयार असत. त्याची दोन प्रमुख उदाहरणे म्हणजे

बाळासाहेब पंडित आणि गोहरबाई कर्नाटकी. बाळासाहेबांवरचा अतोनात विश्वास त्यांना फार महाग पडला. त्यांच्या एकंदर व्यवहारामुळे वयाच्या पंचवीसाव्या वर्षी त्यांना अवाढव्य कर्ज झाले. हे कर्ज फेडण्यासाठी त्यांना सातत्याने रंगभूमीवर काम करावे लागले. मात्र ह्या कर्जफेडीसाठी त्यांनी कधी कुणापुढे दीनवाणी याचना केली नाही. इतकेच नव्हे तर त्या संबंधातला त्यांच्या मनाचा मोठेपणा दाखवणारे दोन प्रसंग अतिशय बोलके आहेत. एक म्हणजे त्यांच्या पावणेदोन लाखांच्या कर्जाचा जेव्हा बोभाटा झाला आणि सावकाराच्या पठाणाने त्यांचा मुक्काम हलविण्याची तयारी चालू असता त्यांचे सामान अडवून त्यांच्यावर नामुष्कीची वेळ आणली, तेव्हा मुंबईच्या धनिकांनी तिथल्या तिथे लाख-दीडलाखाची रक्कम उभी करून त्यांना देऊ केली तेव्हा ती त्यांनी अत्यंत विनयाने नाकारली आणि दुसरा प्रसंग म्हणजे नाट्यशताब्दी महोत्सवानंतर बालगंधर्वांच्या मदतीसाठी एकच प्याला नाटकाचा प्रयोग झाला तेव्हा.......माधवराव मुन्शी ह्यांचे कर्ज फेडून उरलेली रक्कम बालगंधर्वांना देऊ केली तेव्हा ती त्यांनी मोठ्या मनानं डॉ. भालेरावांना परत केली आणि सांगितलं --- ''पंधरा दिवसांपूर्वी मुंबई गोदीस्फोटांत मरण पावलेल्याच्या नातेवाईकांना ही वाटून द्या!'' ही कथा मागे सांगितली आहे. एकदा 'आपला' म्हटल्यावर त्याला अंतर न देणं ही त्यांची कृती होती. ह्या कृतीमुळेच गोहरबाईंना त्यांनी शेवट पर्यंत आपली मानली. त्यांचे अतिशय जवळचे स्नेही आणि हितकर्ते वसंत शांताराम देसाई ह्यांनी तिला सोडण्याबद्दल परोपरीनं समजावलं परंतू नारायणरावांनी ते ऐकल नाही. गोहरबाईच्या मृत्यूनंतरच त्या दोघांची ताटातूट झाली.

रंगभूमीवर अतिशय मोठा नावलौकिक मिळाला तरीही आपल्याला अजून खूप शिकायचं आहे ही कृती त्यांनी शेवटपर्यंत सोडली नाही. त्यांच्या रंगभूमीवरच्या कारकीर्दीच्या सुरवातीला गोविंद बल्लाळ देवल ह्यांच्या सारखे त्यांना गुरू मिळाले. जोगळेकरांसारखा दिलदार मनाचा मालक मिळाला. खाडिलकरांनी त्यांच्या अभिनयाला वैचारिक दिशा दिली. गोविंदराव टेंबे, भास्कर बुवा बखले ह्यांनी त्यांच्या तयार असलेल्या गळ्यावर अधिक संस्कार केले. त्यामुळे खाडिलकर बखले



**संगीताचार्य भास्कर बुवा बखले**

बालगंधर्व खरे खुलले ते 'स्वयंवर' मधे ! शास्त्रशुद्ध, सर्वस्वी शास्त्रीय - आणि तेही अुच्च दर्जाचे शास्त्रीयसंगीत संगीत स्वयंवर मधे योजिले होते.

- नाट्याचार्य खाडीलकरांचे गद्य    - भास्कर बुवांचे संगीत    - बालगंधर्वाचे गायन

असे तीन दिग्गजांचे नाटक म्हणजे संगीत स्वयंवर

इतकंच नव्हे तर इतर सर्वच बाबतीतला झगमगाट स्वयंवर मधे होता. स्वयंवर संगीत रंगभूमीला सर्वार्थाने वैभवाच्या शिखरावर नेणारं नाटक टरलं !

ह्यांच्याबद्दल त्यांना नितांत श्रद्धा होती. निस्सीम भक्तीभावाने ते त्यांच्याबरोबर वागत. आपल्या गुरूजनांबद्दल ते नेहमी आदरानेच बोलत. तशीच श्रद्धा आपल्या आईवर देखील होती.

नारायणराव आपल्या पत्नीशी एकनिष्ठ होते. वास्तविक ती रूपाने यथातथाच होती आणि मुलांच्या अपमृत्युमुळे सदैव दुःखी कष्टीच होती. वास्तविक त्यांचे रूप, मिळविलेली अमाप लोकप्रियता, समाजातील स्थान लक्षात घेता परस्त्री लाभ त्यांना अशक्य नव्हता. पण कलाकारांन आपलं चारित्र्य उज्ज्वलच ठेवलं पाहिजे ह्यावर त्यांचा विश्वास होता. नाटकी माणूस सज्जन आणि सद्गुणी नागरीकही असू शकतो हे त्यांनी स्वतःच्या उदाहरणाने सिद्ध करून दाखवले होते. त्यांच्या वर्तवणुकीमुळे नटांविषयीची अनिष्ट भावना समाजातून नाहीशी होण्याला मदत झाल्याचे गोविंदराव टेंबे ह्यांनी आपल्या आत्मवृत्तात नमूद करून ठेवले आहे. ते आपल्या चारित्र्यामुळे "देव माणूस" म्हणून गणले जाऊ लागले. सर्वच लोकांची बालगंधर्वावर श्रद्धा बसू लागली होती. त्यांच्या स्त्रीभूमिकांच्या परिणामकारकतेला आणि लोकप्रियतेला फायदा मिळाला. गडकऱ्यांची ही खरोखरच सिंधू आहे अशा भावनेने त्याची भूमिका लोक पाहू लागले. जितकी पुरूष मंडळींना त्यांच्याबद्दल आपुलकी वाटत होती त्याहीपेक्षा जास्त स्त्रियांची त्यांच्यावर भक्ती जडली. स्त्रियात ज्या चंचल वृत्तीच्या, किंवा चंचल बनू शकणाऱ्या स्त्रिया होत्या, त्यांच्या भक्तीचा गैरफायदा घेणे बालगंधर्वांना अगदी सहज शक्य होते. पण त्यांनी एकाही स्त्रीकडे वाकड्या नजरेने बघितले नाही. बरोबरीच्या इतर नटांबद्दल देखील त्यांनी नेहमी आदरवृत्तीच ठेवली. त्यांची त्यांनी कधी कुचेष्टा केली नाही. एखादी भूमिका किंवा गाणे आवडले नाही तरी--- "हे आम्हाला पटत नाही" अशा मउ शब्दात आपली नापसंती सांगत, गणपतराव जोशी, केशवराव दाते, गणपतराव बोडस यांच्या कलेबद्दल त्यांना खूप आदर होता. त्यांचा आणि गणपतराव बोडस ह्यांचा बेबनाव होऊन बोडस कंपनी सोडून गेले. काही वर्षानंतर त्यांना पुन्हा कंपनीत आणण्याचे प्रयत्न सुरू केले, ते नारायणरावांनीच; आणि त्यांच्या असहायतेचा फायदा घेत त्यांनी जेव्हा बऱ्याच पैशाची मागणी केली

तेव्हा मध्यस्थी करणारे वसंत शांताराम देसाई ह्यांनी त्याबद्दलची नाराजी व्यक्त केली. तेव्हा बालगंधर्वांनी ''देवा, त्यांचा अधिकारच तसा आहे.'' असे म्हणून गणपतरावांची बाजू घेतली. केशवराव भोसल्यांच्याकडे ''संयुक्त मानापमान'' च्या प्रयोगाचा प्रस्ताव घेऊन नारायणराव स्वतः त्यांच्या कंपनीत त्यांना भेटायला गेले. त्यांना कंपनीत पाहून केशवराव गहिवरून गेले. केशवराव दात्यांना ते म्हणत--''केशवराव, खडाष्टक नाटकांत तुमच्या बरोबर नायिकेची भूमिका करण्याची माझी खूप इच्छा आहे''. गोविंदराव टेंबे म्हणायचे ''नारायणरावांना मी खूप सुसंस्कृत माणूस समजतो. कारण ते स्वतःबद्दल कधीच बोलत नाहीत.'' खेळात जरी कुणी लबाडी केली तरी त्यांना पटत नसे. स्वतःच्या आणि नाटकांतल्या कपड्यांची ते अतिशय चांगली निगा राखीत माधवराव वालावलकर गमतीनं म्हणत''. नारायणराव कपड्याची निगा जशी राखतात तशी पैशाची राखली तर त्यांना कधीच कर्ज होणार नाही.'' त्यांच्या व्यसनाबद्दलची कथा इतरत्र आली आहे. नारायणराव सुग्रास भोजनाचे भोक्ते होते. गंधर्व मंडळीचे जेवण उत्कृष्टच असले पाहिजे ह्यावर त्यांचा कटाक्ष असे. त्याचा स्वयंपाकी उत्कृष्ट होता. त्याच्या हातचा स्वयंपाक इतका चाविष्ट असे की मिरजेचे राजेसाहेब देखील जेवून खूष झाले होते. त्यांना दोन्ही प्रकारच्या-शाकाहारी आणि मांसाहारी जेवणाची आवड होती. मांसाहारी मधे कोंबडी त्यांची विशेष आवडती डिश होती. त्यासाठीचा स्वयंपाकी सुद्धा एक मुसलमान गवळी होता. त्याच्या शिवाय इतरांच्या हातचे जेवण त्यांना रूचत नसे. त्याचे नाव कासम गवळी.

त्यांना कपड्यालत्याचा विशेष शोक होता. भारी किमतीच्या विलायती पद्धतीचे पोषाख, मुसलमानी पद्धतीच्या अचकनी, सुरवारी, फरकॅपस्, पादत्राणे इत्यादि अनेक प्रकार संग्रही असत. त्याची निगा देखील ते फार चांगली ठेवत. १९२१ साली खादीच्या चळवळीत ते खादीचे धोतर, शर्ट, टोपी याही वेषांत वावरले. कालिदासांच्या उक्ती प्रमाणे ''जातीच्या सुंदरांना कांहीही शोभते.'' तसे कोणत्याही वेषात बालगंधर्व आकर्षक दिसत.

पैशाच्या बाबतीत ते अत्यंत अव्यवस्थित होते. त्याकडे त्यांनी संचयाच्या दृष्टीने कधीच पाहिले नाही. लाखो रूपये कमावले पण त्याचा कधी व्यवस्थित हिशोब ठेवला नाही. आपल्याला नक्की किती कर्ज आहे ह्याचा हिशोब सुद्धा त्यांना कधी निश्चित माहिती नव्हता. रंगभूमीला; त्यांची पात्रे ज्या रंगभूमीवर वावरत असत. त्या रंगमंचाला सजवण्या करता त्यांनी पैशाची पर्वा केली नाही. जे स्वस्त असेल ते चांगले असूच शकत नाही अशी त्यांची धारणा होती. रंगभूमी सजवतांना बेहिशोबी कारभारामुळे आणि अतरिकी स्वभावामुळे प्रचंड कर्ज. त्यांच्या वाटेला आले. नाटकांत सर्वच उत्कृष्ट असलं पाहिजे ह्या हव्यासापायी चांगल्या चांगल्या कलाकारांचा त्यांनी संग्रह केला. मास्तर कृष्णराव सारखे गायक, रघुवीर सावरकर, सदाशिव रानडे सारखे स्त्रीभूमिका करणारे नट, पेठकर, बालावलकर, पंढरपूरकर, विनायकराव पटवर्धन सारखे गायक नट ह्यांचा कंपनीत संग्रह केला. त्या बरोबर त्यांना मानाने वागवले. इतर नटांच्या कर्तुत्वाची त्यांनी कदर केली. गणपतराव बोडसांसारख्या नटाची व्यक्तिशः मतभेद झाले तरी त्यांच्या कलेची बूज राखून प्रतिष्ठेचा प्रश्न न करता वेळ प्रसंगी त्यांना पुन्हा कंपनीत सामावून घेतलं. कादरबक्ष, तिरखवा सारखे संगतीकार गंधर्व नाटकांचे भूषण म्हणून वावरत होते. ह्या सर्व कलाकारांनी बालगंधर्वांबरोबर कामे करतांना स्वतःला धन्य समजूत घेतलं हाही भाग तितकाच महत्त्वाचा म्हटला पाहिजे. त्यामुळे गंधर्व मंडळी म्हणजे एक टुमदार संस्थानच समजल्या जात असे. आपण मालक आहोत ह्या भावनेने नारायणराव कधीच वागले नाहीत. सर्व कलाकार मंडळी ह्या आपुलकीमुळे खूष असत. कलेच्या बाबतीत बालगंधर्वाइतका दिलदार कलावंत झाला नसेल. त्याची एक आठवण पु.रा.लेले ह्यांनी सांगितली आहे.....''हुबळीच्या मुक्कामात बालगंधर्वांचा आवाज बसला होता. पण जोगळेकरांच्या प्रवेशात नेहमीचीच पट्टी ठेवण्यास बालगंधर्वांनी सांगितले आणि अन्य प्रवेशाच्या वेळी मात्र खालची पट्टी सांगितली – –'' माझ्या मुळे नानासाहेब जोगळेकरांच गाणं आणि त्यामुळे काम बिघडायला नको. माझं मी सांभाळून घेईन'' म्हणाले.

''नाटकाच्या दिवशी नारायणराव व्रतस्था प्रमाणे वागत. रात्रीचे

नाटक असले म्हणजे दुपारी-झोप येवो न येवो, डोळे मिटून पडून रहात. ही सूचना त्यांना काकासाहेब खाडिलकरांनी दिली होती. सहा साडेसहा वाजता दाढी करून नाटकगृहात जाऊन स्नान करीत. त्यांना रंगायला दोन अडीच तास लागत. केसांचा टोप घट्ट आवळून बांधत. नाटकांत वापरायचे वस्त्रालंकार लेवून झाल्यावर ते एकतर स्वतःच्या खोलीत तरी असत किंवा रंगमंचावर ! उगीच इकडे तिकडे फिरत चकाट्या पिटत असलेले बालगंधर्व कधी कुणी बघितले नाहीत. दोन प्रवेशामधे किंवा अंकामधे भेटायला येणाऱ्या मंडळीशी फारशी सलगी दाखवत नसत. त्या भूमिकेशी तद्रूप अवस्थेतच ते नाटक संपेपर्यंत गुंगलेले असत. नाटक संपल्यावर रंग पुसून पुन्हा स्नान करून मुक्कामावर जाऊन न जेवता झोपत. नाटक चालू असतांना मध्यंतरात घेतलेले दूध किंवा मोसंबीचा रस ह्यावरच ते असत. आपल्या सोंगाबद्दल (मेकअप) ते अतिशय जागरूक असत. ते मनासारखे झाल्याशिवाय नाटकाची सुरवात होत नसे. त्यामुळे पुष्कळदा गंधर्वांचे नाटक उशीरा सुरू होई. रंगमंचावर दोन्ही विंगमधे मोठे आरसे ठेवलले असत. त्यात पाहून नाटक सुरू असतांना देखील आपले वस्त्रालंकार ठाकठीक असल्याची सतत खात्री करून घेत असत. चढवलेल्या स्त्रीवेशात नाटकांव्यतिरिक्त बालगंधर्व कधी रंगमंचावर वावरले नाहीत. हा त्यांचा नियमच होता. त्यामुळे मध्यतरातल्या सत्कार समारंभासाठी ते कधीही उपलब्ध होत नसत ! नारायणरावांच्या स्त्रीसोंगामध्ये एक प्रकारचा भारदस्तपणा होता. ते कधी छचोर दिसत नव्हते. त्याबद्दलचं शिफारसपत्र प्रत्यक्ष त्यांच्या आईनेच एकदा दिले. एकदा त्यांचे बंधू बापुराव ह्यांनी संशयकल्लोळ मधे रेवतीची भूमिका केली तेव्हा त्या दोघांची सुरेख तुलना करतांना त्या बापूरावांना म्हणाल्या की ''रेवतीची भूमिका करतांना नारायणाचे सोंग तुझ्यासारखे छचोर दिसत नव्हते.'' आपले रंगभूमीवरचे दर्शन नेहमी चांगले--आदरणीय दिसावे ह्याची नितांत काळजी बालगंधर्व घेत. आणि ह्यातच त्यांच्या यशाची मेख होती, असं म्हणावं लागेल. आपल्या वेशभूषेचे आणि केशभूषेचे त्यांनी इतके मोहक प्रकार दाखवले की उच्चभ्रू समाजातील रसिकांना देखील त्याचे अनुकरण करावेसे वाटत असे. शिवाय जन्मभर स्त्रियांच्या भूमिका करून सुद्धा त्यांच्या रंगभूमी व्यतिरिक्त वावरण्यात कधी बायलेपणा

दिसून येत नव्हता. रंगमंचावरचे बालगंधर्व वेगळे आणि इतरत्र वावरणारे नारायणराव वेगळे. जणू ही त्यांची दोन रूपे त्यात होती.

नारायणरावाच्या पुरूषी सौंदर्याच्या मानाने त्यांची पत्नी विशेष सुरूपरूप नव्हती. नाटकवाल्यांची लग्ने त्या काळात सहजासहजी होत नव्हती आणि म्हणून की काय एका गरीब घराण्यातली आणि साधारण स्वरूपाची मुलगी त्यांची पत्नी झाली होती. त्या नारायणरावांशी आणि नारायणराव त्यांच्याशी एकनिष्ठ होते पण ''एका लोकोत्तर कलावंताच्या जीवनात त्यांच्या पायाखाली फुलांच्या पायघड्या पसरवतील'' अशा नारायणरावांच्या पत्नी नव्हत्या. आपल्या पतीला कर्ज नसावे असे त्यांना स्वाभाविकच वाटत होते. शिवाय त्यांची अनेक अपत्ये--त्यातही बहुतांशी पुत्र, अगदीलहान वयात वारल्यामुळे एक प्रकारची खिन्नता त्यांच्या हाडीमासी खिळली होती. ती खिन्नता त्यांची त्यांनाच सहन करावी लागत होती. नारायणरावांना आपले मन गुंतवायला त्यांची नाट्यकला होती. तशी परिस्थिती पत्नी लक्ष्मीबाईची नव्हती. अशा परिस्थितीत आणि मूळच्या अशिक्षितपणामुळे ''मुलं मारायची नाटके करता म्हणून आपली मुलं अल्पजीवी ठरतात.'' म्हणून ''एकच प्याला'' सारखे नाटक करू नये असे त्यांना वाटत असे. तसे त्या नारायणरावांजवळ बोलून दाखवत. अशा मनोवृत्तीत त्या असतांना नारायणराव घरी असले म्हणजे त्यांच्या डोक्याशी अशा प्रकारची भुणभुण सतत असायची. गोहरबाईकडे नारायणरावाचा कल होण्यास हेही एक कारण असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. शिवाय ''गोहरबाईने गंधर्व कंपनीत पाचशे रूपये पगारावर रहायचे आणि नाटकातल्या भूमिका तयार होईपर्यंत वर्षभर बिनपगारी रहायचे कबूल केल्यामुळे'' त्या खूप स्वार्थत्याग करीत आहेत असे बालगंधर्वांना वाटले. अशा वाटाघाटी चालू असतांना गोहरबाई कंपनीत येणार आणि नारायणराव आता सर्वस्वी तिच्याच तंत्राने वागणार'' अशा समजूतीमुळे बालगंधर्वाजवळच्या आप्त मंडळींनी त्यांच्याशी फटकून वागायला सुरवात केली. त्यामुळे की काय ते गोहरबाईकडे अधिकाधिक आकर्षित होत गेले. गोहरबाई त्यांच्या आयुष्यात आली तेव्हा त्यांचे कलात्मक जीवन उतरणीला लागले होते. वय वाढलं होते त्यांनी सादर केलेल्या स्त्री भूमिका तितक्याशा आकर्षक दिसत

नव्हत्या. कर्ज फिटण्याची लक्षणं दृष्टिपथांत नव्हती. अशा प्रसंगी रक्ताची माणसं त्यांच्यापासून दूर जाऊ लागली होती. अशा वातावरणात गोहरबाई त्यांना मदतीचा हात देऊ पहात होत्या. त्यात गोहरबाईचा स्वार्थ असू शकेल, पण नारायणरावांना त्यांच्या रूपानं आशेचा किरण दिसू लागला होता. अशा परिस्थितीमुळे बालगंधर्व गोहरबाईकडे झुकू लागले असावे.

नारायणरावांना लेखनाची किंवा वाचनाची आवड नव्हती. कंपनीतल्या मुलांना चांगले वळण लागावे, त्यांचे विचार सुबुद्ध असावे ह्याची काळजी किर्लोस्कर कंपनीतले व्यवस्थापक शंकरराव मुजुमदार नेहमी घेत असत. त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत ह्यासाठी ते नेहमी जागरूक असत. ''नाटक कंपनीत गेल्यावर मुलं बिघडतात''... ''नट मंडळी चांगल्या विचाराची नसतात''.... ''ह्या नटांपासून शहाण्या माणसाने दूरच राहिले पाहिजे''..... वगैरे समाजात असलेले गैरसमज निखंदून काढले पाहिजेत. अशी त्यांची विचार धारणा होती. म्हणूनच कंपनीतल्या मुलांना शिकवण्यासाठी मास्तर म्हणून राम गणेश गडकऱ्यांची योजना केली होती. त्या गडकरी मास्तरांनी देखील नारायणरावांना हरिभाऊ आपटे ह्यांच्या कादंबऱ्या वाचण्यासाठी आणून दिल्या होत्या. पण त्यांना कधी वाचनाची आवड लागली नाही. भास्करबुवा बखले ह्यांनी त्यांना दैनंदिन रोजनिशी लिहायला सांगितले होते पण ते काम सुद्धा त्यांनी शिस्तशीरपणे कधी केले नाही. पत्र मात्र ते एकाग्रतेने लिहित. ते देखील डोक्यावर टोपी घालूनच. पत्र सविस्तर असे. शेवटी सर्वांना नमस्कार, आशीर्वादादि मजकूर असे. तो देखील शक्यतो नावे वगैरे घेऊन. पत्र लेखन किंवा एखाद्या कागदपत्रावर सही, टोपी घातल्या शिवाय त्यांनी केली नाही.

बालगंधर्व लहरी होते असा गैरसमज उगाचच पसरला होता. लहरीपणाला मनाची चंचलता असायला हवी. नारायणरावांत ती मुळीच नव्हती उलट ते ठाम होते. विचारात आणि वागणुकीत. ह्या ठामपणाने क्वचित प्रसंगी त्यांना नुकसान सोसावे लागले. ते त्यांनी बिनबोभाट सोसले.

आता थोडं त्यांच्या व्याख्यान बाजीबद्दल सांगायला हवं. त्यांच्या

ऐन वैभवाच्या काळात सर्वांना त्यांच्याबद्दल कुतूहल होतं. आणि ते स्वाभाविक होय. रंगभूमी व्यतिरिक्त त्यांना बघण्याची साहजिकच सर्वांना इच्छा असायची. त्यांना अध्यक्ष केलं म्हणजे साहजिकच सभेला गर्दी होणार. अशी गर्दी जमवणाच्या इच्छेने लोकांनी नंतर नंतर बालगंधर्वांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावण्यास सुरूवात केली.

नारायणरावांनी उदार मनाने बहुतांश आमंत्रणांचा स्वीकार केला आणि भराभर अध्यक्षीय भाषणे ठोकायला सुरूवात केली. सतत रंगभूमीवर वावरल्याने रंगमंच भीती (स्टेज फ्राईट) म्हणतात तसे काही नव्हते हे खरे. पण आतापर्यंत दुसऱ्या कुणी--म्हणजे नाटककर्त्याने लिहिलेली भाषणे पाठ म्हणायची सवय होती. स्वतः आपल्या बुद्धीप्रमाणे भाषण करण्याचा सराव नसल्याने भाषणात ते स्वैर भटकत जायचे. अशा लांबलेल्या, कंटाळवाण्या भाषणाने श्रोते चुळबुळ करू लागले म्हणजे "शेवटी मी गाणं म्हणणार आहे" असं सांगून त्यांना स्वस्थ बसवायचे. भाषण करतांना काय बोलावे हे जसे महत्त्वाचे असते तितकेच काय बोलू नये ह्यालाही खूप महत्त्व असते आणि नेमका त्याचाच बालगंधर्वांना विसर पडत असे. त्यामुळे बरेच अनास्था प्रसंग उद्‌भवले. त्याला प्रत्येक वेळेला ते स्वतःच जबाबदार असत असे नव्हे, तर गर्दी जमवण्याच्या हव्यासापायी त्यांना भाषण करण्याचा आग्रह करणाऱ्या संयोजकांनाही जबाबदार धरायला हवे. नारायणरावांना बघण्याकरता गर्दी जमते म्हणून संयोजकांनी धडाधड बालगंधर्वांची भाषणे आयोजित करायला सुरूवात केली. अनेक वेळा कार्यक्रमाचे किंवा उद्‌घाटनाचे स्वरूप आणि बालगंधर्वांची कला ह्यांचा काहीही संबंध नसता नारायणरावांना आमंत्रणे येऊ लागली आणि बालगंधर्व ती स्वीकारू लागले. सुरवातीला त्यांच्या असंख्य चाहत्यांनी त्यांच्या भाषणाचे कौतुक केले आणि नंतर तो एक चेष्टेचा विषय झाला. केवळ गर्दी जमवण्याकरिता निमंत्रकांनी एका लोकोत्तर नटाला उघडा पाडला. असे व्हायला नको होते. खाडिलकरांनी ह्या संबंधात केलेले एक विधान फार महत्त्वाचे आहे.." चांगला नट ही एक सुरस कथा राहिली पाहिजे. (Fable) त्याने रंगभूमी व्यतिरिक्त इतर वेळा सहजासहजी लोकांच्या दृष्टीला पहायला नको." पण बालगंधर्वांनी ह्या भूमिकेकडे नकळत का होईना पण पाठ फिरवली. त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागले.

त्यातही पुन्हा बहुतांश भाषणानंतर त्यांचे गाणे विनामूल्य ऐकायला मिळायचे त्याचाही परिणाम काही अंशी झाला असणार. पण त्यांच्या भाषणाचा सर्वात भयानक परिणाम झाला १९३३ सालच्या मे महिन्यातील वसंत व्याख्यान मालेत. विषय होता--''कुलीन स्त्रिया आणि रंगभूमी.'' त्यावेळी त्यांनी एक विचित्र विधान नाव घेऊन केले. ''कुलीन स्त्रिया रंगभूमीवर गेल्या म्हणजे बिघडण्याचाच संभव अधिक...दुर्गाबाई खोटे म्हणतात मी काम करीन तर गोविंदराव टेंब्यां बरोबरच''. गोविंदराव तुमचे गुरू असतील पण असा आग्रह कां ?'' ह्या वाक्यावर वर्तमान पत्रातून कडाडून टीका झाली. दुर्गा खोटे ह्यांचे वडील सॉलीसीटर लाड -- ज्यांना बालगंधर्वाबद्दल नितांत आदर होता. अतिशय व्यथित झाले. त्यांनी बालगंधर्वाच्या विरूद्ध फौजदारी आणि दिवाणी दावा दाखल केला. शेवटी वसंत शांताराम देसाई ह्यांनी सुचविलेल्या खुलाशाने प्रकरण मिटले पण लाडसाहेबांच्या मनात काही काळ किल्मिश राहिले ते राहिलेच''.

नारायणरावांच्या भाषण बाजीच्या काळ्याकुट्ट ढगाला सोनेरी किनार लाभली ती त्यांच्या मुंबई येथील नाट्यशताब्दी महोत्सवाच्या अध्यक्षीय भाषणाने. त्या कार्यक्रमात बालगंधर्व फार सुंदर बोलले. त्यात चित्रपट सृष्टीची आणि नाट्यसृष्टीची तुलना, पुरूष नटांच्या स्त्री भूमिका संबंधीचे विचार, रंगभूमीवरील संगीताबद्दलचे विचार, जुन्या नाटकांवरील जुनेपणाच्या आरोपांना दिलेले उत्तर, देवल किर्लोस्करादि वाङ्मय प्रभूंबद्दलचा आदर. इत्यादि बद्दलची त्यांची मते त्यांनी फार सुंदर रितीने मांडली. सारा श्रोतृवृंद भारावून गेला होता. सर्व वर्तमान-पत्रांनी प्रमुख समीक्षक मासिकांनी ह्या भाषणाची प्रशंसा केली. आपल्या पूर्वीच्या भाषणांनी वक्ता म्हणून त्यांच्या करीअरला लागलेला डाग स्वच्छ धुतला गेला.

आपल्या अध्यक्षीय भाषणांत ते म्हणाले......

''भगिनींनो आणि बंधूंनो, नाट्यकलेच्या महोत्सवासाठी आज इतक्या प्रचंड जमावाने आपण ह्या मंडपी जमला आहात ते माझे भाषण ऐकण्यासाठी नाही ही खात्री आहे... आपण मंडपात बसला आहात ते आपल्या नाट्यकलेवरील निरसीम प्रेमामुळे. आणि मी जो आपल्या

समोर उभा आहे तो गेली अडतीस वर्षे ज्यांनी मला सांभाळले त्या माझ्या अन्नदात्या, आश्रयदात्यांना डोळे भरून पहाण्यासाठी. एके ठिकांणी पाहण्यासाठी! ''माझे परमपूज्य गुरू काकासाहेब खाडिलकर जर ह्या समारंभाचे अध्यक्षपद स्वीकारू शकले असते तर आपल्याला जितका आनंद झाला असता त्यापेक्षा अधिक आनंद मला झाला असता..... पित्याप्रमाणे काळजी वाहणारे गुरू म्हणून सतत मी त्यांच्या चरणांना स्पर्श करीत आलो आहे. प्रभूरामचंद्रा ऐवजी त्यांच्या पादुका सिंहासनावर मांडून ज्या प्रमाणे भरताने अयोध्येचा दरबार भरवला त्या प्रमाणे काकासाहेबां ऐवजी माझी योजना करून आपण हा नाट्यकलेचा दरबार भरवला आहे अशी माझी श्रद्धा आहे''.

''क्षणाक्षणाला बदलणारी चित्रे, क्षणमात्र रिझवणारे संगीत, नेहमी नवीनतेचा भास उत्पन्न करीत राहणे, ही जशी चित्रपट कलेची रसिकांना भुलवणारी शस्त्रे आहेत. तशाच ह्या तिच्या पायातल्या बेड्या आहेत. या चंचलतेमुळे चित्रपटांना कोणताही एकरस उत्पन्न करता येत नाही. किंवा ऐखादा प्रभावी संदेश देता येत नाही. साधा मद्यापानाचा विषय घ्या. तो जितका विद्याहरण किंवा एकच प्याला नाटकांत रंगवल्या गेला तितक्या चांगल्या रितीने चित्रपटांत रंगवता येईल असे मला वाटत नाही..... चित्रपट हे एक सुंदर स्वप्न असते तर नाटक हे जिवंत जिवित असते...''

पुरूष नटांच्या स्त्री भूमिका संबंधी आणि रंगभूमीवरील संगीता विषयी ते म्हणाले----

''---- आता आतापर्यंत स्त्रिया रंगभूमीवर येत नव्हत्या. पण बायकांसाठी आपण खोळंबुन बसलो असतो तर आज हा शंभर वर्षाचा महोत्सव आपल्याला साजरा करताच आला नसता.... एक प्रकारचा आपद्धर्म म्हणूनच माझ्या सारख्या पुरूषांना स्त्री भूमिका कराव्या लागल्या.... थोर थोर नाटककारांना आपल्या नाटकांतून नायिकांची कधीही विसरता न येण्याजोगी स्वभावचित्रे रंगवावीशी वाटली इतक्या कसोशीने आम्ही आपली सेवा केली आहे. हे आपण विसराल असे मला वाटत नाही....

''आज सभोवती पाहिले तर जुनी संगीत नाटके ज्या प्रमाणांत केली जातात त्या प्रमाणांत गद्य नाटके केली जात नाहीत असे आपणास

दिसून येईल..... संगीताने नाटकांचे आयुष्य वाढवले आणि गेल्या काही वर्षाच्या आपत्कालातून नाट्यकलेला संगीतानेच वाचवले असे आपण कबूल कराल. चाळीस वर्षापूर्वीचे संगीत मानापमान आजही संगीतामुळे लोकप्रिय राहिले आहे हे आपण कबूल कराल... हा दोष गद्य नाटकांचा किंवा लोकोत्तर गद्य नटांचा बिलकुल नाही. तुम्हा आम्हावर हुकूमत गाजवणाऱ्या संगीत.... नादब्रम्हाची ती जादू आहे. जुन्या जमान्यातील खाडिलकर, कोल्हटकर, वरेकर, गडकरी ह्या श्रेष्ठ नाटककारांनी संगीत नाटकेच प्रामुख्याने लिहिली याचे कारण नाट्यकलेवरचा संगीताचा प्रभाव. ह्या नाटककारांनी मान्य केला आहे. किर्लोस्करांच्या जमान्यात पहाटेपर्यंत चालणारी नाटके आम्ही रात्री दीडपर्यंत संपवू लागलो. तसेच नेपथ्यातही पुष्कळ कलात्मक बदल केले. आम्ही नव्याशी सहमत असलो तरी समरस झालो नाही ह्याचे कारण आमच्या अभिनयाची मूस अेका विवक्षित परंपरेत ओतली गेली होती.

मराठी रंगभूमीला वाईट दिवस कां आले ? याचे विष्लेषण करतांना ते म्हणाले -- ''याचे कारण जुनी नट मंडळी म्हातारी झाली आणि नवे नट पुढे आले नाहीत. जुने नाटककार थकले आणि नवीन निर्माण झाले नाहीत. अण्णासाहेब किर्लोस्कर, देवल मास्तर, रंगभूमीवर पाऊल टाकतांच ऐखादा तेजस्वी ऋषिकुमार आपल्यासमोर उभा आहे असे वाटावे. आणि ज्यांच्या गायनाला सूर्याचीच उपमा द्यावी लागेल असे भाऊराव कोल्हटकर, स्त्रियांनी सुद्धा पहात रहावे अशा गोंडस स्त्री भूमिका करणारे गोपाळराव मराठे अशा अनेक नटांची आणि लोकमान्यांच्या संदेशाच्या तेजस्वितेने रंगभूमीला प्रकाशमान करणारे खाडिलकर आणि ज्ञानेश्वरानंतर मराठी भाषेला पुन्हा जिवंत करून शृंगारणारे गडकरी मास्तर'' अशा वाङ्मयप्रभु, प्रमुख गायक आणि प्रमुख चित्रकार नाट्यकलेच्या सेवेसाठी धावून गेले होते. त्या आमच्या पूर्वीच्या आणि बरोबरच्या नाट्यसेवकांच्या कारकीर्दीची कुशी वांझ होती असे आपण कसे म्हणाल ?'' नव्या नटांना आणि नाटककारांना उद्देशून ते म्हणाले -- ''आता नव्या पद्धतीने नाटके झाली पाहिजेत परंतु ते नवे प्रयत्न करतांना आम्हाला ज्या कारणांमुळे आमच्या काळात यश मिळाले, ती कारणे आपण विसरू नका. नाटके तीन तासांची करा किंवा दीड तासाची करा, संगीत शिल्लक ठेवा अगर ठेवू नका, पौराणिक

करा किंवा सामाजिक करा, एक प्रवेशी अंकाची करा किंवा अनेक प्रवेशांची करा, त्यांत जर सौभद्र-मृच्छकटिका प्रमाणे आमच्या हिंदू मनाला आनंद देणारे प्रसंग नसतील. काकासाहेबांच्या नाटकांप्रमाणे जर तेजस्वी नसतील गडकरी मास्तरांच्या नाटकांप्रमाणे जर ती हसायला लावणारी आणि रडायलाही लावणारी नसतील, सारांश प्रेक्षकांना आपल्याकडे खेचून आणतील आणि नटाच्या अभिनयाचा प्रकाश पाडतील. अशी जर ती नसतील तर ती यशस्वी होणार नाहीत. त्याचप्रमाणे नव्या नटासमोर गणपतराव जोशी किंवा गणपतराव भागवत ह्यांच्यासारखे आदर्श आणि देवल मास्तरांसारखे किंवा खाडिलकरांसारखे शिक्षक अवश्य पाहिजेत. ते नसले तर अवरंगजेब म्हणताच ''मूर्तिमंत अवरंगजेब''! प्रेक्षकांसमोर उभे करणारे केशवराव दाते नटांतून निपजणार नाहीत. यात काय ते समजा''.

त्यांच्या भाषणाचा शेवट अतिशय हृदयस्पर्शी होता. ते म्हणाले--- ''माझ्या मुंबईकर आश्रयदात्यांनो... काका साहेबांच्या पादुका काही कमी जास्त तर नाही ना बोलली. पण खरं सांगतो आपल्यासमोर बोलतांना मला कोणाचीच भीती वाटली नाही... नव्हे माहेरासारखा मोकळेपणाचा वाटला. माझ्या सेवेचे सर्वात जास्त कौतुक-- आणि एकसारखे कौतुक या मुंबईतच झाले. माझ्या गंधर्व नाटकमंडळीची सुरवात तीस वर्षापूर्वी मुंबईतच झाली..... १९२१ साली मला पहिले कर्ज झाले त्यावेळी मुंबईकरांनीच मला प्रथम धीर दिला आणि नंतर राजापेक्षा उदार अशा आपल्या आश्रयामुळे मी तीन लाख रूपयांचे कर्ज फेडले. ते वीस वर्षापूर्वी संयुक्त खेळाच्या अपूर्व प्रयोगासाठी मी आणि केशवरावजी भोसले इथेच एका रंगभूमीवर आलो. तसे कित्येक खेळ करण्याचा संकल्प केशवरावजींनी माझ्याजवळ बोलून दाखविला नसेल तोच माझ्या दुर्दैवाने ते कालवश झाले. ज्यांनी माझी आजन्म काळजी वाहिली ते काकासाहेब खाडिलकर आज भीष्माचार्यांप्रमाणे शरपंजरी पडले आहेत. काकासाहेबांच्या बरोबरीने ज्यांचा मला आधार होता. ते गडकरी मास्तरही गेले. माझ्या पाठीशी देवाप्रमाणे उभे राहणारे आपल्या मुंबईच्या लाडसाहेबांसारखे किंवा कराचीच्या लाला लक्ष्मीचंदां सारखे कित्येक दयावंत प्रेक्षक दिवंगत झालेत. प्रथम पोर असलेल्या आणि नंतर वयाने थोर झालेल्या ह्या बालगंधर्वाचे आपण वर्षानुवर्षे

कौतुक केले. तर आज जवळचे आधार तुटून पोरक्या झालेल्या बालगंधर्वाचेही आपण तसेच कौतुक करीत आहांत. कै. शाहू महाराजांनी मला रंगभूमीवर आणून उभे केले, आणि लोकमान्य टिळकांनी मला जणू काय कडेवर उचलून आपल्या दृष्टीस पाडले. त्या माझ्या सुदैवाचेच आपण कौतुक करीत आहांत असं मी समजतो. घरी माझ्या मातेच्या प्रेमाचा निवारा आणि घराबाहेर उघड्या जगात आपल्या प्रेमाचा निवारा इतका मी भाग्यवान आहे. हे आपले उपकार मी जन्मोजन्मी विसरणार नाही''.

ह्या त्यांच्या भाषणाची सर्वदूर प्रशंसा झाली. सर्व वर्तमानपत्रे मासिके विद्वत्‌जन-- सर्वच जण त्यामुळे फार समाधानी झाले. बालगंधर्व म्हणजे मराठी रंगभूमीचा चालता बोलता गाता इतिहास आहे असे जे उद्‌गार स्वागताध्यक्ष आचार्य अत्रे ह्यांनी काढले ते अगदी सार्थ होते.

नाट्यशताब्दि महोत्सवानंतर १९६४ साली त्यांचा अमृत महोत्सव मोठ्या थाटाने मुंबई येथे साजरा झाला. रविवार दिनांक २ फेब्रुवारी पासून एक आठवडाभर हा आनंद सोहळा सुरू होता. मुंबईकरांनी मोठ्या उत्साहात ह्या सप्ताहात भाग घेतला. डॉ. बी.अेन्.पुरंदरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली अमृत महोत्सव समितीने अतिशय योजनाबद्ध पद्धतीने हा समारंभ घडवून आणला. उद्‌घाटनाचा सोहळा दोन फेब्रुवारी रोजी विली मातुश्री सभागृहात केंद्रीय मंत्री स.का.पाटील ह्यांच्या हस्ते झाला. त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक प्रमुख पाहुणे होते. ते म्हणाले --- ''आपल्या नाट्यक्षेत्रातील कारकीर्दीत बालगंधर्वांनी लाखो रूपये कमावले. आज त्यांच्या जवळ त्यापैकी काही शिल्लक नाही. रंगभूमीवरून निवृत्त होवून पाव शतकाच्या काळ लोटला आहे. आज महाराष्ट्रात नव्हे तर अन्य प्रांतातही त्यांना जे मानाचे स्थान आहे ते लाखो रूपयांपेक्षा महत्त्वाचे आहे. त्यांची नाटके न पाहिलेली महाराष्ट्राची आजची तरूण पिढी नक्कीच स्वतःला कमनशिबी समजत असेल''. ह्या पूर्वी मिळत असलेले तीनशे रूपयाचे मानधन सरकारने साडे सातशे रूपयाचे जाहीर केले तेव्हा प्रेक्षकांनी आनंदाने टाळ्यांचा कडकडाट केला.

स.का.पाटिलांनी त्यांचे समयोचित अभिवादन केले. ते म्हणाले ''-- रंगभूमीवर स्थित्यंतरे होत राहतील पण बालगंधर्वांचे यशोगान मात्र हजारो वर्ष होत राहील.'' नारायणरावांचे एक रसिक मित्र -- नव्हे भक्त उद्योगपती धरमसी खटाव ह्यांनी ह्या महोत्सवानिमित्ताने सहावारी आणि नऊवारी साड्या तयार केल्या. त्यांना ''बालगंधर्व साडी'' असे नांव दिले होते. ह्या साड्या लेवून स्वयंसेविका आमंत्रित पाहुण्यांना पेढे, अत्तर, गुलाब देऊन स्वागत करीत होत्या. विशिष्ट पाहुण्यामधे यशवंतराव चव्हाण-संरक्षण मंत्री- दयानंद बांदोडकर, गोव्याचे मुख्यमंत्री ही राजकीय मंडळी, शिवाजी गणेशन्, पृथ्वीराज कपूर ही सिनेक्षेत्रातील दिग्गज मंडळी, आचार्य अत्रे, अनंत काणेकर, राजा बढे ही साहित्यिक मंडळी, बॅ.नाथ पै.इझाक बंदूकवाला, विजयालक्ष्मी पंडित वगैरे श्रेष्ठ मंडळी व्यासपीठावर प्रामुख्याने विराजमान झाली होती. राजा बढे ह्यांनी लिहिलेल्या स्वागतगीतानंतर बालगंधर्वांनी अमर केलेल्या मराठी रंगभूमीवरच्या सात नायिकांनी बालगंधर्वांना ओवाळले. अनेक संस्थांतर्फे त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. अमृत महोत्सव समिती तर्फे एक हजार, शिवाजी गणेशन् ह्यांच्याकडून रूपये पाचशे आणि पृथ्वीराज कपूर ह्यांच्याकडून त्यांना एक चांदीची समई भेट देण्यांत आली. बालगंधर्वांनी अमृत महोत्सव समितीचा आहेर आणि पृथ्वीराज कपूर ह्यांच्या कडची मिळालेली समई, मराठी नाट्य परिषदेला देणगी म्हणून देऊन टाकली. ''भाषा, जातपात आणि देश ह्या सगळ्या भिंती ओलांडून कलावंत नवीन सृष्टी निर्माण करतो. माणुसकी आणि रसिकता ह्यांनी भरलेल्या ह्या नाट्यसृष्टीचे बालगंधर्व सम्राट आहेत. बालगंधर्वांच्या भूमिका प्रत्यक्ष न पाहिलेल्या पिढीने त्यांचा सत्कार करावा ही त्यांच्या अमरत्वाची साक्ष आहे.... बालगंधर्व हे मराठी रंगभूमीच्या सुवर्णयुगाचे अग्रदूत आहेत. पुन्हा असा नट होणार नाही हे खरे आहे !'' असे उद्‌गार यशवंतराव चव्हाण ह्यांनी काढले. आचार्य अत्रे म्हणाले'' --- बालगंधर्व म्हणजे महाराष्ट्राचे संगीत छत्रपती ! ..... बालगंधर्व हा बोलायचा विषय नाही. तो ऐकायचा विषय आहे.... शिवरायाचा आठवावा प्रताप.... तसे बालगंधर्वांचे आठवावे रूप.... बालगंधर्वांचे आठवावे गायन.. असे म्हणावे लागेल.

ह्या महोत्सवाच्या निमित्ताने त्रिभुवनदास भिवजी ज़व्हेरी ह्या व्यापाऱ्याने ''बालगंधर्व माला'' नावाचा एक खास अलंकार विक्रीस काढला.

नारायणराव ह्या सत्काराने भारावून गेले. आठवडाभर नाट्यविषयक कार्यक्रम झाले. गंधर्व नाटक मंडळीतल्या त्यांच्या सहकाऱ्यांनी नाट्यसंगीताचा कार्यक्रम सादर केला. त्यात इतरांच्या बरोबर हिराबाई बडोदेकर सुद्धा गायल्या. साथ संगत करणारी मंडळी देखील गंधर्व कंपनीतीलच होती. त्या शिवाय गुजराथी, हिंदी, बंगाली ह्या मंडळींनी आपले नाट्यप्रयोग सादर केले. ह्या नाट्यमहोत्सवाचा समारोप शिवाजी गणेशन् ह्यांनी केला. मुंबई महानगर पालिकेने ह्या निमित्ताने वांद्रे येथे बांधलेल्या खुल्या नाट्यगृहाला बालगंधर्व रंगमंदिर असे नांव दिले. शिवाय त्यांचा खूप थाटाने सत्कार केला.

ह्या अमृत महोत्सवाची सांगता शिवाजी पार्क मैदानावर करण्यात आली. एक भव्य रंगमंच -- ''मा. दीनानाथ रंगमंच'' ह्या नावानं उभारण्यांत आला. नेत्रदीपक रोषणाई करण्यांत आली होती. मंडपाच्या सुशोभित प्रवेशद्वारांना नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर आणि रामगणेश गडकरी ह्यांची नावे दिली होती. शिवाजी पार्कचे भव्य मैदान गंधर्व भक्तांनी फुलले होते. बालगंधर्वाचे आगमन होताच प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करून आपल्या आवडत्या नटसम्राटाचे स्वागत केले. अनेक वक्त्यांनी नारायणरावांच्या गौरवपर भाषणे केली. त्याला उत्तर देतांना ते म्हणाले, ''माझे अन्नदाते माय बापहो ! तुमच्या आशिर्वादाने मी जिवंत आहे. यापेक्षा जास्त मी काय बोलणार ? मला काही बोलायचे नाही. देवाजवळ एकच मागणे मागायचे आहे. परमेश्वरा माझ्या रसिकांना उदंड आयुष्य दे !''

नारायणरावांचे हे जाहीर रितीने झालेले शेवटचे भाषण. ह्या भाषणात त्यांनी स्वतःबद्दल काही सांगितले नाही. मागितले नाही. जे कांही मागायचे ते आपल्या ''अन्नदाते मायबापांसाठीच''.

स्वतःसाठी सुखाचे उर्वरित जीवन मागितले नाही. सुख समाधानाचे मरण मागितले नाही. जे काही दीर्घायुष्य मागितले -- सुखी जीवन मागितले ते आपल्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या आपल्या

रसिकांसाठी - - - ज्या रसिकांनी त्यांच्या म्हातारपणी सादर केलेल्या ... अडखळणाऱ्या स्त्री भूमिका सुद्धा तृप्तमनाने पाहिल्या.

मग प्रश्न पडतो. रसिकांनी बालगंधर्वावर अधिक प्रेम केलं की बाल-गंधर्वानी त्यांच्या रसिकांवर ? कुणी कुणावरून जीव ओवाळून टाकला ?...

* * * *


# ॥ १२ ॥

पंचवीस ऑक्टोबर १९०५ रोजी गुरूद्वादशीच्या मुहूर्तावर नारायण श्रीपाद राजहंस, अर्थात् लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्यांनी नामांकित केलेल्या ''बालगंधर्व'' ह्या मुलानं किर्लोस्कर नाटक मंडळीत प्रवेश केला. त्यांची शेवटची भूमिका असलेले नाटक -- संगीत एकच प्याला तुमसर येथे चार जून १९५५ रोजी सुरू झाले. रात्री नऊ वाजता सुरू झालेले हे नाटक दुसरे दिवशी पहाटे -- पाच जून रोजी संपले. रात्रभर नाटक रंगले.... उत्तरोत्तर रंगतच गेले. जेव्हा नाटक संपले त्या दिवशी वट-पौर्णिमा होती. मराठी रंगभूमीवरची देवतास्वरूप सिंधू त्या दिवशी कायमची अंतर्धान पावली. एकंदर पन्नास वर्ष बालगंधर्वांनी रंगभूमीवर सेवा केली. वयाच्या सतराव्या वर्षी उभी केलेली स्त्री -- वयाच्या सदुषष्ठाव्या वर्षापर्यंत वेगवेगळ्या स्वरूपात आबाल वृद्धांना रंजवीत होती. ही एक कमाल कामगिरी आहे. कुठल्याही पुरूष नटांने इतकी वर्षे स्त्री भूमिका केलेली नाही. भाऊराव कोल्हटकरांनी १७ वर्षे, मा. दीनानाथ ह्यांनी १६ वर्षे, केशवराव भोसले ह्यांनी १४ वर्षे, मा. कृष्णराव ह्यांनी १६ वर्षे स्त्री भूमिका केल्या. नारायणराव पन्नास वर्षे नायिका म्हणून वावरले. ह्या पन्नास वर्षात एकंदर सत्तावीस प्रकारच्या स्त्रिया त्यांनी रंगमंचित केल्या. हा देखील एक उच्चांक आहे. ह्या सत्तावीस नाटकाचे अगणित प्रयोग त्यांनी केले. ह्या नाटकांपैकी शारदा (शारदा), मूकनायक (सरोजिनी), गुप्तमंजुष (नंदिनी) एकच प्याला (सिंधु), आशा निराशा (लकेरी), वीरतनय (मालिनी), सहचारिणी (वत्सला), प्रेमशोधन (इंदिरा), मातिविकार (सरस्वती), मानापमान (भामिनी) ही दहा नाटके सोडली तर बाकीची नाटके पौराणिक किंवा ऐतिहासिक होती. ह्या सतरा नाटकांतील नायिका आधी ह्या ना त्या साहित्यातून वावरल्या होत्या. त्यांची आणि सुबुद्ध वाचनप्रेमी रसिकांची ओळख होती. त्यांच्याबद्दल प्रेक्षकांच्या बऱ्यावाईट कल्पना होत्या. ''एकच प्याला'' सारख्या नाटंकांतल्या नायिका नाटककांराने स्वतंत्र अशा रंगवल्या होत्या. अशा नाटकातल्या नायिका बालगंधर्वांनी, नाटककाराच्या आणि / किंवा तालीम मास्तरांच्या मार्गदर्शनाखाली जिवंत केल्या. हे लेखक आणि मार्गदर्शक होते. नाट्यमिलिंद-गोंविद

बल्लाळ देवल, तालीम मास्तर गणपतराव बोडस आणि नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर. अधुनमधुन तात्यासाहेब कोल्हटकर. नाटककारानं कल्पनाशक्तिने चितारलेल्या नायिका नारायणरावांनी वास्तवाने अलंकृत केल्या. त्या इतक्या हुबेहूब होत्या की आज एकच प्याला मधली सिंधू अवतरली तर ती हुबेहूब बालगंधर्वांच्या सिंधुसारखी दिसू लागेल. --किंबहुना तिला तसंच दिसावं लागेल. बालगंधर्वांनी अभिनित केलेली सिंधू ही आदर्श सिंधू समजून त्यानंतरची पिढी सिंधूचा अभिनय करू लागली. तुलना करण्याकरिता बालगंधर्वांची सिंधू आदर्श सिंधू समजली जाते. एकट्या सिंधुच्या बाबतीतच नव्हे तर त्यांच्या इतर सर्व नायिका पुढल्या नटांच्या बाबतीत आदर्श मानल्या जातात. त्यांना देखील हीच कसोटी लावल्या जाते.

गोंडस बांधा, सुंदर स्त्रीच्या ठायी असणारे कोपरापासून पंजापर्यंत शैलदार हात, चेहऱ्यावरील सात्विक भाव, लाडके शब्दोच्चार, अत्यंत मादक आवाज, भावदर्शी नेत्र हे जणू परमेश्वराकडून त्यांना मिळालेले देणे होते. ह्या गोष्टींचा त्यांना त्यांची स्त्रीभूमिका वठवण्यासाठी निःसंशय मदत झाली. परंतु त्यात त्यांनी, आपल्या मन लावुन अभिनय करण्याच्या हातोटीने, आणि रसानुकुल गायकीने बहार आणली. त्यांचा आवाज मूळचाच गोड होता. तसेच त्यांच्या गळ्यात सुरेख फिरत होती. पं. भास्करबुवा बखले ह्यांची तालीम मिळाल्यामुळे त्यांच्या गायनाला एक प्रकारचा वजनदारपणा आला होता. रागाचा सच्चेपणा पाळता पाळता एखादा विसंवादी स्वर ते जरूर लावत. पण तो अशा खुबीने की त्या गायनाची रंगत अधिक वाढत असे. ताल तर जणू त्यांच्या अंगात मुरला होता. तिरखवासारखा तबला नवाझ त्यांची संगत करीत असतांना गाता गाता तालाशी खेळत खेळत मोठ्या मजेनं ते गाण रंगवीत असत. शिवाय पदातल्या शब्दाशी आणि त्या गाण्याच्या रसाशी ते कधीही फटकून वागले नाहीत. वागले नाहीत म्हणण्यापेक्षा त्या शब्दाशी किंवा रसाशी प्रतिकूल पद्धतीने गायले नाहीत. त्यांच्या पदातील कठोर व्यंजने सुद्धा त्यांनी नजाकतीने उच्चारली त्यामुळे त्यांचे रंगभूमीवरचे गायन सदा आल्हादकारकच असे. ''द्रौपदी'' नाटकांतील श्रीकृष्णाचा धावा म्हणतांनाचा भक्तिभाव,

सिंधूची तेजस्वी असहायता, भामिनीचा शृंगार भाव, रूक्मिणीची ध्येयनिष्ठ तल्लीनता, अशा अनेक प्रकारच्या भावभावना आपल्या गायनातून व्यक्त करीत. ह्या भूमिका, खाडिलकर-गडकरी ह्या नाट्यश्रेष्ठींनी लिहिल्या खऱ्या, पण त्यात आपल्या अभिनयाने आणि गायनाने नारायणरावानी, विलक्षण रंग भरला हे कबूल करावे लागेल. बालगंधर्वांचा आवाज किंचित् कोता होता. आणि शब्दांचे उच्चार थोडे अस्पष्ट होते. परंतु शब्दांच्या लाडक्या--किंवा लाडावलेल्या उच्चारांत अत्यंत मादक आणि भावपूर्ण स्वरांचे मिश्रण करून त्यांचे परिणामकारक पटल निर्माण करणारा दुसरा गायकनट रंगभूमीवर झाला नाही. नारायणरावांनी ज्या भूमिका केल्या त्यात शृंगार रंगवण्याची त्यांची हातोटी अवर्णनीय होती. संशयकल्लोळ नाटकातील रेवती त्यांनी रंगवली. तिच्या खेळकर भूमिकेतील शृंगारात हास्यरसाचे बेमालूम मिश्रण होते. त्या शृंगारात थोडी मिष्किलता होती. पुष्कळसा खेळकरपणा होता. ह्या सर्वांच्या मजेदार मिश्रणामुळे नारायणरावांना एक वेगळ्या पद्धतीची भूमिका रंगवण्याची संधी मिळाली. ती त्यांनी यशस्वी करून दाखवली. ही गोवेकरणीची भूमिका करतांना त्यांना सामाजिक स्वरूपाचा अद्यावत साजशृंगार करायला मिळाला. भामिनी, रूक्मिणी, देवयानी ह्यांचे शृंगार अगदी वेगळ्या प्रकारचे आहेत. रूक्मिणीच्या शृंगारात स्वकीयांच्या सुखासाठी आपल्या सुखाचे बलिदान करण्याची भावना आहे. त्याचबरोबर श्रीकृष्णाच्या भक्तीची त्याला जोड आहे. भक्ती आणि त्यागाचं वलय असलेला शृंगार तितक्याच उदात्ततेने त्यांनी रंगवला. मानापमान मधला भामिनीचा शृंगार थोडा वेगळा आहे. नाही म्हटलं तरी त्यांत थोडा थिल्लरपणा आहे. सुरवातीला स्वतःला न विसरणारी, स्वतःच्याच ऐश्वर्यावर प्रेम करणारी, गरीबाला कस्पटासमान समजणारी भामिनी तरीही मोकळ्या मनाची आहे. नाटक जसजसे पुढे सरकते तसतसे तिच्यातील संक्रमण दृग्गोचर होते. ''धनी मी, पति वरीन कशी अधना?'' ''केवळ शौर्यावर भिस्त ठेवून सीतेने काय किंवा द्रौपदीने काय (गरीब पती निवडून) मोठा शहाणपणा केला असं मला मुळीच वाटत नाही.''..... ''माझ्या वर्तनाचा कित्ता इतरांना घालून देण्यासाठी ही भामिनी जन्माला आली आहे...'' इत्यादी ''मुक्ताफळं'' (१) उधळणारी गर्विष्ठ भामिनी



**गणपतराव बोडस**

गणपतराव अुत्कृष्ठ नाट्यशिक्षक म्हणून गाजले होते. देवल गंधर्व कंपनी सोडून गेल्यावर नाट्यशिक्षणाचं काम गणपतरावांनी सांभाळलं. देवल ह्यांच्या अनुपस्थितीत गणपतरावांनी नाट्यशिक्षणाची धुरा सांभाळली.
बाधेसूद, शिस्तबद्ध प्रयोग बसवावा तर गणपतरावांनीच अशी त्यांची ख्याती होती.
वैचारिक मतभेद झाल्यावर गणपतराव नारायणरावांपासून दुरावले.
पण बालगंधर्वांना मात्र गणपतरावांच्या नाट्यशिक्षणाबद्दल शेवटपर्यंत आदरच होता.

धैर्यधराच्या प्रेमात पडते. तिचा सुरवातीचा गर्विष्ठपणा निवळू लागतो. स्वतःच्या श्रीमंतीचा गर्व वाहणारी भामिनी'' मी अधना...'' किंवा ''अजि टाकू गडे धन वेषा.... धन सुख कार्य नाश करी'' म्हणू लागते.... तिच्या स्थित्यंतराला सुरवात होते. केवळ स्वतःवरच प्रेम करणारी ही तरूणी दुसऱ्यासाठी त्याग करायला प्रवृत्त होते. नव्हे त्यांत सुख मानू लागते... ''गुणरसपान हेच सुख -- प्रेम तया नाव जनी।'' अशी प्रेमाची सुरेख व्याख्या करू लागते. हे त्यागातले सूख तिला तिच्या ऐश्वर्यापेक्षा किती तरी पटीने मोठे वाटू लागते. अशा स्थित्यंतरा नंतरचा तिचा शृंगार.... हा इतर नायिकेच्या शृंगारापेक्षा वेगळा आहे. भामिनीची ही सगळी स्थित्यंतरे नारायणरावांनी समर्थपणे दाखविली. शृंगार केवळ समोर असलेल्या व्यक्तिबरोबरच करता येतो असे नव्हे. त्यांच्या काल्पनिक अस्तित्वाबरोबर सुद्धा करता येतो. तो शृंगार सर्वस्वी वेगळ्या प्रकारच्या शृंगार, ''नाही मी बोलत नाथा'' ह्या प्रवेशात बालगंधर्वांनी अभिनित केला. मला वाटतं नायकाच्या विरहित रंगवलेल्या शृंगाराचा हा ऐकमेव प्रसंग असावा. सदाशिवराव रानडे सखी आणि बालगंधर्व भामिनी असा हा शृंगारिक प्रवेश अवर्णनीय असा रंगत असे.

गडकऱ्यांच्या सिंधूची गोष्ट सर्वस्वी वेगळी आहे. गडकऱ्यांनी सिंधूचे पात्र इतके अप्रतिम रंगवले आहे की नारायणरावांसारख्या सच्च्या कलावंताला त्याची भुरळच पडावी. त्या पात्राचे आणि एकंदरच नाटकाचे शोकांतिकेचे रहस्य ओळखून नारायणरावांनी आपली भूमिका इतकी अप्रतिम वठवली की त्यांच्या प्रत्येक हालचालीने, प्रत्येक शब्दोच्चाराने, त्यांच्या गायनाच्या प्रत्येक स्वरामुळे शोकांतिकेची छाया सुरवातीपासून पसरून प्रत्येक अंकागणिक ती अधिकाधिक गडद होत जात असे। महेश्वरी साडी नेसून आणि नाकात नथ घालून त्यांनी ''मानस का बधिरावे ?'' हे पद म्हणत प्रवेश करताच त्यांची करूण मूर्ती प्रेक्षकांच्या हृदयाचा ठाव घ्यायची. आजपर्यंत गंधर्वांनी खेळकर, तारुण्यसुलभ राजकन्या इत्यादींचा अभिनय केला होता. त्यांचा शृंगार रंगवला होता. पण सिंधूचे स्वरूप वेगळे होते. एक पोक्त, संसारी, एका मुलाची आई, अनुभवी, वयस्क आणि तुम्हाआम्हाला जवळची वाटावी अशी मध्यम वर्गीय स्त्री रंगवली होती. एक आर्य पतिव्रता,

संसाराची सुखदुःख झेलणारी सर्व सामान्य स्त्री होती. बालगंधर्वांनी अशा स्त्रीची जिवंत प्रतिमा बारिकसारिक हालचालींनी प्रेक्षकांसमोर उभी केली. ''लागे हृदयी हुरहुर ।'' म्हणणारी, नवऱ्याच्या काळजीने दबलेली, ''मानस कां बधिरावे'' म्हणत जणू पुढे येणाऱ्या भयानक संकटाने हबकलेली, ''चंद्र चवथिचा - रामाच्या ग बागे मधे चाफा नवतिचा'' किंवा'' बघु नको मजकडे केविलवाणा -- राजस बाळा'' म्हणणारी व्यथित माता''.. स्वस्थ कसा..'' म्हणून आपल्या बाळाला उद्देशून आपला आनंद व्यक्त करणारी नवोढा'' कशी ह्या त्यजू पदाला'' म्हणून दोन शब्दात पातिव्रत्येचं महात्म्य सांगणारी, अशा अनेक भावभावना आपल्या गाण्यातून बालगंधर्वांनी व्यक्त केल्या. आर्य स्त्रीचे संपूर्ण स्वरूप बालगंधर्वांनी जनता जनार्दनासमोर मांडलं. ऐश्वर्याचा लखलखाट नाही किंवा एखाद्या ललित आणि शृंगारिक नाटकातला लाडकेपणाही नाही, तर दारिद्र्याच्या अवकळेला आपल्या तेजस्वी आचरणाने ढवळून टाकणाऱ्या सिंधूची तपश्चर्या। पण तिच्याबरोबर अक्षरशः रडण्यासाठी जमलेल्या प्रेक्षकांनी तिची सोबत शेवटपर्यंत सोडली नाही. कारण हसण्याच्या नेहमीच्या आनंदापेक्षा त्या रडण्याचे समाधान अधिक होते. गडकऱ्यांनी ज्या फाटक्या लुगड्याची भीती घातली त्याला एखाद्या महावस्त्राची योग्यता प्राप्त झाली होती. भरजरी कापडापेक्षा आपल्या अभिनयाचे मोल अधिक आहे हे नारायणरावांनी सिद्ध करून दाखवलं. मानापमान-स्वयंवर मधील गायन आणि एकच प्याला मधील गायन ह्यात महत्त्वाचा फरक होता. भास्कर बुवा, गोविंदराव ह्यांचे संगीत, खानदानी शास्त्रीय संगीताच्या पंगतीत बसणारे होते तर एकच प्याला मधील कित्येक पदे कव्वाली ढंगाकडे झुकली होती. बालगंधर्वांनी ती अजरामर केली. कारण त्यांनी तो अत्यंत रसात्मकतेने म्हटली. शब्द जेव्हा स्वर साज लेवून येतात तेव्हा ती मोहक होतात. पण विविक्षित रस धारण करणारे स्वरावगुंठित शब्द जेव्हा त्या रसात्मकतेने आळवल्या जातात तेव्हा ते अजरामर होतात. बालगंधर्वांनी नेमके हेच केले. सिंधूच्या भूमिकेमुळे बालगंधर्वांच्या अभिनयाला पूर्णत्व प्राप्त झाले.

मानापमान नाटकानंतर खाडिलकरांनी विद्याहरण नाटक लिहिले होते. मानापमान मधली भामिनी ही स्वतंत्र नायिका होती. विद्याहरण

मधे तसे नव्हते. देवयानी परिचयाची होती. कचदेवयानी--ययाती देवयानी ह्यांच्या कथा लोकांना माहिती होत्या. शिवाय मानापमानच्या किंचित् खेळकर कथानकापेक्षा विद्याहरणाचं कथानक जास्त परिपक्व होतं. गद्याची तेजस्विता आणि पद्याचं लालित्य ह्यांनी ते समृद्ध होतं.. मानापमानची पदे केल्याचा अनुभव खाडिलकरांच्या गाठीशी होता. शिवाय देवयानी भामिनीसारखी लाडावलेली नाही. ती जास्त परिपक्व, जास्त तेजस्वी आहे. आधीच्या भामिनीच्या अभिनयापेक्षा ह्या अभिनयाला तेजस्वितेची किनार होती. बालगंधर्वांनी प्रेयसीच्या अभिनयावर हा तेजस्विततेचा अविष्कार देखील सुरेख रितीने दाखवला. भामिनी अल्लड होती. तिला जबाबदारी अशी काहीच नव्हती. देवयानी वेगळी, शुक्राचार्यांची मुलगी म्हणून ती वावरली. जितकी भावनावश तितकीच विचारी..." बाबांची आज्ञा न पाळणारी देवयानी कच देवाना तरी कशी आवडेल ?" किंवा "दुसऱ्यांच्या वियोग करणाऱ्याच्या कपाळी संयोग नसतो" म्हणून पश्चात्ताप-दग्ध देवयानी रंगवावी तर ती बालगंधर्वांनीच अशी ख्याती त्यांनी मिळवली.

आपल्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दीत बालगंधर्वांनी जरी सत्ताविस भूमिका केल्या तरी त्यातल्या जवळ जवळ अकरा भूमिका अतिशय गाजल्या. निरनिराळ्या स्वभावाच्या, निरनिराळ्या परिस्थितीतल्या निरनिराळ्या वातावरणातल्या आणि निरनिराळ्या प्रसंगातून वाटचाल करणाऱ्या । कण्वमुनींच्या आश्रमातल्या हरिणशावकांच्या सहवासांत वाढलेली पण दुष्यंताच्या प्रथम दर्शनानेच मदनबाधेने व्यथित होऊन "मना तळमळसी....सुख सेवाया येइन फिरून तुज पाशी" म्हणत स्वेच्छेने गांधर्व विवाहाला संमती देणारी शकुंतला, द्वारकाधीशाची भगिनी असून देखील सर्वस्वी परावलंबी "बलसागर तुम्हि वीर शिरोमणी, कोठेतरी रमला?" म्हणून आर्त स्वरांत विचारणारी, "वद जावू कुणाला शरणा ग ?" म्हणून अगतिकतेने व्याकुळणारी, "बाई हे बंधू नव्हत". म्हणून भावावरचा कोप व्यक्त करणारी, सौभद्र मधली परावलंबी सुभद्रा, "लक्षवती वरसाला लाविन रे गिरिजेशा" म्हणून नवस बोलणारी, " बघुनि त्या भयंकर भूता--फोडिली तिने किंकाळी।"

म्हणत धास्तावलेली ''जन खुळावले-उलट चालले'' म्हणून दिग्मूढ झालेली'' बाळपणीचा काळ सुखाचा'' म्हणून भूतकाळांत रमलेली, ''कधी करिती लग्न माझे तुज ठावे ईश्वरा'' म्हणून अव्यक्ताला खडसावणारी, ''आम्ही गायी जातीच्या---नाही आम्हा वाचा।'' म्हणत अगतिक झालेली, ''तू टाक चिरुनि ही मान नको अनमान'' म्हणून विनवणारी''-- कोणी काही नका शिकवू आता.....देई तात मला ज्यासी---लग्न होताच तोचि देव मजसी'' म्हणून अदृष्टाला सामोरी जाणारी....अशा अनेक भाव भावनातून विहरणारी शारदा, ''माडिवरी चल ग गडे'' म्हणून आतुरलेली आणि चारुदत्ताच्या मीलनासाठी उत्कंठित झालेली, श्रीमंत आणि सत्ताधीश शकाराचा धिक्कार करणारी वसंतसेना.'' धनी मी, पती वरीन कशी अधना ? पति जरी अधन निधमसम मानी--- भामा विफल इतर सगुणा'' म्हणून प्रथम धैर्यधराला अपमानित करून त्याच्या शौर्यानं आणि गुणानं आकर्षित झालेली'' गुणरस पान हेचि सुख---प्रेम तया नाव जनी'' अशी प्रेमाची सुरेख व्याख्या करणारी भामिनी. प्रेम म्हणजेच जीवन अशा श्रद्धेन वागणारी पिता आणि प्रियकर ह्यांच्या परस्पर विरूद्ध उद्दिष्टाच्या कात्रीत सापडलेली देवयानी. ''साम्य तिळहि नच दिसत मुखाचे--नाव तरी कोरवा शिरावर'' अशी थट्टा करणारी ''संशय का मनि आला ? कारण काय तयासि कळेना'' म्हणून प्रश्वांकित झालेली आणि तरीही''-- मजवरी तयाचे प्रेम खरे।'' अशा विश्वासानं वागणारी रेवती, ह्या स्वयंवराने कुळाचा नाश होईल ही भिती भेडसावताच''-- दादा हे स्वयंवर मोडलं''. म्हणून स्वतः मांडलेल स्वयंवर मोडणारी रूख्मिणी, --''पतिव्रतेला नाती नसतात-- ती भावाची बहीण नसते...बापाची मुलगी नसते---'' असं सांगत कुटुंबाचा सांभाळ करणारी, पेटलेल्या संसारात खंबीरपणे उभी राहणारी--'' कशी ह्या त्यजू पदाला ?'' म्हणून निरूत्तर करणारी. खरी आर्य स्त्री सिंधू.....प्रतिसृष्टी निर्माण करण्याचं सामर्थ्य असणाऱ्या विश्वामित्राला स्त्रियाबद्दल घृणा असल्याने ''पुरूषांच स्वातंत्र्य हिरावून यांना परतंत्र करणारी जगातील सर्वात मोठी शक्ती म्हणजे स्त्री...माझ्या सृष्टीत स्त्रियांची उत्पत्तीच करणार नाही...स्त्री समोर दिसली तर तिला मी जाळून भस्म करणार'' अशी भीती घालत असतांना, हिरवागार

शालू नेसून'' ही मी आले जळायला'. म्हणत निर्भयतेने समोर येऊन उभी राहणारी''... तारूण्याचा भर म्हणजेच माझं लावण्य ही कल्पनाच मुळी चुकीची आहे...केवळ यौवन आणि सौंदर्य हाच काही स्त्रियांचा गुण नाही. तारूण्याशिवाय स्त्रीच्या अंगी कितीतरी मोहक गुण असतात...'' म्हणून आत्मविश्वासान ओथंबलेली मेनका, धृतराष्ट्राच्या राजसभेत भीष्मविदुरांना निरूत्तर करणारी,'' दास झालेल्या पांडवांना मला पणाला लावण्याचा अधिकारच नाही'', असा शास्त्राधार सांगणारी ''मी दासी नाही. स्वतंत्र आहे'', म्हणून बजावणारी ''उपभोगाची वेळ येता--स्वार्थत्यागी राहिला--पांडवा सम्राट पदाला पोचविता जो जाहला''। म्हणत श्रीकृष्णाबद्दलच्या आदराने आथंबलेली--''रणांगणावर तलवार गाजवणं म्हणजेच वीरता नव्हे---आलेलं दुःख निमूटपणे सोसणं हा सुद्धा पराक्रम आहे'' असं स्वकर्मानं पटवून देणारी..... ''द्रौपदी राजसभेत येईल तो दासी म्हणून नव्हे तर पांडवांना दास्यातून सोडवणारी त्यांची अर्धी पुण्याई म्हणून...पतित झालेल्या पुरूषांचा उद्धार स्त्रियाच करू शकतात''. अशी तेजस्विता दाखवणारी द्रौपदी....अशा कितीतरी स्त्रिया नारायणरावांनी अभिनित केल्या. सिंधू रंगवतांना जितके लीन, तितकेच द्रौपदी उभी करतांना ताठ झाले. रेवती दाखवतांना जितके अल्लड झाले तितकेच देवयानी अभिनित करतांना गंभीर झाले. एकमेकांचि दोन टोके असणारी किती तरी उदाहरणे त्यांच्या नायिकांच्या रूपानं दाखवता येतील. ह्या सर्व रूपांना---नव्हे स्वरूपांना जिवंत केलं ते बालगंधर्वांच्या अभिनयाने---

अशी अभिनय संपन्नता मिळवतांना त्यांना आपल्या अंगभूत गुणांची मदत जरूर मिळाली. पण केवळ तेवढ्यानेच बालगंधर्व नटसम्राट झाले असे म्हणणे धाष्ट्याचे होईल. आपल्या भूमिकेत ते इतक्या चटकन एकरूप होत की पहाणाऱ्याला अचंबा वाटावा. तन्मयता हा त्यांचा आणखीन एक अंगभूत गुण होता. कोणत्याही प्रसंगाशी ते बघताबघता तन्मय होत. शिवाय त्यांची भूमिकेची समजच इतकी असामान्य होती की कोणत्याही भूमिकेचा केवळ इशारा मिळताचं ते त्यात तद्रूप होत. नाटकांच्या तालमीत ते

एकाग्रतेने भाग घेत. असामान्य कलावंत म्हणून प्रस्थापित झाल्यावर सुद्धा आपल्याला अजून शिकायचं आहे ही त्यांची भावना कायम होती. भूमिकेचे अंतरंग आत्मसात करून ते प्रेक्षकांच्या पर्यंत पोहोचवण्याचे काम नटाला करावे लागते. त्यासाठी चिंतन मनन व अवलोकन ह्या साधनांना चतुर मार्गदर्शनाची गरज असते. त्या बाबतीत बालगंधर्व फारच भाग्यवान समजले पाहिजेत. केवळ संहिता पाठ करून म्हणणे म्हणजे अभिनय करणे नव्हे. संहिता पाठ करणे ही केवळ प्राथमिक गरज आहे. प्रसंगानुरूप अभिनय कसा करावा ? रसानुकुल शब्दोच्चार कसा करावा? संवादाची लय आणि सुरेलपणा कसा सांभाळावा, रंगभूमी- वरील हालचाली कशा कराव्या अशा अनेक प्रकारचे शिक्षण तालमीत दिले जात असे. शिवाय महत्त्वाच्या प्रसंगाचे आणि स्वभाव चित्रणाचे रहस्य तालीम मास्तर नटांना समजावून सांगत असतो. बालगंधर्वाचे भाग्य असे थोर की त्यांना सुरवातीपासूनच देवलांसारखा नाट्यशिक्षक मिळाला त्यांनी कसे सर्वकश शिक्षण दिले ह्याची कथा ह्यापूर्वीच सांगितली आहे. बालगंधर्वाच्या अभिनयाची भव्य इमारत देवलांच्या नाट्यशिक्षणाच्या भक्कम पायावर उभी राहिली होती. स्त्री भूमिकांच्या सर्व बारिकसारिक गोष्टी प्रत्यक्ष अवलोकन करून आणि शिक्षण घेऊन नारायणरावांनी अभिनय संपन्नता मिळवली. ह्या शिवाय देवलांच्या तालमीतच तयार झालेल्या गणपतराव बोडस ह्यांच्या अनुभवयुक्त शिक्षणाचा पण फायदा झाला. नाट्याचार्य खाडिलकरांनी त्यांच्या अभिनयाला वेगळी उंची दिली. ह्या सर्वांचा त्यांना मनस्वी फायदा झाला. पदाच्या ओळी लोकप्रिय करणं सोपं आहे पण नारायणराव त्यांच्या भाषणातल्या गद्य ओळींनी सुद्धा लोकांना वेड लावीत''.....दादा ते आले ना ?'' ''खडा मारायचा झाला तर....'' ''माझ्या वर्तनाचा कित्ता इतरांना घालून देण्यासाठी ही भामिनी जन्माला आली आहे''..... ''लग्न आक्काचं व्हायचं नाही की बाबांचं, लग्न व्हायचे आहे ते माझे हो।''....''दादा अरे हे पाय जिथे असतील तोच माझा स्वर्ग।''.... ते माझ्याकडे वळुनवळुन बघतात म्हणून मी बघते.... नाही तर मी कशाला बघितले

असतं?''.... ''द्रौपदी राजसभेत येईल ती पांडवांची अर्धी पुण्याई म्हणून....पतित झालेल्या पुरूषांचा उद्धार स्त्रियाच करू शकतात''....एक ना दोन! अशी अनेक वाक्ये त्यांनी आपल्या रसानुकुल अभिनयाने अजरामर केलीत... गद्य वाक्यांना टाळ्या घेणारा बालगंधर्व हा एकमेव संगीत गायक नट असावा किंबहुना होता. अशा गद्य वाक्यांना नारायणरावांनी लोकांच्या ओठांवर खेळवलं नव्हे खिळवलं। आपण ज्या कल्पनेने भूमिका लिहिली ती कल्पना रंगभूमीवर साकार झालेली पाहणे हा नाटककाराच्या आनंदाचा परमोच्च क्षण असतो. अशा क्षणांचा आनंद नाट्यचार्य खाडिलकरां-सारख्या नाट्य महर्षींला बालगंधर्वांनी प्राप्त करून दिला आणि म्हणूनच त्यांची स्त्रीभूमिका पाहून ''मी बालगंधर्वाचा ऋणी आहे'' असे ते म्हणाले तर मानापमान मधली भामिनीचीच नव्हे तर धैर्यधराची ही भूमिका पाहिल्यावर ''नारायण तुला काही कमी पडू देणार नाही'' असा भरघोस आशिर्वाद देऊन गेले.

नारायणरावांच्या नाट्य संगीताबद्दल थोडी चर्चा करायला हवी. नाट्य संगीत आणि मैफलीतील संगीत ह्यांत फरक आहे, तो गायकीच्या दृष्टीने. अण्णासाहेब किर्लोस्कर आणि देवल ह्यांच्या नाटकातील संगीत त्या त्या संवादाशी एकरूप झाले आहे. शांकुतल, सौभद्र, मृच्छकटिक ह्या नाटकांतील संगीताच्या बाबतीत बालगंधर्वांना संगीतांची जाण असलेल्या देवलांकडून मार्गदर्शन मिळाले, नंतर गोविंदराव टेंबे, भास्करबुवा बखले ह्यांनी त्यांना परिपूर्णता प्रदान केली. गोविंदरावांना संगीतातील लालित्याची विलक्षण जाण होती. त्यामुळे हा वेगळा पैलू त्यांच्या नाट्यगीत गायनांत सामावला. साहजिकच ''गंधर्व गायनांत'' ह्या मंडळीचा निश्चितपणे मोठा वाटा होता.

नारायणरावांचा आवाज तेजस्वी आणि पल्लेदार नव्हता इतकंच नव्हे तर सुरवातीला निकोपही नव्हता. तो वारंवार त्रास देई. त्यासाठी त्यांना पुष्कळ उपचार करावे लागत, उपास, औषधांच्या गुळण्या, वाफारा, डॉक्टरांचे इलाज, वगैरे वगैरे, पण ज्या दिवशी त्यांचा आवाज ''तक्राररहित'' असे तो प्रेक्षकांच्या दृष्टीने पर्वणीचा दिवस असे. त्यांच्या आवाजात असे काही खटके असत की ते खटके त्यांच्या बसलेल्या

आवाजातूनही परिणाम करीत असत. भाऊराव कोल्हटकरांचा आवाज पल्लेदार होता तर नारायणरावांचा आवाजात, तंबोऱ्यांत जशी एक प्रकरची जव्हारी असते, तसा जव्हारीदार होता. शिवाय त्यात एक मादकपणा होता. त्यांनी नुसता ''आ'' कार लावला तरी त्यात एक प्रकारचा सतारीच्या तारांसारखा झणत्कार ऐकू येत असे. त्यामुळे एखाद्या गायिकेच्या आवाजापेक्षा देखील तो गोड वाटत असे. आवाज पल्लेदार नसला तरी लावणी बाजातल्या कांही प्रदीर्घ ताना ते अत्यंत सहजपणे घेत असत. गोविंदरावांच्या शिकवणीमुळे त्यांच्या गाण्यात एक प्रकारचा नखरेलपणा शिरला होता आणि तो पदांची रंगत वाढवीत असे. बाई सुंदराबाई कडून गज्जल, कव्वालीबाज शिकले तरी नारायणरावांच्या गाण्यांत चंचलपणा शिरला नाही. उलट त्या बाजाला एक प्रकारचा संथपणा त्यांनी बहाल केला. त्यांच्या अशा गायकीमुळे गजलेचे मुळचे स्वरूप बदलून मराठी माणसाला मान्य होईल असे तिचे मराठीकरण झाले. अनेक प्रकारच्या गवयांकडून अशा प्रकारची तालीम मिळाल्यामुळे त्यांच्या गायनात परिपक्वता आली. त्यामुळे स्वरांशी आणि तालांशी सहज लीलेने आणि तितक्याच आत्मविश्वासाने खेळत खेळत रंगभूमीवरचे त्यांचे गाणे चिरंतन आनंद देत राहिले. सुस्वराचे पटल निर्माण करून त्यायोगे नाट्यगृहातील हवा जणू काही धुंद करण्यासारखी करीत, त्यांनी कोणताही राग म्हटला तरी त्याचे स्वरचित्र श्रोत्यांसमोर उभे राही. कोणताही राग म्हणायला ते बिचकत नसत. त्यांच्या गायनातील सरलता ही इतरांच्या गायनातल्या कठीणतेपेक्षा कठीण होती. भक्तिसंगीतातील भक्तीभाव कमी होऊ न देता त्यांनी त्याला अस्सल संगीताचा दर्जा प्राप्त करून दिला. पदातल्या एखाद्या अर्थपूर्ण तुकड्याच्या पुनरावृत्तीने सुद्धा ते सुस्वरांचे पटल निर्माण करीत असत. एखाद्या पदातली कोणती ओळ पुन्हा पुन्हा म्हणणे चांगले होईल हे शोधुन काढण्यांत ते पटाईत होते. जसे-- ''सुखवी तुला दुखवी मला.'' ''नाही मी बोलत नाथा'' ''रमवाया जावू'' ''राजस बाळा'' असे अनेक तुकडे ते लयीशी खेळत खेळत वारंवार म्हणत असत. त्या स्वरांमुळे सुरांचे पटल तर निर्माण होत असेच शिवाय रस परिपोष सुद्धा होत असे. ''अनृतचि

गोपाला''--किंवा ''दया छाया घे निवारूनिया''...सारख्या पदामधले ''आ'' कार ते जसे संपूर्णतेने आणि एकमेकांत मिसळून लावत असत तसे कोणालाच शक्य झाले नाही. ''मम सुखाची'' पदातील' ''आप्त देव धर्म'' ह्या शब्दांच्या स्वरातील आस ऐकायला अलादिया खांसाहेब सदैव आतुर असत ह्यापेक्षा अधिक मोठे प्रशस्तिपत्र कोणते असू शकेल ?

काही पदे म्हणतांना नारायणराव दुसऱ्या रागातले स्वर सहजगत्या लावीत. किंवा एखाद्या तुकड्यावर थांबून निरनिराळ्या रागांचे मिश्रण करीत असत. पण भिन्न स्वरांच्या रागात जाणे आणि पुन्हा मूळ रागावर येणे ह्या गोष्टी ते इतक्या बेमालून करीत असत की दोन रागांचा सांधा कुठे जोडला गेला तेच लक्षात येत नसे. त्यामुळे त्यांनी राग बदलला असे न वाटता ऐक नवीन राग तयार झाला आहे असे वाटत असे. नाटकाच्या दृष्टीने रसाचा बिघाड होईल अशा रितीने बालगंधर्व कधीच गात नव्हते. किंवा टाळी मिळवण्याच्या दृष्टीने कधी त्यांनी ताना मारल्या नाहीत. शृंगारिक राग गातांना ते इतके मोहक गात असत की त्याचे वर्णन करावे तितके थोडेच आहे. तसेच करूण रसाच्या गायनाने श्रोत्यांच्या मनावर झालेला परिणाम कित्येक दिवस टिकत असे. शिवाय नाटकांच्या रसाशी एकरूप झाल्यामुळे त्यांनी पदाची सुरवात करताच त्या रसाचा उत्कर्ष होत असे. मात्र आवाजाच्या जातीतच मार्दव असल्यामुळे वीररस किंवा कठोरवृत्तीचे गाणे त्यांना कधीच जमले नाही. पदाची रंगत वाढवणायासाठी ते ''हां हां'' ह्या शब्दांचा उपयोग जरूर करीत. पण त्यापैकी प्रत्येक ''हां'' लयीत, स्वरांत, आणि वजनदारपणांत असे. ह्यांचे महत्त्व लक्षात न घेता काही गायकांनी त्यांचे अनुकरण केले तेव्हां फक्त व्यंगचित्रेच तयार झाली. गातांना चेहरा वेडावाकडा करणे, हाताला हेलकावे देणे, शेजारच्या पात्राचा किंवा रसाचा संबंध सोडून गाणे, केवळ मैफलीतच खपू शकेल अशी तान किंवा हरकत घेणे या गोष्टी बालगंधर्वांनी कधीच केल्या नाहीत. कोणते पद लांबवायचे आणि कोणते नाही या संदर्भात त्यांचे काही निश्चित संकेत होते. किर्लोस्कर-देवलांच्या नाटकात जिथे संभाषणाच्या ओघाला महत्व आहे अशा प्रसंगाची पदे त्यांनी कधी

लांबविली नाहीत. जिथे संगीताच्या विस्ताराला योग्य असा प्रसंग आहे अशीच पदे ते विस्ताराने गात असत.

मेहबूबखानसाहेब ह्यांच्या कडून त्यांनी सुरवातीला स्वर-तालज्ञान मिळवले. किर्लोस्कर नाटक मंडळीत आल्यावर त्यांच्यावर प्रथम गोविंदराव टेंबे ह्यांच्या मधुर स्वरविलासाचा परिणाम झाला. खडेस्वर न उच्चारता ते एकमेकात मिसळले आहेत अशा पद्धतीने गाणे ते त्यांच्या कडून शिकले. भास्करबुवा बखले, बाई सुंदराबाई, मलकाजान, कलकत्याची गोहरजान, ह्यांच्याकडूनही त्यांना तालीम मिळाली, शुद्ध शास्त्रीय संगीतापासून गजल-कव्वाली बाज त्यांनी शिकून घेतले पण शेवटी ह्या सर्व प्रकारात आपला स्वतःच्या बाज मिसळून एक स्वतःची गायकी निर्माण केली. आपली स्वतंत्र प्रज्ञा वापरली, आपली गायकी समृद्ध केली. हिंदुस्थानी संगीतातली मादकता त्यांनी मराठी संगीतात आणली. अभंग गायनाचा बाज मास्तर कृष्णरावांनी सांगितला त्यामुळे महाराष्ट्रातील अभंग गायकीच बदलली. अभंगाचे किवा भजनाचे नुसते शब्द जरी त्यांनी उच्चारले तरी भक्तिरसाला उठाव मिळून कान्होपात्राने किंवा मीराबाईने परमेश्वराला अगदी ह्याच तन्मयतेने आळवले असले पाहिजे अशी खात्री पटत असे, रंजकता हे त्यांच्या गायकीचे प्रमुख सूत्र असे. वेगवेगळ्या स्वरपंक्तीने पदांचे शब्द नटवणे, विविध स्वरालंकारांनी सौंदर्य आणणे आणि भरपूर स्वर विलास करणे अशी गंधर्व गायकी होती.

आपल्या नाटकांतून आणि नाटकांतल्या गायनामधून बालगंधर्वांनी नकळत खूप सामाजिक कार्य केलं. त्याबद्दल अनेकांनी अनेकविध विधानं केली आहेत. ही विधानं करणारी मंडळी त्या त्या क्षेत्रातली आदरणीय समजल्या गेली होती. बालगंधर्वांच्या वर्तनामुळे नटवर्गाबद्दल समाजात असलेला गैरसमज दूर झाला असे बाबासाहेब खापर्डे म्हणाले. ''बालगंधर्वांमुळे एकंदर नटवर्गाविषयीची अनिष्ट भावना समाजातून लुप्त होवू लागली'' असं गोविंदराव टेंबे लिहितात. ''आर्गन आणि सारंगी या अगदी परस्पर विरूद्ध अशा साथीच्या वाद्यांना घेवून गाण्याची अचाट कामगिरी नारायणरावांनी केली. भास्करबुवांच्या

बैठकीतल्या गायकी चालीवर रचलेली स्वयंवरातली पदे लोकांमध्ये इतकी पेरली गेली की, उच्च संगीताची रंगभूमीने फार मोठी कामगिरी बजावली, त्याचे श्रेय भास्करबुवा आणि बालगंधर्वांना जाते'' हेही मत गोविंदरावांचेच ''मला कधी गाणं ऐकावसं वाटलं तर मी बालगंर्धवाच्या नाटकाला जातो''. असे उद्गार गानमहर्षी अल्लादियाखां साहेब अनेक वेळा काढायचे, त्यांच्या गायनाची छाप रसिक मनावर इतकी होती की नारायणरावांच्या गायनाचे गवयाने अनुकरण केले नाही तर तो गवई श्रोत्यांना पसंत पडत नसे'' असे विनायकराव पटवर्धनांनी नमूद केले आहे.'' बालगंधर्वाच्या केशभूषेचे आणि वेशभूषेचे अनुकरण करून हजारो महिलांनी आपले संसार सुखाचे केले आहेत''. असे उद्गार आचार्य अत्रे ह्यांनी काढले तर बापूसाहेब माटे म्हणाले ''बालगंधर्वांनी महाराष्ट्राला रसिकता शिकवली।'' नेसायचं कसं, नटायचं कसं, रूसायचं कसं, हसायचं कसं आणि लाजयचंही कसं सांगता सांगता रडायचंही कसं हे देखील शिकवलं. त्यांनी महाराष्ट्राला खाडिलकर गडकरी सारखे नाटककार दिले, गोविंदराव टेंबे, भास्करबुवा बखले, मास्तर कृष्णराव सारखे संगीतकार दिले, तिरखवा, कादरबक्ष सारखे संगतीकार दिले, मराठी रंगभूमीला वैभवाचे दिवस दाखवले, नटांना सामाजिक दर्जा दिलाःत्याच बरोबर स्वाभिमान दिला. नाटक कंपन्यांना शिस्त लावली, लोकांमध्ये साहित्यिक संस्कृतिशील नाटकांबद्दल आवड निर्माण केली. त्यांच्या उतारवयातील स्त्री भूमिका देखील रसिकांनी आवर्जून बघितल्या. कारण त्यांचं तारूण्य ओसरलं तरी तन्मयता तशीच चिरतरूण होती. नुसते नटणे आणि मुरडणे म्हणजे स्त्री नव्हे, स्त्रीचे, स्त्रीजातीचे अंतरंग ही निराळी गोष्ट आहे. ती प्रत्यक्षात उतरल्या शिवाय त्याची मोहिनी प्रेक्षकांवर पडणार नाही. एका पुरूषाने स्त्रीजातीच्या अंतरंगाची समाजाला ओळख करून द्यावी आणि तत्पावेतो केवळ काव्यातच दडून बसलेले तिचे मोहक, पवित्र आणि समर्थ स्वरूप समाजाच्या नजरेसमोर उभे करावे ही विधात्याच्या सृष्टीतील एक अदभुत घटनाच नव्हे काय ?

महाराष्ट्राच्या दुसऱ्या वेडाने पछाडलेल्या अनंत रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणाऱ्या ह्या गंधर्वाचे अखेरचे दिवस मात्र अत्यंत विपन्नावस्थेत जावेत हा दैव दुर्विलासच म्हणावा लागेल.

मागे ''अेकच प्याला'' नाटकाचे वाचन झाले असतां, त्या नाटकाच्या शेवटा संबंधात बरीच चर्चा झाली होती, शोकपर्यावसायी नाटक प्रेक्षकांच्या हृदयात कायमचे ठसते असे नारायणराव म्हणाले होते. असे नाटक त्यांच्या मनातून कधीही हद्दपार होत नसते असे त्यांचे मत होते. ते त्यांनी हिरिरीने मांडले होते.

नारायणरावांच्या जीवन-नाट्याबद्दल नियतीची देखील अशीच विचारधारा होती कां ?

* * * *

# आभार

(१) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(२) कै. मधुकर आष्टीकर

(३) डॉ. वि. स. जोग

(४) कै. चंद्रकांत कुळकर्णी

(५) सौ. शोभा ऊबगडे, सरचिटणीस वि. सा. संघ.

(६) डॉ. तारा भवाळकर, सांगली.

(७) डॉ. चित्रा मोडक, नागपूर.

(८) श्री. वसंतराव अुढगांवकर
अध्यक्ष, देवल स्मारक मंदीर, सांगली.

(९) श्री. जी. के. ढेशपांडे, G. D. Art Com., पुणे.
प्राचार्य जे. जे. स्कूल ऑफ आर्ट (निवृत्त)

## आधार

| | | |
|---|---|---|
| मखमलीचा पडदा | : | श्री. वसंत शांताराम देसाई |
| बालगंधर्व | : | श्री. वसंत शांताराम देसाई |
| खाडीलकरांच्या नाट्य कृती | : | श्री. वसंत शांताराम देसाई |
| तो राजहंस अेक | : | श्री. बाळ सामंत |
| माझी भूमिका | : | श्री. गणपतराव बोडस |
| प्रभातकाल | : | शांताराम आठवले |
| संपूर्ण गडकरी | : | आचार्य अत्रे |
| बालगंधर्व विशेषांक | : | महाराष्ट्र टाइम्स |

...भाषा, जातपात आणि देश ह्या सगळ्या भिंती ओलांडून कलावंत नवीन सृष्टि निर्माण करतो...माणुसकी आणि रसिकता ह्यांनी भरलेल्या ह्या नाट्यसृष्टिचे बाल गंधर्व सम्राट आहेत. ...बाल गंधर्व हे मराठी रंगभूमीच्या सुवर्ण युगाचे अग्रदूत आहेत. पुन्हा असा नट होणार नाही....

*-यशवंतराव चव्हाण*

बालगंधर्व म्हणजे महाराष्ट्राचे संगीतछत्रपती!... बालगंधर्व बोलायचा विषय नाही..ऐकायचा विषय आहे...शिवरायाचा आठवावा प्रताप - तसे बालगंधर्वांचे आठवावे स्वरुप. बालगंधर्वांचे आठवावे गायन ! असेच म्हणावे लागेल.

*-आचार्य अत्रे*

बाल गंधर्वांचा मी ऋणी आहे..

*- नाट्याचार्य खाडीलकर*

मला चांगलं गाणं ऐकावसं वाटलं की मी बालगंधर्वांच्या नाटकाला जाऊन बसतो.

*-अलादियांखांसाहेब*

''माझे अन्नदाते, माय बाप हो, तुमच्या आशीर्वादाने मी जिवंत आहे. ह्या पेक्षा जास्त मी काय बोलणार? .... देवा जवळ मला ऐकच मागणे मागायचे आहे. परमेश्वरा माझ्या रसिकांना अुदंड आयुष्य दे।''

नारायणरावांचे हे शेवटचे भाषण ! त्यात त्यांनी स्वत:साठी काही मागितले नाही परमेश्वराजवळ ! अुदंड आयुष्य मागितले ते आपल्या 'अन्नदाते मायबापांसाठी।।'

मग प्रश्न पडतो, रसिकांनी बालगंधर्वावर अधिक प्रेम केलं की बालगंधर्वांनी त्यांच्या रसिकांवर...
कुणी कुणासाठी जीव ओवाळून टाकला !

